

१

# जगज्जेता शिकंदर

पेला राजधानीच्या भव्य, ऐश्वर्यसंपन्न राजवाड्यासमोर मोठा जनसमूह जमला होता. रंगणाभोवती राजा-राणी, राजपुत्र, सरदार-मुत्सद्दी, सैनिक शिस्तीत आपापल्या जागी बसले होते. रंगणात अश्वपरीक्षा चालली होती. युद्धासाठी आसपासच्या प्रदेशांतून घोडे आणले होते. त्यांची पारख करून ते विकत घेतले जात होते. एक उंच, धष्टपुष्ट, देखणा घोडा सर्वांच्या

नजरेत भरला होता. पण हे जनावर मोठं अडेलतट्टू, बांड होतं. पाठीवर कुणाला बसू देत नव्हतं. कुणी पाठीवर बसला रे बसला की, हा घोडा खिंकाळून मागच्या दोन पायांवर उभा राहायचा व धसमुसळेपणा करून बसणाऱ्याची गाळण उडवून द्यायचा. अनेक तगड्या जवानांनी या घोड्यावर स्वार होण्याचा यत्न केला. पण त्याने सर्वांना पाणी पाजलं. नामोहरम केलं. हा अवखळ घोडा कुणालाही काबूत आणता येऊ नये, ही गोष्ट फिलिफराजाला कमीपणाची वाटली. त्याची चर्या त्रासिक दिसू लागली. घोडा परत पाठवणं म्हणजे दरबारची नामुष्की होती. एका घोड्याने मॅसिडोनियाच्या पुरुषार्थाला आव्हान द्यावं याची त्याला खंत वाटू लागली.

घोड्यापुढे अनेक लढवय्यांनी हात टेकले होते. पण फिलिफचा वंश काही नामर्द नव्हता. त्याचा चौदा वर्षांचा मुलगा अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर तिथेच बसला होता. हा मुलगा मोठा देखणा, पाणीदार, चपळ व हूड होता. बापाची चिंता हेरून तो चटकन पुढे आला व म्हणाला, 'मला संधी द्या. या घोड्याला नाही नमवीन तर नावाचा शिकंदर नाही.' पोराची हिंमत पाहून बापाचा मान ताठ झाली. आसूड घेऊन शिकंदर लगेच रंगणात उतरला. तोंडाला फेस आलेल्या त्या गर्विष्ठ घोड्याकडे तो धीमेपणाने जाऊ लागला. जनावर दारू प्याल्याप्रमाणे बेफाम झालं होतं. शिकंदर त्याला कसा काय नमवणार याकडे साऱ्या दरबाराचं लक्ष लागलं होतं. सर्वांच्या नजरेत भीती, औत्सुक्य, कौतुक दाटून आलं होतं.

शिकंदर घोड्याजवळ जातो तो घोड्याने पुढचे दोन पाय उंचावून सलामीलाच त्याला भेदरून टाकण्याचा यत्न केला. पण सिंहाचा छावा डगमगला नाही. घोड्याने पाय खाली करताच तो चपळाईने स्वार झाला व एका हाताने लगाम खेचून त्याने घोड्याला टाच मारली. घोडं दाणदाण उड्या मारू लागलं. शिकंदराने सपासप फटके मारण्यास

सुरुवात केली. घोडं भलतंच विथरलं, बेफाम झालं. उंच उंच, अडव्या तिडव्या उडया मारू लागलं. पण त्याच्या पाठीवरचा स्वार काही जागचा हालेना. आपल्या दोन्ही तंगडया त्याने अशा जबरदस्त आवळून ठेवल्या की घोडयाला ती मगरमिठीच वाटली. पंधरावीस मिनिटं घोडा आणि शिकंदर यांचं हे युद्ध चालू होतं. तांबूस धुळीने दोघे माखून गेले होते. कोणी कोणाला हार जाईना. शेवटी घोडा दमला. त्याच्या तोंडातून फेस गळू लागला. जेत्या शिकंदराने त्याच्या मानेवरचे केस पकडून त्याला आणखी पळायला लावलं. पराजित घोडयाला दौड करणं भाग होतं. रंगणाभोवती तो पळ पळ इतका पळाला, चौखूर उधळला की शेवटी चालेनासा झाला. शिकंदर मग मात्र खाली उतरला व त्या अवखळ जनावराचं मुख कुरवाळून ऐटीत परत आला. राजपुत्राचा हा शिकंदर पराक्रम पाहून सारा दरबार बेहद्द खुश झाला. टाळ्यांच्या कडकडाटात फिलिफराजा शिकंदराला म्हणाला, ‘ भले शाब्बास ! तुझा हा पराक्रम पाहून असं वाटतं की तुला हे मॅसिडोनचं राज्य अपुरं पडणार. ’

अवखळ, जंगली घोड्याला ताब्यात आणल्यापासून शिकंदरचा आत्म-विश्वास वाढला. बापाने त्याच्या बहादुरीवर खुश होऊन त्याला एक उमदा घोडा बक्षीस दिला. या घोड्याचं नाव होतं बुसिफालस. हा घोडा शिकंदराचा फार प्यारा झाला. भावी आयुष्यात या घोडयावर बसूनच त्याने मोठमोठ्या लढाया मारल्या व दूरवर स्वाऱ्या केल्या. घोडा फेकण्याची त्याला यापूर्वीच सवय झाली होती. याशिवाय धावणे, पोहणे, कसरत करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे, बाण मारणे या मर्दानी खेळांत तो प्रवीण झाला होता. डोंगराळ मुलखात जाऊन तो हां हां म्हणता शिकार करून येई. वाढत्या वयाबरोबर त्याच्या अंगची वीरश्री वाढत होती. मॅसिडोनियाच्या दरबारात परदेशांचे अनेक मुत्सद्दी वीर वारंवार येत. त्यांची राजकारणाची खलबते तो लक्षपूर्वक ऐके.

युद्धांच्या गप्पागोष्टी ऐकून त्याचे बाहू स्फुरण पावत. ॲरिस्टॉटलसारखा तत्त्ववेत्ता शिक्षक त्याला लाभला होता. या थोर गुरूने शिष्याला अनेक गोष्टी पढविल्या. होमरचं इलियड काव्य शिकवून त्याला विद्येची गोडी लावली. त्याच्या अंगची रसिकता जोपासली. त्याला व्यावहारिक ज्ञान दिलं. पण शिकंदराला खरं परिणामकारक व्यापक शिक्षण मिळालं ते खुद्द मॅसिडोनच्या दरबारी वातावरणातच. तो मोठा जिज्ञासू होता. दरबारची खडान्खडा माहिती तो जाणून घेत होता. बाप लढाईवर गेला असला की परदेशी मुत्सद्दयांशी तोच वाटाघाटी करी. त्याला आता मिस्रूड फुटू लागलं होतं. तो चांगला तरणाबांड दिसे. कसरतीमुळे त्याचं शरीर पीळदार दिसे. गर्दन भरदार झाली होती. बोलताना त्याचे निळसर डोळे चमचम करीत. रागावला की त्याच्या डोळ्यांतून ठिणग्या पडताहेत की काय असं वाटे. त्याच्या डोक्यावर विपुल केस होते. त्या केसांची झुलपं त्याच्या उंच नी विस्तीर्ण अशा भालप्रदेशावर आंब्याच्या डहाळीप्रमाणे शोभून दिसत. फिलिफराजाचा हा पुत्र खरोखर राजबिंडा दिसत असे. भावनाप्रधान आणि उसळत्या रक्ताच्या या मुलाचा एकंदर आवेश नी रूपसंपदा पाहून प्रजाजनांना त्याच्याविषयी विलक्षण प्रेम वाटे. बापाला मात्र अधूनमधून त्याच्या महत्त्वाकांक्षी, साहसी स्वभावाची चिंता वाटे. भरधाव रथ सोडून सिंहाशी लढू पाहणाऱ्या मुलाबद्दल पित्याला थोडी काळजीही वाटू लागली.

एकदा फिलिफराजाच्या अनुपस्थितीत मॅसिडोनियाच्या उत्तर हद्दीवरील डोंगराळ मुलुखात बंडाळी माजली. शिकंदराने कुणाचीही वाट न पाहता ती मोडून काढली. बापाला जेव्हा हा पराक्रम कळला तेव्हा त्याने उद्गार काढले, ' आज मी धन्य झालो. माझा बेटा माझ्यापेक्षा सवाई होणार. माझं कार्य तो पुरं करणार. ग्रीकांच्या पराक्रमाचा आणि श्रेष्ठ संस्कृतीचा झेंडा शिकंदराच्या हाती सुरक्षित राहील.'

लढाया मारून आजूबाजूच्या राज्यांवर वचक बसवल्यामुळे फिलिफ-राजा आता ख्यालीखुशालीत रमू लागला. क्लिओपात्रा नावाच्या राज-कन्येबरोबर त्याने दुसरं लग्न केलं. या लग्नामुळे शिकंदराच्या आईला साहजिकच राग आला. ती माहेरी निघून गेली. शिकंदरही तिच्या पाठोपाठ गेला. थोड्या दिवसांनी फिलिफने आपल्या मोठ्या मुलीचं लग्न ठरवलं. राज-धानीत हा लग्नसोहळा मोठ्या दिमाखाने साजरा झाला. पण लग्न झाल्यावर एकाएकी विघ्न उभं राहिलं. शिकंदरच्या आजोळच्या कुणा एका सरदाराने फिलिफराजाचा दारूच्या नशेत खून केला. कुणी म्हणतात, हा खून शिकंदराच्या आईने करविला, तर कुणी म्हणतात, तो फिलिफच्या शत्रूने करवला. राजाच्या अकल्पित मृत्यूमुळे दरबारात वारसाचा बखेडा माजला. नव्या राणीला मुलगा झालेला होता. त्याचे पक्षपाती मॅसिडोनच्या गादीवर हक्क सांगू लागले. पण रास्त हक्क शिकंदराचा होता. आपला हक्क डावलला जात आहे असे पाहताच तो चवताळून उठला. विश्वासू आणि इमानी सैनिक सरदार त्याने आपल्या भोवती गोळा केले. त्यांच्यापुढे जोरदार भाषण करून त्याने आपली बाजू सर्वांना पटवून दिली. बहुसंख्य दरबार आणि प्रजाजन आपल्या बाजूला आहेत याची खात्री करून घेतल्यावर मग क्षणाचाही विलंब न लावता त्याने गादी बळकावली. कट आणि कारस्थानं करणाऱ्यांच्या त्याने मुसक्या बांधल्या. सावत्र भावाला व त्याची पाठराखण करणाऱ्या चुलतभावाला कंठस्नान घातलं. त्याच्या तलवारीला आता विलक्षण धार चढू लागली. मॅसिडोनियाचा तो राजा झाला होता. पृथ्वी पादाक्रांत करण्याची, जगज्जेता होण्याची महत्त्वाकांक्षा त्यानं बाळगली.

शिकंदराचं नशीब उजाडलं होतं. छोटी छोटी राज्यं मोडून आपल्या नेतृत्वाखाली एक विशाल संघराज्य निर्माण करायचं ध्येय बाळगून त्याने युद्धाचा पवित्रा घेतला. स्वाऱ्या-मोहिमा आखल्या. त्याचं

उंच, धिप्पाड, तांबूस वर्णाचं लढाऊ सैन्य पेला राजधानीतून बाहेर पडलं. ढाल-तलवारी, धनुष्यबाण, भाले-कट्यारी ही त्यांची आयुधं होती. त्यांचे घोडे वेगवान होते आणि रथ भरधाव धावणारे होते. जिंकू किंवा मरू या ईर्षेने हे सैन्य भारावून गेलं.

शिकंदराची मूळची अवखळ वृत्ती सत्ता हाती येताच आक्रमक बनली. शेजारच्या राज्यावर आक्रमण करायला त्याला काहीतरी कारण पाहिजेच होतं. तो गादीवर आला तेव्हा बापाने दुखवलेल्या अनेक राजे-रजवाडयांनी आणि डोंगरी मुलुखातल्या जमातींनी डोकं वर काढलं. शिकंदरासारख्या पोरसवदा राजाची सत्ता मानायला ते तयार नव्हते. त्यांनी बंड उभारली व आपापल्या सत्ता बळकावून बसले. शिकंदराने आपला मोर्चा आधी या बंडखोर राज्यांकडे वळवला. उत्तर आणि पश्चिम दिशेकडे त्याने जंगी मोहीम काढली. बाल्कन्समध्ये सैन्य उतरवून खोजा खिंड गाठायला त्याला मुळीसुद्धा वेळ लागला नाही. बंडखोरांशी या ठिकाणी अनेकदा त्याला सामना द्यावा लागला. पण त्या सर्वांची धूळधाण उडवून त्याचं सैन्य डॅन्यूब नदीपर्यंत पोहोचलं. पलीकडे गीटाचा राजधानी होती. ती अल्पावधीत त्याच्या हाती पडली. बंडखोरांना दरारा बसविण्या-साठी शिकंदराने कठोर धोरण अवलंबिलं. हाती पडलेली राजधानी त्याने जाळून भस्मसात केली. त्याचं सैन्य डॅन्यूबपर्यंत गेलंलं पाहताच इलीरियन्स लोक बंड करून उठले व त्यांनी प्लिसा शहर घेतलं. शिकंदरला हे कळताच तो त्वरेने माघारी फिरला. डोंगरपठारावर इलीरयन्स लोकांची हड्डी नरम करून तो आपल्या राजधानीकडे निघाला दरम्यान थीब्ज व ग्रीक राज्यांनी त्याच्याविरुद्ध बंडाळी माजविली. ग्रीकांचा पूर्ण मोड केल्याशिवाय जग जिंकण्याचा आपला मार्ग मोकळा होणार नाही हे शिकंदराने आता पुरतं जाणलं. थीब्जची राजधानी दृष्टिपथात येताच त्याने वेगाने हल्ला केला. थीब्रांचा प्रतिकार मोडून पडला. रस्त्यारस्त्यांतून

त्यांनी लढण्याचा यत्न केला, पण शिकंदराच्या सैनिकांनी त्यांची गाळण उडवून दिली. असंख्य प्रेतं तुडवीत शिकंदराला राजवाड्यात प्रवेश करावा लागला. धर्ममंदिरं आणि मठ वगळून राजधानीतलं घरन् घर त्याने भुईसपाट केलं. थीबांचा पराभव झालेला पाहताच अथेनियन लोकांनी नांगी टाकली. स्पार्टाने तटस्थतेचा आव आणला. अथेन्सला उघड शत्रुत्व करण्याची हिंमत होईना. शिकंदराच्या पराक्रमापुढे सारी ग्रीक राज्यं निस्तेज झाली. त्या सर्वांना त्याचं मांडलिकत्व आणि नेतृत्व मुकाटपणे मानावं लागलं.

पुढल्या वर्षीच्या वसंतऋतूत शिकंदराने पर्शियन साम्राज्यावर मोहीम काढली. या वेळी त्याच्याजवळ तीस-चाळीस हजार सैन्य होतं. या सैन्यात मॅसिडोनियन्स, इलीरियन्स, थ्रेसियन्स, ग्रीक आदी सर्व मांडलिक राज्यांची सैन्यं सामील झाली होती. शिकंदर या बलाढ्य सेनेचा सेनापती होता. पर्शियन साम्राज्य आणि त्याचा सम्राट दरायस यांचा पराभव करणं सोपं नव्हतं. या बलाढ्य सम्राटाला पराभूत करण्याचा यत्न करणं म्हणजे सिंहाच्या गुहेत उडी घेण्यासारखंच साहसी कृत्य होतं. पण शिकंदराला युद्धात भीती म्हणून माहीत नव्हती. आपल्या पराक्रमावर त्याचा जबरदस्त विश्वास होता. दैववादी असला तरी प्रयत्नांत तो कधी कसूर करीत नसे.

गार्डियम शहरात जेव्हा शिकंदराची विजयी सेना आली तेव्हा एका धर्ममंदिराजवळ त्याला थांबावं लागलं. मंदिराजवळ एक रथ होता व त्याच्या धुरीला एका लांबलचक जाडजूड दोर बांधलेला होता. हा दोर पवित्र समजला जात असे. दोराची गाठ धुरीला अशा खुबीने बांधलेली होती की ती कुणालाच दिसू नये. ती गाठ जो सोडवील तो मोठा भाग्यवंत समजला जाई. शिकंदराने गाठ सोडवून आपल्या नशिबाची पारख करण्याचं ठरवलं. पण काही केल्या त्याला तो दिसेनाच. फजिती

व्हायची वेळ आली. अखेर वैतागून त्याने आपली तलवार काढली व दोर चरचरा कापीत तो आजूबाजूच्या लोकांना उद्देशून म्हणाला, ' शिकंदर न सुटणाऱ्या गाठी अशा सोडवीत असतो. '

शिकंदर आणि दरायस यांच्यांत दोन-तीन वर्षे युद्ध चालू होतं. दर ठिकाणी दरायसच्या सैन्याकडून जोरदार प्रतिकार होई, पण शिकंदराच्या घोडदळापुढे त्याचा टिकाव लागत नसे. सिरियाच्या किनाऱ्याकिनाऱ्याने शिकंदरची सेना इजिप्तमध्ये नाईल नदीच्या मुखाशी उतरली तरी दरायस समोरासमोर युद्धाला उभा राहीना. इजिप्तच्या उष्ण वाळवंटी प्रदेशात शिकंदराच्या सैन्याचे हाल होऊ लागल्याच्या वार्ता जेव्हा त्याच्या कानी गेल्या तेव्हा कुठे तो खऱ्या युद्धाला सिद्ध झाला. इसस येथे दोघांचे प्रथम युद्ध जुंपले. या युद्धात दरायसचं वीस हजार सैन्य ठार झालं. आपल्या बायकामुलींना टाकून त्याने रणातून पळ काढला. शिकंदराच्या हाती अगणित संपत्ती आली. दरायसच्या एका मुलीशी लग्न लावून तो उरलेल्या पर्शियन साम्राज्याचा फडशा पाडण्यास निघाला. बाबिलोनमध्ये त्याने प्रवेश केला तेव्हा दरायसने तह करण्याची विनवणी केली. युफ्रेटिसच्या पश्चिमेचं अर्धं साम्राज्य त्याने देऊ केलं. पण शिकंदराने ही विनवणी धुडकावून लावली. त्याने युद्ध चालूच ठेवलं. टिरी व इजिप्त पूर्ण जिंकून घेतली. नाईलच्या मुखाशी विजयाची खूण म्हणून अलेक्झांड्रिया या शहराची स्थापना केली. गाझापट्टीत तो आला तेव्हा तिथे कडवा प्रतिकार होऊ लागला. हा प्रतिकार मोडण्यात त्याचे दोन महिने गेले. सिरिया, पॅलेस्टाइन, इजिप्त अशी राज्यं क्रमाक्रमाने जिंकून त्याने भूमध्य समुद्र सोडला व मेसापोटेमियातून तो परत पर्शियात उतरला. आर्बेलापासून साठ मैलांवर दरायसने त्याला पुनः वाटेत गाठले. या वेळी तो मोठ्या तयारीने युद्धाला उभा राहिला. दिवसभर दोन्ही सैन्यांत तुंबळ युद्ध झाले. दरायसचा पुरता मोड झाला. तो उत्तरेकडे पळत सुटला. शिकंदर

वाटेतली अनेक शहरं घेत व राजवाडे लुटीत दरायसच्या पाठलागावर निघाला पण दरायस त्याच्या हाती जिवंत सापडला नाही. पराजयाने खचलेला तो सम्राट आपलं दुःख विसरण्यासाठी दारूच्या नशेत धुंद होऊ लागला. एका रात्री छावणीत तो असा पडला असता एका असंतुष्ट सैनिकाने त्याचा खून केला. शिकंदराने त्याचे प्रेत मोठ्या सन्मानाने त्याच्या राजधानीकडे पाठविले. दरायसच्या मृत्यूमुळे पर्शियन साम्राज्य अस्त पावलं व शिकंदर त्याचा स्वामी झाला. काबूल-कंदाहारमार्गे भारतावर स्वारी करण्यास तो आता मोकळा झाला. पर्शियाचं वैभव-संपन्न साम्राज्य जिंकल्यानंतर त्याला भारतासारख्या सुवर्णभूमीची हाव सुटली. विजयाची धुंदी चढली.

बापाप्रमाणे तोही मदिरा आणि मदिराक्षीच्या मोहात पडू लागला. सैनिकांशी आणि हाताखालच्या अधिकाऱ्यांशी तो थोड्या मग्रूरीने वागू लागला. लांबलांबच्या एकसारख्या स्वाऱ्यांमुळे सैनिक कंटाळू लागले. शिकंदर नेईल तिकडे सैन्याला जावं लागत होतं. आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी ग्रीकांचं पन्नास हजार सैन्य घेऊन तो बेगुमानपणे भारताच्या दिशेने निघाला.

इ. स. ३२७ पूर्वी शिकंदराची विजयी सेना बिनविरोध पंजाबात उतरली. सिंधू नदी ओलांडून त्याला दक्षिणेकडे व पूर्वेकडे धडक मारायची होती व नंतर गंगेच्या सुपीक खोऱ्यात पाय रोवायचा होता. पण हे करणं त्याला फार महाग पडलं.

पंजाबमधील पंचनद्यांच्या मुलुखात भारतीय राजांकडून आपल्याला तीव्र प्रतिकार होणार हे त्याने ओळखलं. भारतीयांचा पराभव करायचा तर केवळ शौर्यावर विसंबून त्याचं चालण्यासारखं नव्हतं. समोरासमोरच्या मैदानी युद्धात भारतीय सैन्य कदाचित आपणांला भारी ठरेल अशी त्याला भीती वाटली. शिकंदर हा काही आडदांड सेनापती नव्हता. तो भावना-

प्रधान, आक्रमक, कठोर असला तरी प्रसंगावधानी होता. सामर्थ्यावर विसंबून निभावण्यासारखं नाही हे लक्षात येताच त्याने कूटनीतीचा पवित्रा घेतला.

सिंधू नी झेलम नद्यांच्या दरम्यान तक्षशीलेच्या आंभी राजाचं राज्य होतं. त्याच्या अलीकडे झेलम नी चिनावच्या खोऱ्यात पौरसाचं वैभवसंपन्न राज्य होतं. या दोन्ही राज्यांचं आपआपसांत वैर होतं. या वैराचा शिकंदराने अचूक फायदा घेतला. पौरसाचा परस्पर काटा काढण्यासाठी आंभीने देशद्रोह केला. शिकंदरापुढे त्याने आपणहून नमतं घेतलं. त्याला भारी नजराणा पाठवला व त्याच्याशी स्नेह जोडला. त्या काळी वदंता तर अशी पिकली होती की,पौरसाचा पराभव करण्यासाठी आंभीनेच शिकंदराला भारतात पाचारण केलं. आंभीच्या देशद्रोही वर्तनावरून ही वदता खरी वाटते. वाटेतला हा मोठा अडसर दूर होताच शिकंदर पुढे सरकला. त्याने पौरस राजाला ' शरण ये ' असा निरोप पाठविला. पौरस रणांगण खेळलेला पुरुष होता. अतिशय धिप्पाड शरीराचा उमद्या व्यक्तिमत्त्वाचा आणि स्वाभिमानी वृत्तीचा तो राजा होता. त्याच्याजवळ तीस हजार पायदळ, चार हजार घोडदळ, तीनशे रथ आणि दोनशे लढाऊ हत्ती होते. पर्शियन सम्राटाप्रमाणे तो रणछोड नव्हता. आपल्या राज्यावर आक्रमण झालेलं त्या तेजस्वी राजाला सहन झालं नाही. शिकंदराच्या अपमानास्पद निरोपाला त्याने उत्तर दिलं, ' आपण आधी रणांगणावर भेटू. '

पावसाळ्याला आरंभ झाला होता. झेलम नदी दुथडी भरून वाहत होती. झेलमच्या दोन्ही तीरांवर दोन बलाढ्य शत्रू समोरासमोर उभे राहिले व एकमेकांना आव्हान देऊ लागले. पण आठवडा गेला तरी युद्धाला तोंड लागेना. शेवटी एका रात्री शिकंदराने नदी ओलांडण्याचं धाडस केलं. रात्र अंधारी होती. पावसाची रिपरिप चालू होती.

शिकंदराचं सैन्य सावधपणे नदीच्या उत्तरेला सतरा मैल सरकलं आणि एके ठिकाणी उतार पाहून छोटया छोटया होडयांचा पूल ओलांडून ते अचानकपणे पलीकडे पोहोचलं. पौरसाला शिकंदराने चांगलंच चकवलं. शत्रूचं सैन्य अलीकडे आल्याचा सुगावा लागताच पौरसाने युद्धाचं रणशिंग फुंकलं. आक्रमकांना रोखण्यासाठी दोन हजार सैन्य देऊन त्याने आपल्या पुत्राला पुढे रवाना केलं. तलवारींचा खणखणाट आणि भाल्यांच्या फेकी सुरू झाल्या. पहिल्याच भीषण चकमकीत पौरसाचा पुत्र ठार झाला. शिकंदर आता स्वतः पुढे होऊन लढू लागला. पौरसाने आपल्या गजदलाला चालून जाण्याची आज्ञा दिली. रथावर बसून तो आपल्या सैन्याचं मार्गदर्शन करू लागला. शत्रूची गजसेना चालून येत आहे असे पाहताच शिकंदराने आपलं तिरंदाज घोडदळ समोर आणलं. या तिरंदाजांनी बाणांचा अविरत वर्षाव सुरू केला. पौरसाचे हत्ती जखमी होऊन चीत्कार करीत मागे हटू लागले. दिशा बदलून पळत सुटले. पावसामुळे चिखल झाला होता. त्यात पौरसाचे रथ रुतू लागले. शिकंदराच्या भालाइतांनी आणि तिरंदाजांनी या गोंधळाचा फायदा घेऊन जोराची मुसंडी मारली. हातघाईचं युद्धच मग सुरू झालं. दोन घटका रणकंदन चालू होतं. पण शेवटी शिकंदराचं नशीब बलवत्तर ठरलं. पौरस जखमी होऊन त्याच्या हाती सापडला. विजयाच्या धुंदीत शिकंदराने त्याला विचारलं, ' राजा, तुझ्या पराक्रमावर मी खुश झाहे. तुला मी आता कसं वागवावं ? '

' मला राजासारखंच वागव. ' पौरसाने ताडकन जबाब दिला. हा बाणेदार जबाब आणि तो देणाऱ्याचा एकंदर रुबाब पाहून शिकंदर विरघळला. खरा शूरमर्द खऱ्या शूरमर्दाला बरोबर ओळखतो. पौरस रणांगण हरला तरी त्याचं मन पराभूत झालं नव्हतं. शिकंदराने हे बरोबर हेरलं. शत्रू असावा तर असा असं मनाशी उद्गारत तो पौरसाला म्हणाला,

'ठीक ठीक, आम्ही तुला राजाप्रमाणेच वागवू. इथे जिंकलेल्या माझ्या मुलुखाचा तुला मी सुभेदार केला आहे. आजपासून तुझा माझा स्नेह झाला.' भारतात जिंकलेला मुलूख सात राज्यांत विभागून शेवटी हा ग्रीक योद्धा बलुचिस्तान मार्गे आपल्या देशाकडे निघाला. जवळ जवळ नऊ-दहा वर्षांनी तो आपल्या राजधानीकडे येत होता. अखंड घोडदौडीला तो आता कंटाळला होता. वाळवंटी प्रदेशात झालेल्या सैन्याच्या हानीमुळे त्याचं मन खचून गेलं होतं. बाबिलोनला पोहोचण्यापूर्वी वाटेत त्याचा एक सरदार हंफाशन तापाने आजारी पडून मृत्यू पावला. हा सरदार त्याचा जीव की प्राण होता. त्याच्या प्रेतावर पडून शिकंदर ढसाढसा रडला. बाबिलोनला तो पोहोचला त्या वेळी त्याला राज्याची घडी विस्कटलेली आढळून आली. मांडलिकांनी डोकी वर काढली होती. त्यांना ठेचण्यासाठी त्याने आरमार व सैन्य पाठविलं. स्वतः मात्र तो जाऊ शकत नव्हता. त्याला अचानक थंडीतापाने पछाडलं. त्या आधी दारूच्या व्यसनाने त्याला पुरतं घेरलं होतं. यौवन, धनसंपत्ती, प्रभुत्व यांच्या जोडीला अविवेक आल्यामुळे शिकंदराचं कर्तृत्व लोपू लागलं. त्याचा ताप आणि संताप हटता हटेना. अकराव्या दिवशी तो मृत्युपंथाला लागला. वाचा जवळजवळ बंद पडली. मृत्यूची घटका समीप येताच सरदारांनी त्याला विचारलं, 'महाराज, आपल्या मागे वारस कोण?'

'जो समर्थ असेल तो!'

असा हा जगज्जेता शिकंदर वयाच्या अवघ्या तेहतिसाव्या वर्षी मृत्यू पावला.

▣ ▣ ▣



२

# बाबर बादशहा

इराणच्या पूर्वेस फरघाना नावाचं राज्य होतं. तैमूरच्या राज्याची छकलं होऊन जी छोटी छोटी राज्यं निर्माण झाली त्यांतलंच फरघाना हे एक होतं. उमर शेख इथला राजा होता. इतर राज्यांवर त्याचेच भाऊबंद, चुलते, मामा राज्य करीत होते. हे सारे राजे एकमेकांना पाण्यात पाहत असत. ते व्यसनी, विलासी व घमेंडखोर होते. आपापसात त्यांच्या

नेहमी कटकटी व लढाया चालत. उमर शेख मोठा महत्त्वाकांक्षी पण चढेल वृत्तीचा होता. अक्षीच्या डोंगरी किल्ल्यावर एकदा कबुतरांना दाणे टाकण्यात मग्न असता तोल जाऊन तो खाली पडला व त्याला अपघाती मृत्यू आला. त्याचा थोरला मुलगा बाबर या वेळी अकरा वर्षांचा होता. राजधानी अंदेजानला त्याचा मुक्काम होता. बापाच्या मृत्यूची वार्ता कळताच तो तडक स्वार झाला व जवळ होते त्या सैनिकांना घेऊन त्याने अक्षी गाठली. अकराव्या वर्षी तो फरघान्याचा राजा झाला. पण हे राज्य सुखासुखी भोगण्याचं त्याच्या नशिबात नव्हतं. राज्य टिकविण्या-साठी त्याला आप्तस्वकीयांशी सतत झगडावं लागलं. आक्रमकांशी तोंड द्यावं लागलं. बंडखोरांशी सामना द्यावा लागला. कित्येकदा रणातून पळून रानोमाळ भटकावं लागलं. जयापजयाच्या हेलकाव्याने त्याचं शरीर नी मन मात्र टणक होत गेलं. त्याचा उत्साह वाढला, महत्त्वाकांक्षा वाढली, पराक्रमाला तेज चढलं. समरकंदाचं राज्य जिंकण्याची मोठी महत्त्वाकांक्षा या बालराजाने बाळगली. दरबारी लोकांवर त्याचा फारसा विश्वास नसे. घरी आजी दौलत बेगम होती. ती मोठी धैर्यवान व कर्तृत्वाची बाई होती. तिच्या सल्लामसलतीने तो मुख्यतः कारभार करू लागला. बेग सैनिकांनी त्याला मनोभावे मदत करण्याचं ठरविलं.

फरघान्याचं राज्य टिकवणं आणि समरकंद जिंकणं ही बाबराची आरंभीची दोन ध्येयं होती. अल्पवयात राज्याची जबाबदारी पडल्यामुळे त्याची चौकस बुद्धी व समजशक्ती वाढत गेली. सावधचित्ताने तो कारभार करू लागला. नवे सरदार, सैनिक गोळा करू लागला. आक्रमणं आणि लढाया यांच्यायोगे युद्धाचं शिक्षण त्याला आपोआप मिळत गेलं. समर-कंदचा शैबानीखान हा बाबराचा सर्वांत मोठा व बलाढ्य शत्रू होता. त्याच्याशी सामना करता करता बाबराला कधी जय तर कधी पराभव, वनवास पत्करावा लागला. पण पराभवाने तो कधी खचून गेला नाही.

अनुकूल संधी आली की जवळ असेल त्या सैनिकांनिशी तो आपल्या शत्रूशी लढण्यास तयार होत असे. बाबराने समरकंदवर दोन-तीनदा विजय मिळवले. समरकंदचा राजा होण्याची त्याची मनीषा पुरी झाली. यानंतर त्याने काबूलचे राज्य जिंकले, कंदाहार ताब्यात आणला आणि शेवटी तो हिंदुस्थानकडे वळला. शौर्य-धैर्य, अपार सोशिकपणा आणि माणसं जोडण्याची कला या गुणांच्या बळावर बाबर लहानाचा मोठा झाला. रंकाचा राव होत गेला. रणनैपुण्य आणि कडवी शिस्त यांच्या जोरावर साऱ्या शत्रूंवर मात करीत त्याने यमुनेच्या तीरी मोंगल साम्राज्य स्थापन केलं.

समरकंद जिंकल्यावर बाबरने शैबानीखानाच्या संभाव्य आक्रमणास तोंड देण्याची जय्यत तयारी केली. सिरइपूल या ठिकाणी शैबानीखान चालून आला. चार मैलांच्या अंतरावर उभय पक्षांच्या छावण्या पडल्या. दिवसा, रात्रीं तुरळक चकमकी झडू लागल्या. बाणांचा वर्षाव करून शैबानीखानाचे सैनिक बाबराच्या सैन्याला बिथरवून टाकीत होते. बाबराने या वेळी मुद्दामच बचावाचे धोरण स्वीकारले होते. बाहेरून येणाऱ्या जादा कुमकेची तो वाट पाहात होता. पण शेवटी सैन्याचा धीर खचू नये म्हणून त्यानेच युद्धाला तोंड फोडले. चिलखतं चढवून व घोड्यांना लोखंडी जाळ्या घालून बाबरचं सैन्य हल्ला करण्यास पुढे सरसावलं. शत्रूही चालून आला. तुंबळ युद्ध सुरू झालं. सैन्याच्या मध्यभागी राहून बाबर लढू लागला. त्याच्या डाव्या उजव्या बाजूचे सैनिक शत्रूवर तुटून पडले. पण एवढ्यात शैबानीखानाच्या काही तुकड्या लांब वळसा घालून बाबराच्या पिछाडीला आल्या व त्यांनी बाबराला पुरतं घेरलं. उझबेग सैनिकांच्या शरसंधानामुळे बाबरच्या सैन्यात गोंधळ माजला. बाबर मोजक्या सैनिकांच्या मदतीने शत्रूच्या एका फळीवर तुटून पडून शर्थीने लढू लागला, पण त्याचं मोठं सैन्य गारद झाल्यामुळे त्याला शेवटी

कोहीक नदीच्या दिशेने पळ काढावा लागला. त्याने बेधडक नदीत घोडे घातले. निम्मी नदी त्याला पोहून जावी लागली. दोन-अडीच तासांनी नदी पार करून त्याने एका किल्ल्याचा आश्रय घेतला. दोन दिवसांनी शैबानीखानाने या किल्ल्याला वेढा घातला. बाबराने तो अटीतटीने लढवला. तटावरून बाणांचा वर्षाव करून त्याने शत्रूला पिटाळून लाविले.

शैबानीखान वस्ताद होता. त्याने बाबरचा पुन्हा पिच्छा पुरविला. किल्ल्याच्या आजूबाजूचा सर्व मुलूख काबीज करून त्याने नाकेबंदी केली. या आणीबाणीच्या प्रसंगातून सुटण्याचा एकच मार्ग होता; आणि तो म्हणजे शत्रूच्या हातावर तुरी देऊन निसटून जाणे व पुन्हा युद्धाची तयारी करणे. बाबराने हाच मार्ग चोखाळला. एका मध्यरात्री आई व बहिणीसह तो निवडक सैनिकांसह किल्ल्यातून निसटला. रात्र अंधारी होती. वाटेत ओढेनाले होते. पहाटेच्या वेळी बाबर कसाबसा कारबेगच्या टेकडी-नजीक आला. येता येता त्याची बहीण शैबानीखानाच्या हाती लागली. पाठलाग करणाऱ्या शत्रूला चकवून तो आपल्या साथीदारांसह वेगाने दौडत होता. दौडता दौडता घोड्यावरून तो अचानक खाली कोसळला. त्याला खूप मुका मार बसला. पण तातडी करून तो लगेच स्वार झाला व पुढे निघाला. मारामुळे डोळ्यांपुढे अंधारी येत होती. पोटात अन्नपाणी नव्हते. एका खेड्यात घोडा मारून त्याचे मांस खावे लागले. दिझक गावी पोचल्यावर मात्र त्याच्या जिवात जीव आला. शत्रूने त्याचा पिच्छा करण्याचा नाद सोडून दिला. एका उंच पहाडावरील खेड्यात बाबराने आता आश्रय घेतला. तिथल्या खेडुतांना त्याने आपलेसे केले. या खेड्यात शंभरी ओलांडलेली एक म्हातारी होती.ही म्हातारी बाबराला तैमूरलंगाच्या गोष्टी सांगे. तैमूरने हिंदुस्थानावर कशी स्वारी केली हे म्हातारीच्या तोंडून बाबर प्रथमच ऐकत होता. बाबर आपला दिवसाचा वेळ डोंगर-दऱ्यांतून हिंडण्यात घालवी, तर रात्री आपल्या सहकाऱ्यांबरोबर लढण्याचे

७२८७६ ... ३८८२ २०१३०९


मनसुबे रची. निसर्गाशी रमण्यात बाबराला फार मौज वाटे. रानोमाळ भटकताना त्याचं कविमन फुलून येई. मसीखाच्या डोंगरी भागात हिंडता हिंडता एक झरा पाहून तो इतका खुलला की, तिथे जवळ पडलेल्या एका शिळेवर त्याने एक उत्स्फूर्त कविता कोरली. थोडया दिवसांनी बाबराने हे ठिकाण सोडले व खोजंद नदी ओलांडून तो ताश्कंदला आपल्या मामाच्या आश्रयाला आला. राज्यहीन अवस्थेत तो इथे आला होता. तथापि त्याचं मन खचलं नव्हतं. नव्या संधीची वाट पाहणे व कर्तृत्वाच्या नव्या नव्या वाटा शोधणे यात तो रमून गेला. चीनला जाण्याची धाडसी कल्पना त्याच्या मनाला इथेच शिवून गेली. पण सुलतान तांबूलची ताश्कंदवर स्वारी झाल्यामुळे बाबराचा बेत बदलला. मामाच्या मदतीसाठी तो आपली तुकडी घेऊन लगेच लढाईला निघाला. तराफ्यांच्या मदतीने खोजंद नदी पार करून तो एकदम शत्रूच्या पिछाडीवर उतरला. गाफील शत्रूवर हल्ला करून त्याने ऊशत्चा किल्ला काबीज केला. या किल्ल्यावर त्याने आपला पाय पक्का रोवला. नवं सैन्य जमा केलं. त्या सैन्याच्या जोरावर आपली अंदेजान राजधानी पुन्हा घेण्याचं ठरविलं.

अंदेजान घेण्यासाठी सुलतान तांबूलसारख्या जबरदस्त शत्रूशी बाबराला लढावं लागलं. पहाटेच्या समयी तांबूलाचे शंभर सैनिक अचानकपणे बाबराच्या छावणीवर चालून आले. शत्रूचा गलबला ऐकताच बाबर ताडकन उठला व अंगरखा न घालताच तलवार उपसून स्वार झाला. आठ दहा विश्वासू सैनिकांना घेऊन तो छावणीबाहेर पडला. समोरून येणाऱ्या शत्रूवर बाण मारून तो त्यांना मागे पळवू लागला, पण शत्रूचा रेटा जबरदस्त होता. त्याने बाबराच्या टोळीला गाठलेच. तांबूल आणि बाबर यांचे थोडया अंतरावरून युद्ध सुरू झाले. तलवार आणि धनुष्यबाण घेऊन बाबर तांबूलावर तुटून पडला. अचूक नेम धरून त्याने एक बाण तांबूलावर सोडला. पण तेवढयात शत्रुसैनिकांकडून सूं सूं करीत एक बाण

आला व तो बाबराच्या मांडीत घुसला. याच वेळी तांबूलच्या तलवारीचा घावही त्याच्या डोक्यावर सपकन बसला. पण शिरस्त्राणामुळे जीव बचावला. डोकं मात्र गरगरू लागलं. दोन-चार सैनिकांशिवाय बाबराजवळ या वेळी कोणी नव्हतं. त्याची गंजलेली तलवार म्यानातून लवकर न निघाल्यामुळे तिचा वेळेवर उपयोग होऊ शकला नाही. लढाईच्या भाऊगर्दीत त्याने चटकन लगाम फिरविला व आपली सोडवणूक करून घेऊन तो पसार झाला. वाटेत आलेली नदी जखमी अवस्थेत देखील त्याने पार केली. मामाच्या छावणीत तो पोचला तेव्हा मामाने त्याची पाठ थोपटली. हकीमाला बोलावून त्याच्या जखमा बांधल्या.

तांबूलाने केलेली जखम बाबराच्या मानी मनाला फार लागली होती. अंदेजान घेण्याची खटपट त्याने सोडली नाही. बरा होताच त्याने पुन्हा शस्त्र हाती घेतलं. अंदेजान शहराच्या बाहेर तुंबळ युद्ध पेटलं होतं. या युद्धप्रसंगी बाबराने प्रतिकूल परिस्थिती असताना देखील जे अतुल शौर्य-धैर्य दाखविलं त्याची प्रशंसा करावी तेवढी थोडी आहे. बाण लागल्यामुळे मांडीखालचा घोडा चौखूर उधळला व बाबर नेमका शत्रुसैन्यात जाऊन पडला. प्रणावर बेतण्याचा हा प्रसंग होता. पण प्रसंगावधानी बाबर तसाच उठून धनुष्यबाणाने लढू लागला. लढता लढता काहील नावाचा त्याचा नोकर दौडत दौडत त्याच्या मदतीला आला. त्याने आपला घोडा धन्याला दिला. हा घोडा लढण्याच्या दृष्टीने कुचकामी होता. बाबर निरुपाय म्हणून त्याच्यावर स्वार झाला, आणि तलवारीचे हात फिरवीत शत्रूच्या फळीतून निसटला. पळता पळता बाण सोडून त्याने कित्येक शत्रूंना घायाळ केले. स्वतः चिलखत अंगात असल्यामुळे शत्रूच्या बाणांची त्याला परवा नव्हती. किल्ल्याच्या तटाला भिडणाऱ्या शत्रूंवर तो आपल्या तुकडीसह पुन्हा तुटून पडला. त्याच्या अचूक शरसंधानामुळे कित्येकजण गतप्राण झाले. एका शत्रुसैनिकाची टोपी बाण घुसून जी उडाली ती

बाणासह तटावर रुतून लोंबकळत राहिली. दुसऱ्या एकाला तर बाबराने तलवारीच्या फटकाऱ्याने खाली लोळविले. विजयाची सुतराम आशा नसताना तो लढत होता. शत्रूचा वेढा उठवण्यात जरी नाही तरी तो खिळखिळा करण्यात त्याला या प्रसंगी मोठं यश लाभलं.

शत्रूचे घाव झेलत झेलत बाबराची वाट अंतिम विजयाकडे चालू होती. पराभव होत होते, सैनिक सोडून जात होते, तरी त्याची मनोवृत्ती कधी पराभूत झाली नाही. पराभवांपासून तो योग्य ते धडे घेत होता. शत्रू-कडून शिकण्यासारखं होतं तेवढं शिकत होता. युद्धाचे नवे नवे डावपेच तो याच पराभवांच्या काळात शिकला. बाबर शूर होता पण आडदांड नव्हता. तो पराभवाने खचत नसे की विजयाने शेफारत नसे. शत्रु-सैनिकांप्रमाणे त्याने आपल्या सैनिकांना कधी लूट करू दिली नाही. लुटीसाठी चाकरी करणाऱ्या स्वार्थी सैनिकांना तो कडक शासन करी. लूट मिळाली नाही की अनेकदा त्याचे सैनिक बंडखोरी करून शत्रुपक्षाला मिळत. बाबराला त्यांची मुळीच परवा वाटत नसे. त्याचा स्वभाव उदार, कनवाळू व रसिक असल्यामुळे जिंकलेल्या प्रदेशातील लोक त्याला मनोभावे मदत करीत. धर्माच्या बाबतीत मात्र तो अतिशय कडवा होता. विजय मिळाला की तो अल्लाची प्रार्थना करी व त्याला दुवा देई. रोज नमाज पढण्यास तो कधी चुकला नाही. इस्लामच्या शत्रूंना त्याने कधी दया दाखविली नाही. पराकोटीचे क्रौर्य, दया आणि सोशिकपणा त्याने अनेक प्रसंगी दाखविला आहे.

समरकंद आणि कंदाहारवर कब्जा केल्यानंतर बाबर हिंदुस्थानकडे वळला. त्याच्या पराक्रमी आयुष्याचा आरंभ पराभवांपासून झाला, तर उत्तरार्ध विजयाच्या घोडदौडीत गेला. हिंदुस्थानवरील स्वारीत त्याने प्रथमच बंदुका आणि तोफांचा वापर केला. शत्रूच्या डाव्या उजव्या बगला मारून त्याच्या पिछाडीवर जायचे व मग चारी बाजूंनी हल्ला

करून त्याची धूळधाण उडवायची हे नवे युद्धतंत्र तो अनुभवाने शिकला होता. पानपतला इब्राहीम लोदीच्या लाख फौजेचा त्याने याच तंत्राच्या जोरावर दिवसभरात धुव्वा उडविला.

हिंदुस्थानात येण्यापूर्वी बाबराने काबूलचे राज्य पादाक्रांत केले. तेथून हिंदुस्थानकडे वळताना बाजूरच्या छोट्या राज्यावर त्याने हल्ला केला. बाजूरच्या लोकांनी किल्ल्याचा आश्रय घेतला होता. तो किल्ला घेण्यासाठी बाबराला जंगी लढाई करावी लागली. बंदुका आणि धनुष्य-बाण ही त्याच्या सैन्याची हुकमी शस्त्रं होती. या शस्त्रांच्या भडिमारापुढे बाजूरचे अडाणी लढवय्ये लोक चार तास टिकू शकले नाहीत. सुरुंग लावून किल्ल्याला खिंडारं पाडण्यात आली. कित्येक सैनिक शिड्या लावून तटावर चढले. त्यांच्या शरसंधानापुढे आणि बंदुकींच्या पुढे शत्रू टिकावच धरीना. किल्ला हां हां म्हणता बाबराच्या ताब्यात आला. कैदी झालेल्या शत्रुसैनिकांना आणि त्यांच्या बायकामुलांना त्याने कठोरपणे शासन केले. जे इस्लामविरोधक होते त्यांची मुंडकी छाटण्यात आली. विजयोन्मादात तीन हजार मृत सैनिकांच्या कवटयांचा त्याने एक स्तंभ उभारला. युद्धात विजय मिळाला की बाबर नमाज पढत असे आणि दारूचे प्यालेही रिकामे करीत असे; आणि नाचगाण्याच्या मैफली हा त्याचा विरंगुळा होता.

बाबराच्या अंगी सोशिकपणा आणि मनाचा मोठेपणा किती होता यासंबंधी एक हकीकत सांगण्यासारखी आहे. एकदा ऐन थंडीच्या दिवसांत तो एका स्वारीवर निघाला. वाटेत प्रचंड हिमवृष्टी सुरू झाली. सगळीकडे गुडघ्याइतकं, कमरेइतकं बर्फ साचून राहिलं. घोडे चालेनासे झाले. वाटा सापडेनात. वाटाडे वावचळून गेले. आठ दिवस बर्फाळ प्रदेशातून बाबराला जावं लागलं. आश्रयाला जागा म्हणून सापडेना. उष्णतेसाठी लाकडं मिळेनात. बर्फात रुतलेली पावलं बाहेर काढता काढता सर्वांचे जीव मेटाकुटीला आले. हिमवर्षावाला वाऱ्याने साद

घातल्यामुळे थंडीने प्राण गोठण्याची वेळ आली. पण या थंडी-वाऱ्यातही आपल्या घोडयांना ओढीत ओढीत बाबर अंजुकन गावाजवळ पोचला. तेथे त्याला एक गुहा आढळली. गुहेकडे जाणारा रस्ता अरुंद होता. वेळ सायंकाळची होती. सर्वजण धीमेपणाने पावलं टाकीत गुहेजवळ आले. बाहेरचा वर्फ फावडी मारून हटविण्याची ते शिकस्त करू लागले. झोंबऱ्या वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी बाबर छातीइतक्या खोल खड्डयात जाऊन बसला. त्याच्या अंगावर बर्फ पडतच होतं. हाताखालच्या शिपायांनी त्याला गुहेचा आश्रय घेण्याची विनवणी केली, पण बाबराने नकार दिला. तो म्हणाला, ' तुम्ही सारे बर्फात रुतणार, कुडकुडणार आणि मी तेवढा गुहेत जाऊन आरामात पडू काय ? छे, छे, हे होणार नाही. तुमच्या दुःखात सहभागी होणे माझे कर्तव्य आहे. मित्रांच्या संगतीत मृत्यू-सुद्धा मेजवानीसारखा वाटतो. ' थोडया वेळाने गुहेची पहाणी करून काही सैनिक आले तेव्हा कुठे बाबर त्या खड्डयातून उठला आणि त्यांच्या बरोबर गुहेच्या आश्रयाला गेला. सैनिकांवर अशी अपरंपार माया होती म्हणूनच पुढच्या आयुष्यात त्याला विजयावर विजय मिळत गेले.

पानिपतला इब्राहीम लोदीचा पराभव करून बाबर दिल्लीचा बादशहा झाला. पानिपतच्या युद्धात ग्वाल्हेरचा राजा विक्रमाजित लोदीच्या बाजूने लढत होता. पण लढता लढता तो ठार झाला, आग्ऱ्याला त्याचे लोक हुमायूनच्या पहारेकऱ्यांच्या हाती लागले. त्यांनी हुमायूनला, म्हणजे बाबराच्या मुलाला भारी नजराणा दिला. हिंदुस्थानचा विख्यात कोहिनूर हिरा याच नजराण्यात होता. बाबरकडे तो आता आल्यामुळे त्याच्या पराक्रमावर वैभवाचा जणू कळस चढला. त्याला पराभूत करून हिंदुस्थानबाहेर घालवून देण्याची कुणाला हिंमतच उरली नाही. चितोडचा राणा संग त्याच्याशी युद्ध करायला उभा राहिला, पण पराभूत झाला.

बाबरने हिंदुस्थानवर तीनच वर्षे राज्य केले. प्रजाहितदक्षतेने कारभार करून त्याने हिंदुस्थानी रयतेची प्रीती संपादन केली. त्याच्या जीवितातल्या लढाया, कष्ट संपले होते. दारूसारखं व्यसन सोडून त्याने विलासभोगांना रजा दिली. तो आपलं जीवन लोकोपयोगी कृत्यांत व धार्मिक आचरणात घालवू लागला. नव्या इमारती बांधणे, रस्ते तयार करणे, बागा लावणे, पशु-पक्षी पाळणे व शिकार करणे, गंगेत, यमुनेत मनसोक्त पोहणे असे विविध छंद त्याला जडले होते.

बाबराचे आपल्या थोरल्या मुलावर – हुमायूनवर – फार प्रेम होते. हुमायून तरुण, विलासी व हूड होता. तो चांगला निपजावा म्हणून बाबराने त्याला एक उपदेशपर पत्र लिहिले. या पत्रातील काही महत्त्वाचा भाग असा : “ बाबारे, तुझे दिवस आरामाचे नाहीत. सामर्थ्यसंपादनाचे आहेत. राज्यपद आणि भोगविलास कधी एकत्र नांदत नाहीत. फौजेकडे लक्ष पुरव. कर्तृत्ववान आणि कीर्तिमान हो. ” आग्र्याला हुमायून आजारी पडला होता. काही केल्या त्याला गुण येईना. मृत्युपंथाला लागलेल्या लाडक्या लेकासाठी बापाचा जीव तीळतीळ तुटू लागला. अल्लाची प्रार्थना निरुपयोगी ठरली होती. पण एवढ्यात एका फकिराने सुचवलं की हुमायूनचा जीव वाचविण्यासाठी कुणीतरी आपल्या जिवाची कुर्बानी केली पाहिजे. बाबर या त्यागाला तत्क्षणी तयार झाला. पोराच्या बिछान्याभोवती फेऱ्या मारीत त्याने अल्लाची करुणा भाकली, ‘ मला घेऊन जा, पण मुलाला वाचीव. ’ आणि काय आश्चर्य ! यमदूत पसार झाले. हुमायूनला बरं वाटू लागलं. नव्या उत्साहाने तो कारभारात लक्ष घालू लागला.

बाबर मात्र या घटनेनंतर आजारी पडून लवकरच पैगंबरवासी झाला ! त्याच्या इच्छेप्रमाणे त्याचे मृत शरीर काबूलला नेण्यात आले व एका उंच पठारी निसर्गरम्य जागेवर त्याचा दफनविधी झाला. पुढे शहाजहान बादशहाने त्या जागेवर एक सुंदर भव्य कबर बांधली.

▣ ▣ ▣



३

# राणी दुर्गावती

अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरात झाशीची राणी लक्ष्मीबाई इंग्रजांशी लढता लढता रणांगणात मृत्यू पावली. अकबर बादशहाच्या काळी, म्हणजे सोळाव्या शतकात अशीच एक राणी स्वराज्यासाठी लढली आणि रणांगणावर मृत्यू पावली.

या राणीचं नाव होतं दुर्गावती. साक्षात दुर्गाच होती ती. दिसण्यात

जितकी सुंदर, वागण्यात जितकी सद्‌गुणी, तितकीच राजकारणात मुत्सद्दी आणि युद्धकारणात शूर. दुर्गावतीच्या वीरमरणाला आता चारशे वर्षे होतील. राणी लक्ष्मीबाईच्या मानाने तिची स्मृती पुसट होत चालली आहे. पण असे होता कामा नये. दुर्गावती ही भारताच्या इतिहासातील एक तेजस्वी तारका आहे. तिचं स्मरण निरंतर ठेवलं पाहिजे.

दुर्गावती ही मध्य प्रदेशातील गोंडवनची राणी. या गोंडवनाला पूर्वी गढमंडळ म्हणत असत. नर्मदेच्या काठी, जबलपूरच्या आसपास गढमंडळाचं राज्य होतं. दुर्गावतीच्या काळी या राज्यातला प्रदेश जंगलांनी नी लहानमोठ्या टेकड्यांनी व्यापलेला होता. राज्यात जिथे सुपीक भाग होता तिथे धनधान्य चांगले नी भरपूर पिके. नजीकच माळव्याचा भाग होता. आजूबाजूला अनेक छोटीमोठी राज्यं होती. मुसलमान सुभेदारांचे सुभे होते. रजपूत आणि गोंडवंशीय राजेरजवाडे आपापल्या राज्यांत स्वाभिमानाने, सुखासमाधानाने नांदत होते. पण राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षेने पेटलेल्या दिल्लीपती अकबर बादशहाला हिंदूंची ही राज्यं डोळ्यात सलू लागली. रजपुतांची राज्ये गिळंकृत करण्याचा त्याने विडा उचलला. सामदंडभेदादी नीती वापरून अनेक राज्यं त्याने आपल्या टापेखाली आणली. अकबराच्या बलापुढे सर्वजण नांगी टाकू लागले. अपवाद फक्त दोघांचाच. एक राणा प्रतापचा आणि दुसरा म्हणजे राणी दुर्गावतीचा. ‘ मोडेन पण वाकणार नाही ’ अशा जातीची ही मानिनी स्त्री होती. अकबर केवढा महापराक्रमी सम्राट ! पण त्याच्यापुढे ती ताठ उभी राहिली. शर्थीने लढली. पराभवाचा प्रसंग येऊनही तिने पाठ दाखविली नाही की आपल्या अनमोल देहाला म्लेच्छांचा पापी स्पर्श होऊ दिला नाही. राणी लढत राहिली आणि लढता लढताच तिने आपली तेजस्वी जीवनज्योत मालवून टाकली.

दुर्गावतीच्या पित्याचं नाव होतं किरातसिंग. हा महोबाचा शेवटचा

राजा. उच्च कुलातला आणि मोठा शूर मर्द होता. आपली कन्या दुर्गा लग्नाची होताच त्याने वरसंशोधन सुरू केलं. पण नवयौवना दुर्गा आधीच मोठी सुंदर, सतेज आणि चतुर होती. पित्याला कळू न देता तिने एका राजपुत्राला मनातून वरलं होतं. हा राजपुत्र म्हणजे संग्रामशहाचा देखणा, पराक्रमी पुत्र दलपतशहा. वधूवरांनी एकमेकांना मनापासून वरल्यानंतर त्यांच्या विवाहाला खरं म्हणजे अडथळा यायला नको होता. पण जुन्या काळी कुलगोत्राच्या उच्च-नीच कल्पनांना लोक फार महत्त्व देत. त्या कल्पनाच या विवाहाआड आल्या. महोबाची राजकन्या गढमंडळाच्या राजपुत्रास देण्यास किरातसिंगाचा दरबार तयार होईना. लग्नात विघ्न उभं राहिलं. दुर्गा अस्वस्थ झाली. मन मारून दरबारी इच्छेपुढे मान तुकवणं तिच्या जिवावर आलं. तशी ती मोठी समंजस, चतुर वीरकन्या होती. रामायण-महाभारतातल्या गोष्टी तिने ऐकलेल्या होत्या. तिने खूप विचार केला आणि मग तिला एक युक्ती सुचली. दूतामार्फत तिने दलपतशहास एक गुप्त संदेश धाडला :

'राजाधिराज, मी संकटात आहे. मी तुमच्या नुसत्या सौंदर्यावर, ऐश्वर्यावरच नव्हे तर पराक्रमावरही लुब्ध आहे. कृष्णाप्रमाणे किंवा अर्जुनाप्रमाणे माझं हरण करा. माझी लाज राखा. अन्यथा विषप्राशन करून मला अग्निनारायणाला वरावं लागेल.'

प्रियतमेचा हा आर्त संदेश ऐकताच दलपतशहाने युद्धाची सिद्धता केली आणि अनुकूल संधी येताच किरातसिंगाच्या राज्यावर तो चालून गेला. या रणयुद्धात किरातसिंगाचा मोड झाला. दलपतशहा दुर्गावतीला घेऊन आपल्या राज्यात परतला. महोबाची चंदेल राजकन्या आता गढमंडळाची राज्ञी झाली, सारं गोंडवन नव्या राणीच्या पायगुणाने नव्या डौलानं बहरू लागलं.

गोंडवनाच्या चिमुकल्या राज्यात कशाचीच कमतरता नव्हती. राज्याला दुष्काळ माहीत नव्हता. धनधान्य भरघोस पिकत होतं. नर्मदा

घनगंभीर आवाज करीत संथपणे वाहत होती. तिच्या काठचे संगमरवरी खडक सूर्यप्रकाशात चमकत, चंद्रप्रकाशात झिरपत. आजूबाजूच्या दाट जंगलांतून असंख्य पशु-पक्षी लीलेने विहरत. दुर्गावतीने राज्यात अनेक लहान मोठी तळी-तलाव बांधून घेतले. कमलपुष्पांनी नी हंसक्रीडांनी त्यांची शोभा वृद्धिंगत होत होती. राणीचं पतिप्रेम जसं अपूर्व होतं तसं तिचं प्रजावात्सल्यही अलौकिक होतं. दरबारात आधार कायस्थ आणि मन ब्राह्मण हे दोन मंत्री होते. त्यांच्या सल्ल्याने राणी कारभार पाही. एकच रुखरुख होती या साऱ्या ऐश्वर्यात. पण तीही कालांतराने दूर झाली. राणी पुत्रवती झाली. साऱ्या राज्याने पुत्रजन्माचा सोहळा रामजन्मोत्सवाप्रमाणे साजरा केला. दृष्ट लागावी असं गोंडवनचं भाग्य शिखराला पोचलं होतं.

पण एक दिवस खरोखर दृष्ट लागली राणीच्या ऐश्वर्याला. राणीवर अचानक वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. पाचसहा वर्षांच्या नारायणाला, आपल्या लाडक्या पुत्राला पोटाशी कवटाळून राणीने खूप आकान्त केला. पण असं रडत तरी किती दिवस बसायचं ? अश्रू कितीही वाहवले तरी देवाघरी गेलेलं माणूस परत येत नाही. दुर्गावतीने पोक्त विचार केला आणि ती कर्तव्याला लागली. पुत्र मोठा होईपर्यंत कारभार करणं तिला प्राप्त होतं. मोठ्या धीराने ती मंत्र्यांच्या सल्ल्याने कारभार करू लागली.

दुर्गावती मानी होती, सुज्ञ होती, शूर होती तशी प्रेमळ होती. न्यायदानाला ती स्वतः बसे. मांडलिक सरदारांना तिचा धाक वाटे. खंडणी देण्यात खळखळ करण्याची कुणाची हिंमत नव्हती. त्यामुळे तिचा खजिना कधी रिता नसे. राणीचं नाव ऐकलं की, चोर-दरोडेखोरांना कापरं भरे. राणीने आपलं सैन्य सुसज्ज ठेवलं होतं. या सैन्यात वीस हजार घोडदळ, पायदळ आणि एक हजाराचं स्वतंत्र गजदळ

होतं. स्वतः राणी अतिशय धैर्यवान आणि पराक्रमी होती. वेळप्रसंग आला तर सैन्याचं नेतृत्व करण्याची तिची हिंमत होती. राणी अचूकपणे बंदूक चालवी. नेम धरून बाण मारी. अधूनमधून हत्तीवर किंवा घोड्यावर स्वार होई आणि जंगलात जाऊन शिकार करून येई. कधीकधी ती आपल्या पुत्राला शिकारीला नेई. राज्याच्या जंगली प्रदेशात कधी कधी हिंस्र श्वापदांचा उपद्रव होई. अशा उपद्रवाची वार्ता राणीच्या कानी गेली की ती तत्काळ स्वार होत असे आणि त्या हिंस्र श्वापदाला ठार मारूनच परत येत असे. अशी वर्षामागून वर्षं चालली होती. सौंदर्य, ऐश्वर्य आणि शौर्य या तिन्ही बाबतींत दुर्गावती सुलक्षणी ठरली होती. पंधरा-सोळा वर्षांच्या कारकीर्दीत प्रजेला तिने कधीही असंतुष्ट होऊ दिलं नाही. प्रजेचं हित तेच आपलं हित असं ती मानीत होती. प्रजा तिला देवीसमान मानीत असे. प्रजेवर ज्या ज्या वेळी संकट कोसळलं त्या त्या वेळी ते निवारण्यासाठी राणी पुढे झाली.

माळव्याचा सुलतान बाजबहादर याने एकदा गोंडवनच्या राज्यावर आक्रमण करण्याचा यत्न केला. पण राणीने हे आक्रमण झपाट्याने निपटून काढलं. राणीकडून झालेल्या पराभवाचे शल्य बाजबहादरला इतकं सलत राहिलं कीं, कित्येक वर्षं कारभारातलं त्याचं लक्ष उडालं व सुखविलासात तो दिवस कंठू लागला. असं आक्रमण पुनः होऊ नये म्हणून राणी अधिक सावधपणे वागू लागली. पण आक्रमक वृत्तीला कोण पायबंद घालणार? १५६४ साल उजाडलं. त्या साली शहेनशहा अकबराची वक्रदृष्टी राणीच्या समृद्ध राज्याकडे वळली. गोंडवनावरचं या वेळचं आक्रमण अस्मानी होतं. हे राज्य गिळंकृत करण्यासाठी अकबर बादशहाने आसफखान नावाच्या विश्वासू आणि युद्धनिपुण सुभेदाराची निवड केली होती. खानाची जहागीर गोंडवनानजीकच होती. त्यामुळे त्याला राणीच्या राज्याची खडान्‌खडा माहिती होती.

वास्तविक राणी दुर्गावतीने अकबराचा कोणता अपराध केला होता? आपल्या छोट्या राज्यात ती गुण्यागोविंदानं राज्य करीत होती. ते राज्य तिनं चांगलं भरभराटीला आणलं होतं. या राज्यानजीक नांदणाऱ्या आसफखानाला राणीचं हे ऐश्वर्य बघवत नव्हतं हेच खरं. राणीच्या समृद्ध खजिन्याची त्याला हाव सुटली. राणीचं राज्य गिळंकृत करून अकबर बादशहाची मर्जी संपादण्यास तो अगदी उतावीळ झाला. राणी स्वाभिमानी, तेजस्वी असली तरी शांतताप्रिय होती. अकबर बादशहा आसफखानाला आपल्या राज्यावर स्वारी करण्यास पाठवील असं तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण सत्य हे स्वप्नापेक्षा आता खरं ठरलं होतं. राणीचा विश्वासघात झाला. अकबराने पुरता कावा साधला.

आसफखान मोठा पाताळयंत्री आणि शूर सुभेदार होता. प्रचंड फौज व तोफखाना घेऊन त्याने दुर्गावतीच्या राज्यावर आक्रमणास सुरुवात केली. प्रथम व्यापारी व गुप्त हेर पाठवून त्याने राणीच्या राज्यातील संरक्षणव्यवस्थेची वित्तंबातमी काढली. मोठमोठ्या रकमांची लाच देऊन राणीचे काही सरदार फितवून घेतले. प्रत्यक्ष हल्ला करण्यापूर्वी राणीला मानभावीपणे निरोप पाठविला, ' शरण ये, बादशहाची मांडलिक हो, तुझं भलं होईल. ' खान एवढ्यावर थांबता तर त्याचा भलेपणा दिसला असता. पण राणीला डिवचण्यासाठी त्याने एक सोन्याचा चरखा पाठविला आणि लिहिलं, ' स्त्रियोंका काम सूत कातने का है, राज्य करने का नहीं । '

खानाचा हा निरोप ऐकताच राणी खवळून उठली. संतापाने लाल झाली. समशेर म्यानाबाहेर उपसून ती आपल्या मंत्रिमहाशयांना म्हणाली, " मत्त खानाकडे आत्ताच्या आत्ता एक सोन्याचं पिंजणयंत्र पाठवा व त्याबरोबर एक निरोप द्या, " आम्ही सूत काढू, पण, त्यापूर्वी या यंत्रावर खानाने कापूस साफसूफ करून पाठवावा." हा खोचक, बाणेदार

निरोप कानी जाताच खान शरमला, संतापला. राणीशी लढावं लागणार अशी खात्री पटताच त्याने आपल्या फौजेला चालून जाण्याची आज्ञा दिली.

दुर्गावती सावध होती, सिद्ध होती. होत्या नव्हत्या त्या बळासह आक्रमण परतवून लावण्याचा तिने दृढनिश्चय केला. राणीने अंगात चिलखत चढवलं, डोक्याला शिरस्त्राण घातलं, कमरेला कट्यार लावली आणि धनुष्यबाण पाठीशी लटकावून ती आपल्या रणमस्त हत्तीवर आरूढ झाली. बहादुरीची गोष्ट म्हणजे आपल्या पुत्राला तिने बरोबर घेतलं. मंत्र्युत्तम आधार आणि गजसेनाप्रमुख अर्जुनदास यांना योग्य त्या आज्ञा देऊन ती युद्धाला उभी राहिली. राणी स्वतः लढणार हे पाहून तिच्या सैन्याला विलक्षण स्फुरण चढलं.

चढाई आसफखानाने केली. राणीचं सैन्य पुढे सरसावलं. दोन्ही सेना समोरासमोर आल्या. बाण वर्षू लागले. तोफा गर्जू लागल्या. बंदुका उडू लागल्या. तलवारीला तलवार भिडली. संग्रामपूरला पहिली चकमक उडाली. राणीला मागे हटावं लागलं. मग सिंगारगडाभोवती तुंबळ युद्ध पेटलं. दोन दिवस झाले तरी कोणी हटेना की विजयी होईना. दुसऱ्या दिवशी सायंकाळी खानाला काही रजपूत राजे येऊन मिळाले. राणीचे काही स्वार्थी सैनिकही खानाला फितूर झाले. स्वार्थासाठी स्वामिद्रोह, स्वराज्यद्रोह! अशा या स्वार्थी, भ्याड सैनिकांनी आणि स्वकीयांनीच राणीच्या यशात काटे पेरले. राणी लढतच होती आणि तिचे शेकडो सैनिक धारातीर्थी पडत होते. शत्रूच्या अफाट सेनादलाच्या माऱ्याने आपले सैनिक पडत आहेत, विव्हळत आहेत हे पाहून तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तिला आपला पराभव स्वच्छ दिसू लागला. लढत असता एका मंत्र्याने तिला स्पष्ट सुचवून पाहिलं, 'राणीसरकार, शत्रूचं बळ शतपट मोठं आहे. त्यापुढं निभाव लागणार नाही आपला. वेळीच सलोखा करा, नाही

तर व्यर्थ हानी होईल, राज्य बुडेल. कदाचित आपली अब्रू, जीव धोक्यात येईल.' पण त्या मानी झुंजार राणीला हा सल्ला पटेना. ती लागलीच म्हणाली, "पराभव जर होणार आहे तर मग शरण का जा? आता झुंजता झुंजता मरेन किंवा देवाची इच्छा असेल तर मरता मरता जिंकेन."


राणीचा हा युद्धोत्साह पाहून तिच्या सैनिकांना दुप्पट स्फुरण चढलं. खान तर तोंडात बोट घालून चकित झाला. राणी दमली आहे असं वाटून त्याने रात्री युद्ध आवरतं घेतलं. राणीचं चढाईचं, पुनः लढण्याचं धोरण तिच्या मंत्र्यांना व सेनापतीला रुचलं नाही. ते गर्भगळित झाले. पण राणीची हिंमत शाबूत होती. जिवाला जीव देणाऱ्या तीनशे सैनिकांसह ती शत्रूला अखेरचा तडाखा हाणणार होती. रात्री विंध्याचलातील एका खिंडीचा तिने आश्रय घेतला. उजाडताच अचानकपणे, विद्युल्लतेप्रमाणे शत्रू-वर तुटून पडायचं असा कठोर निश्चय करून ती घटकाभर झोपी गेली. पण तिला कसली झोप येते! रक्त, अश्रू, किंकाळ्णं, विव्हळणं, शस्त्रास्त्रं, रणवाद्यं, रणधुमाळी यांशिवाय तिला काहीही ऐकू येईना की दिसेना. साक्षात मृत्यूला आव्हान देण्यासाठी ती रणचंडिका जागत राहिली.

तिसरे दिवशी सूर्योदयाच्या आत राणीने आपल्या कडव्या सैन्या-निशी शत्रूवर झेप घेतली. शत्रूचा तोफखाना धाडधाड आग ओकू लागला. अग्निगोल चुकवीत चुकवीत राणीचा हत्ती बेधडक शत्रुसैन्यात घुसला. राणीने पहिल्या झपाट्यात शे-दीडशे मोंगल कापून काढले. रणचंडिकेचा तो क्रुद्ध अवतार पाहून आसफखान चकित झाला. त्याने लगेच घोडदळाला राणीच्या रोखाने हल्ला करण्याची आज्ञा दिली. या जोरदार हल्ल्यापुढे राणीचा माहूत बावरून गेला. हत्ती मागेपुढे सरू लागला राणी शत्रूकडून पुरी घेरली गेली. युद्धाच्या धुमश्चक्रीत तिचा पुत्र बाण लागून घायाळ झाला. राणी त्याला सावरते न सावरते तो

तिच्या डाव्या डोळ्यात एक बाण घुसला. तिने तो खसकन् उपटून टाकला आणि ती बेभान होऊन लढू लागली. चेहरा रक्ताने न्हाऊन निघाला तरी तिचा आवेश ओसरेना. आपल्या सैन्याला ' हाणा-मारा ' असं ओरडून ती चेतना देत होती. तिचं बरंचसं सैन्य गारद झालं होतं. अगदी मोजक्या सैन्यानिशी ती आता लढत होती. लढता लढता तिला घेरी येऊ लागली. मानवी प्रयत्नांची तिने पराकाष्ठा करून पाहिली. पण दैवच फिरलं. सारं आकाश जणू फाटून गेलं. राणीची शक्ती संपत आली. हातचं शस्त्र ढिलं पडू लागलं. यमदूत तिच्या आता जवळ आले होते. त्यांची चाहूल लागताच ती आवेशाने माहुताला म्हणाली, " वेदना सहन होत नाहीत रे आता. तुझा भाला माझ्या छातीत खुपस. " विचारा माहूत ! त्याची कसली छाती होते ! राणीला तो काही विनवणी करणार इतक्यात त्याच्याच छातीत बाण घुसला व तो धाडकन् खाली कोसळला.

आता मात्र राणीने सारी आशा सोडली. शत्रूकडून मरण्यापेक्षा किंवा जखमी अवस्थेत त्याच्या हाती सापडण्यापेक्षा आपणच आपल्या जिवाची कुर्बानी करावी असा निश्चय करून त्या वीरांगनेने कमरेची कट्यार उपसली....आणि खस्सदिशी आपल्या पोटात खुपसली. हत्तीवरच्या हौद्यात राणीला वीरमरण आलं. एक तेजस्वी तारका अस्तंगत झाली. राणी दुर्गावतीच्या वीरमरणाने संग्राम संपला. गढमंडळाचं स्वातंत्र्य लोपलं. गोंडवनाचं ऐश्वर्य लुटलं गेलं. नर्मदाकाठचे संगमरवर तडतडले. गोंडवन शोकवन झालं. दुर्गावतीच्या यशोदुंदुभी मात्र आजही त्या प्रदेशात दुमदुमत आहेत.

▣ ▣ ▣



४

# शिवरायास आठवावे

रणशिंग फुंकलं गेलं. टिपरी पडघमावर पडली. सिंहाचा छावा गुहे-बाहेर पडला. गरुडाचे पंख फडफडू लागले. प्रलयकालात करंगळी उभी करून कृष्ण उभा राहिला तसे शिवाजीमहाराज रोहिडेश्वराच्या मंदिरापुढे उभे राहिले. सभोवती मावळ्यांचे देशमुख-देशपांड्यांची, ब्राह्मण-प्रभूंची सेना जमली. येसाजी कंक, बाजी पासलकर, बापूजी नऱ्हेकर, कावजी

कोंढाळकर, जिवा महाला, बाघोजी तुपे, कान्होजी जेधे, मदारी मेहतर, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, मोरोपंत, नेताजी पालकर अशी एकापेक्षा एक गुणी माणसं शिवबाने जोडली. आपलीशी केली. त्यांच्या पराक्रमावर भिस्त ठेवून आदिलशाही पोखरण्यास आरंभ केला. त्यासाठी आणाशपथा झाल्या. अभयं दिली गेली.

मावळेगडी आपल्या ढाल-तलवारी-भाल्यांसह आदिलशाही सत्तेवर घण हाणू लागले. शिवबाला ते राजा मानू लागले. रोहिडा किल्ला काबीज केल्यावर आदिलशाही दरबाराकडून दादाजी नरसप्रभूस धमकी मिळाली. दादाजीचे वडील घाबरून गेले. पण शिवबांनी त्यांना धीर देऊन कळवले, 'चिंता करू नका. दादाजी कोंडदेवाच्या समक्ष आम्ही तुम्हांस अभय दिले आहे. त्यात अंतर होणार नाही. आजवर श्रीरोहिडेश्वराने आम्हांस यश दिले. हिंदवी स्वराज्याचे मनोरथ त्याच्या कृपाप्रसादानेच पुरे होणार आहेत. हे राज्य व्हावे हे श्रींच्या मनात फार आहे.' आदिलशाही धमकावणीस भीक न घालता स्वराज्याच्या पाईकांना आश्रय देण्याचं साहस करणारा हा छावा वीर अवघा पंधरा वर्षांचा होता. मिसरूड फुटायच्या या वयात त्याची आकांक्षा केवढी, हिंमत केवढी, आत्मविश्वास केवढा ! ध्येय प्रखर, तसेच उदात्त. या ध्येयाच्या सिद्धीसाठी सर्वप्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडायचे त्याने ठरविले. स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रबळ सत्ताधीशांबरोबर तो झुंजणार होता. कधी शक्तीने, तर कधी युक्तीने.

शिवाजीच्या काळी किल्ल्यांना फार महत्त्व होते. किल्ले म्हणजे सत्ता-केंद्रे, बलस्थाने. किल्ल्यांच्या आश्रयाने कारभार चालत असे. डोंगरावरचे गड असोत, भुईवरचे कोट असोत किंवा सागरातले दुर्ग असोत, ही सारी बलस्थाने म्हणजे कारभाराची आणि संरक्षणाची ठाणी. शिवाजीने

आदिलशाहीच्या ताब्यातील किल्ले घेण्यापासून आपल्या स्वराज्याच्या चळवळीला आरंभ केला. वयाच्या सतराव्या वर्षी परिस्थितीच अशी आली की, त्याला स्वतःचे कर्तृत्व प्रकट करणे भाग पडले. वडील शहाजी कर्नाटक प्रांती दूर होते. विजापूर दरबारात त्यांच्याविरुद्ध कारस्थाने शिजत होती. पुण्याच्या बाजूला दादाजी कोंडदेव जहागिरीची व्यवस्था पाहत होते. पण १६४७ च्या मार्च महिन्यात ते मृत्यू पावले. त्यांच्या पश्चात शिवबावर सर्व जबाबदारी पडली. ही जबाबदारी पडताच त्याचे स्वतंत्र कर्तृत्व फुलू लागले. आदिलशाहीच्या काळ्या छायेत वावरायला आता तो तयार नव्हता. धीर देऊन माणसं आपलीशी करणं, प्रसंगी त्यांना जरब बसवणं, आणि आवश्यक तर शस्त्र चालवणं या तिन्ही कला त्याला साध्य झाल्या होत्या. कोंडाणा ( सिंहगड ) किल्ला किल्लेदाराला वश करून त्याने मिळविला. पुरंदरचा किल्लेदार खळखळ करू लागला तेव्हा किल्लेदाराच्या भाऊबंदकीचा फायदा उचलून तो सरळ आपल्या मावळ्यांसह किल्ल्यावर चालून गेला व त्याने तो हस्तगत केला. हे दोन महत्त्वाचे किल्ले शिवाजीने घेताच आदिलशाही खडबडून जागी झाली. शहाजीवर दरबारची गैरमर्जी झाली. बंडखोर मुलाला शहाजी अंतःस्थपणे सामील असला पाहिजे असा संशय उत्पन्न झाला. मग त्याच्या दोघाही पुत्रांच्या बंदोबस्ताला फौजा पाठविण्यात आल्या. थोरला संभाजी बंगरूळची जहागीर संभाळून होता, तर धाकटा शिवाजी पुण्याकडची जहागीर स्वतंत्र करू पाहत होता. दोन किल्ले घेऊन शिवाजीने उघड उघड बंडखोरी केली होती. ही बंडखोरी मोडण्यासाठी विजापुराहून फत्तेखानाची रवानगी करण्यात आली.

फत्तेखानाला रोखण्यासाठी शिरवळच्या आदिलशाही ठाण्याच्या रोखाने शिवबाची सेना चाल करून निघाली. पुरंदरावर पाय रोवून शिवबा तिला मार्गदर्शन करीत होता. आदल्या दिवशी गडावरून

उतरलेल्या या सेनेने दुसरे दिवशी सूर्योदयापूर्वी शिरवळ ठाण्यावर हल्ला करण्यास आरंभ केला. मराठ्यांच्या लढायांतील 'हर हर महादेव' ची गर्जना प्रथम शिरवळला उठली. फत्तेखानाचा हस्तक बाळाजी हैबतराव याने गढीचा आश्रय घेतला होता. या गढीला शिवरायाची सेना भिडताच आदिलशाही दिवाभितं तटावरून मारा करू लागली. दगड-धोंडे, पलिते यांचा वर्षाव होऊ लागला. त्यांना वाटले, मावळे माघारी फिरतील. पण हे मावळे पोटार्थी लाचार चाकर नव्हते. शिवबाचे वीर होते. स्वराज्याचे, स्वातंत्र्याचे, स्वधर्माचे पाईक होते. निःस्वार्थपणे तळ हातावर शिर घेऊन ते शिवबाभोवती जमले होते. त्यांना आपली कातडी बचावण्याचं कारणच नव्हतं. शिवबाच्या आदेशाचं वेदमंत्राप्रमाणे ते पालन करणार होते. शत्रूच्या माऱ्याने ते हटले तर नाहीतच, पण त्यांनी आपल्या तिरकमठ्यांनी तटावरच्या मारेकऱ्यांवर असे अविरत शरसंधान केले की, तटावर उभं राहण्यास कोणी धजेना. पण एवढ्याने भागण्यासारखं नव्हतं. अर्धी लढाई अजून जिंकायची होती. काही मावळे वीर तटाला शिड्या लावून आत चढू लागले. काहीजण तटाला खिंडारं पाडू लागले. दोन्ही प्रयत्न यशस्वी होताच पुन्हा एकदा 'हर हर महादेव' ची गर्जना उठली. मावळे गीत शिरले. कापाकापीला सुरुवात झाली. शिवबाचा सरदार कावजी मल्हार आणि फत्तेखानाचा हस्तक बाळाजी हैबतराव यांची चांगलीच जुंपली. धुमश्चक्रीत बाळाजीची गर्दन केव्हा उडाली याचा पत्ताही लागला नाही. इंगळे, काटे, घाटगे, जगताप, वाघ आदी मावळ्यांनी भाले-तलवारींची अशी काही करामत दाखविली की आदिलशाही सैन्य गारद झालं.

शिरवळने शिवरायाला पहिली सलामी दिली. लुटून आणलेलं पहिलं धन, यशाचं धन मराठ्यांनी शिवबाच्या पायाशी वाहिलं. पण हे धन

आता जपणं वर्धिष्णू करणं प्राप्त कर्तव्य होतं. गाफील राहून चालण्या- सारखं नव्हतं. शिवबा जातिवंत नेता होता. अखंड सावधचित्त होता.

शिरवळच्या शिरकाणाच्या वार्तेने फत्तेखान प्रक्षुब्ध झाला. जातीनिशी तो पुरंदरावर चाल करून निघाला. फत्तेखान, मुसेखान, घाटगे, निंबाळकर यांच्या तुकड्या त्वेषाने गड चढू लागल्या. पण गडावरून होणाऱ्या माऱ्यामुळे त्यांच्यापैकी शेकडोजणांना खाली गडगडत यावं लागलं. दगडधोंडयांच्या माऱ्यातून निसटून जे वर सरकले त्यांची गाठ मराठ्यांशी पडली. शिवबाचे मराठे–मावळे इंच इंच जागा लढवू लागले. मुसेखान घायाळ होऊन पडला. घाटगे, नव्हे बाटगे पळत सुटले. एकटा फत्तेखान अवसान आणून लढला. पण मराठ्यांच्या रेट्यापुढे त्याची चढाई ढिली पडली. आदिलशाही फौजेला गडावरून हटवीत हटवीत मराठ्यांनी दूरवरपर्यंत त्यांची लांडगेतोड केली. फत्तेखान हात हालवीत माघारी फिरला. तिकडे बंगरूळकडे संभाजीने विजापुरी फौजेला असाच इंगा दाखवला. शहाजीपुत्रांच्या या पराक्रमामुळे विजापूर दरबार नरमला. कपटाने कैद केलेल्या शहाजीची दरबारला मुक्तता करावी लागली. इतकेच नव्हे तर त्याचा मानसन्मान करावा लागला. पुत्राच्या पराक्रमामुळे पित्याची मुक्तता होण्यास मदत झाली.

विसाव्या वर्षी जिंकलेल्या पुरंदरच्या लढाईमुळे आदिलशाहीने शिवाजीची धास्ती घ्यावी यात नवल नाही. पण दिल्लीचा मोंगल बादशहा आणि त्याचे दक्षिणचे सुभेदार यांनाही शिवाजीचा धाक वाटू लागला. आदिल- शाहीशी मुकाबला करीत असता शिवाजीने दुसरीकडे मोंगलांशी स्नेह राखण्याचा यत्न केला होता. विशेष म्हणजे मोंगल त्यांच्या या यत्नांना साद देण्याच्या तयारीत होते. पण काही कारणाने या वेळी युती जमू शकली नाही. शिवाजीला एकट्याच्या हिंमतीवरच आदिलशाहीशी सामना देण्याचा प्रसंग आला.

शिवाजीचे यापुढचे आयुष्य फार धावपळीत व दगदगीत गेले. अनेक सत्तांशी त्याला झुंजावं लागलं. राजकारणाचे डाव खेळावे लागले. दूरवर जाऊन स्वाऱ्या कराव्या लागल्या. युद्धं खेळावी लागली. लूट करावी लागली. छापे घालावे लागले. तह करावे लागले. शरण जाण्याचाही बहाणा करावा लागला. स्वराज्यासाठी तो हे सारं करणार होता. शिवाजीला आयुष्य लाभलं अवघं पन्नास वर्षांचं. या पन्नास वर्षांपैकी पस्तीस वर्षं स्वराज्यसाधनेपायी खर्ची पडली. या काळातील त्याच्या पराक्रमाची, साहसाची, संघटनकौशल्याची, बुद्धिचापल्याची, कारभारनिपुणतेची आणि उदार व्यापक दृष्टीची कितीतरी उदाहरणं सांगता येतील. ती सर्व सांगायची तर एक गाथा होईल ! त्या वीरगाथेतील मोजक्या स्फूर्तिदायक घटनासुद्धा शिवबाची अलौकिकता सिद्ध करण्यास पुऱ्या आहेत. वाऱ्याची चपलता आणि विद्युल्लतेचं तेज घेऊन महाराष्ट्राचा हा मेरू, महापुरुष जन्माला आला होता. त्याच्या विद्युत् हालचालींनी सह्याद्रीचा सारा आसमंत प्रकाशमान होऊ लागला. आदिलशाही डोलारा गदगदा हालू लागला. इंग्रज-पोर्तुगीज भयभीत झाले. मोंगल सम्राट चिंतामग्न झाले.

१६५९ च्या उत्तरार्धात शिवाजीला प्रथमच एका मोठ्या प्राणसंकटाला तोंड द्यावे लागले. आदिलशाहीच्या हुकुमाने अफजलखानासारखा आडदांड सेनापती मोठं सैन्य घेऊन कृष्णेच्या खोऱ्यात उतरला. शिवाजीला नष्ट करण्याचा किंवा जिवंत पकडून आणण्याचा त्याने विडा उचलला होता. त्याचं सामर्थ्य पाशवी होतं, वृत्ती क्रूर, कपटी होती. विजापुराहून वाईकडे येताना त्याने हिंदूंची अनेक पवित्र क्षेत्रे भ्रष्ट केली. धमकीशिवाय तो भाषा बोलत नसे. शिवरायांच्या जावळी मुलुखात आल्यावर त्याने चारी बाजूंना आपली फौज पाठवून राजांची नाकेबंदी केली. अफजलखानासारख्या बलाढ्य शत्रूशी उघड सामना देणे राजांना शक्य नव्हते. ताकदीपेक्षा त्यांनी युक्तीवर, डावपेचांवर भर देण्याचे

ठरविले. प्रतापगडच्या आश्रयाला राहून गनिमी काव्याने खानाचा नक्षा उतरविणे हा एकच मार्ग त्यांना उरला होता.

अफजलखान जसा कपटी तसाच धूर्त, बिलंदर होता. शिवाजी लढाई टाळतो असं पाहून त्याने भेटीची तयारी दर्शविली. वकिलांमार्फत उभयपक्षी आधी बोलणी झाली. भेटीचा दिवस, जागा ठरली. कोणी कसे यावे, बरोबर कोणाला आणावे हे ठरले. १० नोव्हेंबर या दिवशी दुपार टळल्यावर प्रतापगडच्या माचीवर उभारलेल्या छोट्या मंडपात दोघांची भेट होण्याचे ठरले. गर्विष्ठ आणि कपटी खानाला वाटले, शिवाजीला आता हातोहात पकडीन किंवा त्याची गर्दन तरी मारीन. पण शिवाजी सावध होता. खानाचे कपट, त्याचा कावा, त्याचं सामर्थ्य त्याने पूर्ण हेरलं होतं. भेटीच्या आदल्या दिवशी शिवाजीने आपलं सैन्य प्रताप-गडाभोवतीच्या जंगलात ठिकठिकाणी पेरून ठेवलं. नेताजी पालकर आणि मोरोपंत पेशवे यांना चढाईची आज्ञा देऊन ठेवली. भेटीत आपलं बरं-वाईट झालं तर पश्चात् आपला पुत्र संभाजी याला राजा मानून सर्वांनी स्वराज्याचा लढा चालू ठेवावा अशी इच्छा प्रदर्शित केली. ही सारी सिद्धता करणे प्राप्त होते. कारण गाठ प्राणाशी होती. खानाच्या भेटीला जाणं म्हणजे मृत्यूच्या जबड्यात उडी घेण्यासारखं होतं.

१० तारखेला भेटीचा समय येताच शिवाजीमहाराज मोठ्या ऐटीने, धीमेपणाने गड उतरू लागले. सूर्य पश्चिमेकडे कलत होता. माचीवरच्या मंडपात अफजलखान आधीच येऊन दाखल झाला होता. उभय पक्षांचे वकीलही आत येऊन बसले होते. भेटीच्या कराराप्रमाणे दोन्ही बाजूंचे इतर दहा दहा रक्षक मंडपाबाहेर अंतराअंतरावर उभे होते. खानसाहेब शिवाजीला भेटण्यास अगदी उतावीळ झाले होते. त्यांची सारखी चुळबूळ चालली होती. पण एवढ्यात महाराज येऊन ठेपले सुद्धा. भेटीत सामोपचार होतो की दगाफटका होतो याबद्दल सर्वांनाच औत्सुक्य, चिंता वाटत होती.

शिवाजीची रुबाबदार मुद्रा, ऐटदार चाल नी झोकदार वेष पाहून खान चपापून गेला. भेटीसाठी शिवाजी पुढे येतो तो त्या धिप्पाड खानाने दोन हातांच्या पकडीत त्याला जवळ ओढले, त्याचं डोकं डाव्या हाताने दाबून धरलं आणि उजव्या हातातला खंजीर त्याच्या डाव्या कुशीत खुपसला. खरखर आवाज करीत तो खंजीर खाली सरकला. खानाच्या कपटाची ही प्रचीती येताच शिवाजीने मुसंडी मारून आपली सोडवणूक केली आणि आपली छोटी तलवार खसकन खानाच्या पोटात खुपसली. त्या तलवारीने खानाची आतडीच बाहेर आली. खान कोकलत कोकलत झोकांड्या देऊ लागला. इतक्यात त्याचा एक ब्राह्मण सेवक तलवार उपसून शिवाजीवर धावून गेला. पण तो वार शिवाजीने आपल्या तलवारीवर रोखला आणि दुसऱ्या लांब तलवारीने खानाचे मुंडके साफ उडवून टाकले. मंडपातील आरडाओरड व खणाखणी ऐकून बाहेरचे रक्षक आत धावले. शिवाजी त्यांना पुरून उरला. खानाचा रक्षक सय्यद बंडा वाघासारखा आत चालून आला. त्याचा वार शिवबाच्या शिरावर पडणार इतक्यात जिवा महालाने तो वार वरच्यावर उडवला व बंडयाला साफ लोळवले. ही झटापट चालू असताना खानाचे भोई त्याचा धडावेगळा पडलेला मुडदा पालखीत घालून उचलू लागले. पण मावळ्यांनी मुळी त्यांचे पायच सपासप कापून टाकले. खानाचं मुंडकं घेऊन शिवाजीमहाराज लगोलग गडावर गेले. तोफेचा इषारा देण्यात आला. गडाखालच्या आदिलशाही फौजेवर मराठ्यांची सेना चोहोबाजूंनी तुटून पडली. त्या फौजेला पळता भुई थोडी झाली. महाराजांना अमाप लूट मिळाली. ज्यांनी पराक्रम गाजवला त्यांना बक्षिसं दिली गेली. ज्यांनी शत्रुसैन्याला वाटा दाखवल्या त्यांना जबर शिक्षा ठोठावण्यात आल्या. अफजलखानाच्या वधामुळे आदिलशाहीचं 'नाक' कापलं गेलं. महाराजांचं घोडदळ आता नव्या आवेशाने आदिलशाही मुलखात शिर

कोल्हापूरनजीकचा पन्हाळा किल्ला पाहता पाहता महाराजांच्या हाती गवसला.

पन्हाळा हाती आला खरा, पण तो टिकवून धरण्यासाठी महाराजांना फार मोठी किंमत द्यावी लागली. आदिलशाही सत्ता स्वस्थ बसली नव्हती. उलट चिडून जाऊन ती दुप्पट ताकदीने महाराजांच्या नाशाला उद्युक्त झाली. सिद्दी जोहारासारखा बलाढ्य सेनापती पंचवीस तीस हजार सैन्य घेऊन पन्हाळ्याकडे आला. महाराज किल्ल्याचा कडेकोट बंदोबस्त करतात न करतात तोच त्याने वेढा घातला. महाराष्ट्राचा प्राण खरोखरच प्राणसंकटात सापडला. संकटं यायला लागली की ती एकामागून एक येऊ लागतात. महापुरुषाची कसोटी पाहतात. पन्हाळ्याचा वेढा उठवण्याच्या विवंचनेत आणखी एका विवंचनेची भर पडली. औरंगाबादचा सुभेदार शाइस्तेखान याने नेमक्या याच वेळी महाराजांच्या पुण्याकडील मुलुखावर स्वारी केली. अहमदनगरपासून तो जो निघाला तो प्रजेला उपद्रव देत थेट पुण्याला आला व लाल महालात त्याने मुक्काम ठेवला. दोन बलाढ्य शत्रूंनी महाराजांची कोंडी केली. आदिलशाही आणि मोंगल यांच्या कात्रीत ते सापडले. राजगडावर जिजामाता होती. पुत्राच्या काळजीने ती करपून जाऊ लागली.

महाराजांपाशी या वेळी सैन्य मोठं होतं. त्यांची ताकद, दरारा राज्यविस्तार वाढलेला होता. पण दोन सत्तांशी टक्कर देण्यास ते असमर्थ होते. पन्हाळ्याचा वेढा उठवून लावण्याचे त्यांच्या बाहेरील सैन्याने यत्न करून पाहिले. शाइस्तेखानाची अडवणूकही मराठ्यांनी ठिकठिकाणी करून पाहिली. पण सारे यत्न पाशवी बलापुढे फुकट गेले. तह करणे किंवा शत्रूला हुलकावणी देऊन जीव बचावणे याशिवाय महाराजांना मार्ग नव्हता. जीव बचावला तर आणखी तयारी करून शत्रूला ते खडे चारणार होते. तशी त्यांची हिंमत होती. पुरा आत्मविश्वास होता त्यांना.

तीन-साडेतीन महिने वेढयात अडकून पडल्यामुळे महाराज अस्वस्थ झाले. शाइस्तेखानाने पुण्याकडे मांडलेल्या धुमाकुळीमुळे त्यांना नीट झोप येईना. अखेर सिद्दी जोहारशी त्यांनी तहाची बोलणी लावली. शरण आल्याचा वहाणा केला. भेटीची तयारी दर्शविली. जोहार हुरळून गेला. शिवाजी नमला, शरण आला या वार्तेमुळे त्याचं सैन्य आनंदाने बेहोष झालं. पन्हाळ्याच्या वेढयातील शत्रूच्या छावण्या नाच-गाण्यात दंग झाल्या. शस्त्रं म्यान झाली. पहारे ढिले पडले.

आणि या बेसावध कारभाराचा फायदा घेऊन महाराज निवडक अशा सात-आठशे सैनिकांसह रात्रीच्या प्रहरी, भर पावसात गडावरून बाहेर पडले. रात्र चांदणी होती. वाटा विकट होत्या. शत्रूच्या हातांवर तुरी देऊन विशाळगडाकडे गुप्त प्रयाण करायचं होतं. विशाळगडाला पोचणं तरी बिनधोक होतं का ? नाही. तिथे आदिलशाहीचे हस्तक जसवंतराव दळवी आणि सूर्यराव सुर्वे वाटा रोखून बसले होते. महाराजांच्या हिंमतीची, चपळाईची, प्रखर ध्येयवादाची आणि त्यांच्या अनुयायांच्या निष्ठेची परीक्षा होती. विशाळगडाच्या रोखाने वेगाने चाळीस मैलांची मजल मारायची होती.

बेसावध, बेहोष शत्रूचं कडं फोडून महाराज एकदाचे निसटले. विशाळगडाच्या वाटेला लागले. डोंगरी वाटा, किर्र झाडी, रपरपणारा पर्जन्य यांची तमा न बाळगता बेगुमानपणे ते निघाले. हाती घेतलेल्या कार्यसिद्धीपुढे त्यांना जिवाची पर्वा नव्हती. हरलो तर नरकात जाईन, मेलो तर स्वर्गात जाईन आणि जिंकलो तर रायगडावर स्वराज्याचा वैकुंठ निर्माण करीन अशा जिद्दीने त्यांनी विशाळगडाकडे कूच केले. मग या सामर्थ्यवंताला अडवणार तरी कोण ? पाठीमागे सिद्दी मसूदचे स्वार येऊ लागले. त्यांना दुपारच्या प्रहरी गजापूरच्या खिंडीत बाजी-प्रभूने अडवले. महाराज गडावर पोचेपर्यंत या बलप्रभूने दोन-तीनशे

मावळ्यांच्या भरंवशावर खिंड झुंजत ठेवली. पाशची सत्तेचा रेटा निधड्या छातीने, ज्वलंत निष्ठेने, अपूर्व बहादुरीने रोखून धरला. सायंकाळी महाराज गडावर पोचल्याची तोफ कानी पडली तेव्हा कुठे बाजीचे लढणारे हात, रक्ताळलेला देह थंड पडला. पावनखिंडीतून सिद्दी मसूद आता विशाळगडला पोचला. पण महाराजांच्या सैन्याने जोरदार चाल करून त्याला पळवून लावले. आदिलशाहीची अब्रू धुळीला मिळाली. नाक मुठीत धरून शिवाजीशी तिला सलोखा करावा लागला. हा सलोखा झाल्यानंतर थोडी देखील विश्रांती न घेता महाराज शाइस्तेखानाच्या समाचाराला निघाले.

उंबरखिंडीच्या लढाईत त्यांनी मोंगली सैन्याचा फडशा पाडला. राजापूरला इंग्रजांची वखार लुटली. कोकणातील स्वराज्यद्रोही स्वकीयांचा नक्षा उतरवला. आणि नंतर एक दिवस ते अचानक पुण्यात आले. जिथे राजांचे बालपण गेले होते त्या लालमहालात शाइस्तेखान सुस्त होऊन पडला होता. चैत्रातील अष्टमी होती. रात्री सामसूम झाल्यावर महाराजांनी जातीने लालमहालावर छापा घातला. बरोबर तीन-चारशे कडवे सैनिक होते. महाराजांच्या जिवाला ते धक्का लागू देणार नव्हते. छाप्याची चाहूल लागताच पहारेकरी ओरडले. धावले. गडबडले. शाइस्तेखान, त्याची बायकामुलं भेदरून पळून जाऊ लागली. अंधारात आणि गोंधळात शत्रू-मित्र कोण हेही त्यांना उमगेना. त्यांच्यापैकी अनेकांना मराठ्यांनी कापून काढले. कापाकापीत खानाचा मुलगा, जावई, बायका अशी दहा-वीस मंडळी गारद झाली. जीव बचावून खान एका खिडकीवाटे पळून जाऊ लागला तोच शिवाजीराजांनी चित्त्यासारखी चपळाई करून त्याच्या हातावर वार केला. खानाच्या प्राणावर बेतले होते, पण बोटं गमावून तो पळून गेला. पुण्यात या प्रसंगी मोंगली सैन्य मोठं होतं. पण त्याला शिवाजीच्या या गुप्त, अचानक छाप्याची

५७२५८ ३६६९


वार्ता नव्हती. झालेला प्रकार कळताच ते सैन्य शस्त्रं घेऊन उठलं, पण शिवाजी आपलं कार्य संपवून केव्हाच पसार झाला. नव्या उद्योगाला लागला.

शिवाजीच्या जीवनातील यापुढचे एकेक रोमांचकारी प्रसंग म्हणजे संकल्पित स्वराज्यउभारणीचे एकेक मजबूत मजले होत. गुजराथेत सुरतेसारख्या संपन्न बंदरावर त्यांनी दोनदा स्वाऱ्या केल्या. मोंगलांना, इंग्रजांना, डचांना दहशत बसविली. मालवणनजीक सिंधुदुर्गाची उभारणी करून आरमारी युद्धतंत्राचा पाया घातला. पुरंदरच्या तहानंतर महाराजांनी औरंगजेबाच्या दरबारी आग्र्याला जाणे आणि तेथे अपमानास्पद वागणूक मिळताच पेटाऱ्यात बसून साहसी पलायन करणे यासारखी विस्मयकारी, स्फूर्तिदायक घटना आपल्या इतिहासात नाही. प्रसंग लढाईचा असो, स्वारीचा असो, छाप्याचा असो, तहाचा असो किंवा पलायनाचा असो, महाराज नेहमी शक्तियुक्तीने वागले. प्रत्येक प्रसंगी स्वतःचा जीव त्यांनी धोक्यात घातला. त्यांच्या अविश्रान्त श्रमाला शेवटी यश लाभले. आग्र्याहून सुटल्यानंतर शत्रूच्या तावडीत गेलेला जवळजवळ सारा मुलूख, किल्ले त्यांनी परत मिळविले. रायगडला थाटाने राज्याभिषेक करून घेतला. नवा शिवशक सुरू केला. नवे नाणे पाडले. विश्वाने वंदावी अशी आपली राजमुद्रा सर्वत्र उमटवली. कारभारभाषेसाठी फारसीऐवजी संस्कृत-मराठीची प्रतिष्ठापना केली. अष्टप्रधानांची नेमणूक करून स्वराज्याला घटना मिळवून दिली. योद्धा, मुत्सद्दी आणि शासनकर्ता या तिन्ही नात्यांनी ते यशस्वी ठरले. आदर्श ठरले. राज्याभिषेकामुळे मराठी जनताच नव्हे, तर त्या वेळच्या साऱ्या स्वदेशी, यावनी आणि जलचर परक्या सत्ता त्यांना राजा म्हणून गौरवू लागले.

रायगड राजधानी करून जे स्वराज्य मिळवायचं होतं ते मिळालं होतं. त्याचा थोडा विस्तार आणि संरक्षणव्यवस्था करायची ती बाकी

होती. त्यासाठी महाराज पुन्हा घोडदौडीवर निघाले. दक्षिणेकडे पार जिंजीपर्यंत त्यांनी धडक दिली. सावत्र भावाला–व्यंकोजीला–पोक्तपणाचा सल्ला दिला. बुडणाऱ्या आदिलशाहीला मोंगलांविरुद्धच्या लढयात आपल्या बाजूला वळविण्याचा यत्न केला. राज्यसत्तेच्या लोभापुढे दुरावलेल्या पोटच्या पोराला, संभाजीला सावरून धरण्याची कोशीस केली. या साऱ्या धकाधकीमुळे महाराजांचं अनमोल आयुष्य मात्र चंदनाप्रमाणे झिजत आलं. इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी या सागरी आक्रमकांना पायबंद घालण्याचे त्यांचे यत्न अपुरे राहिले. महाराजांना महाराष्ट्रच नव्हे, तर सारा हिंद परकी आक्रमणापासून मुक्त करायचा होता. पण ईश्वरी इच्छेपुढे त्यांना हात टेकावे लागले. दगदगीने ते आजारी पडले. १६८० च्या चैत्री पौर्णिमेला दुपारच्या प्रहरी शिवप्रभूंनी रायगडावर देह ठेवला. अवतार समाप्त केला !

▣ ▣ ▣



५

# रणधुरंधर बाजीराव

१९६५ सालच्या सप्टेंबर महिन्यात भारताच्या फौजा पाकिस्तानची सीमा ओलांडून लाहोरपर्यंत धडकल्या होत्या. सुमारे सव्वादोनशे वर्षांपूर्वी मराठ्यांच्या फौजांनी मोंगलांच्या दिल्लीला अशीच जबरदस्त आक्रमक धडक दिली व बादशहाची गाळण उडवून दिली.

महाराष्ट्रातून घोडदौड करीत निघालेल्या मराठी फौजेला रोखण्यासाठी

बादशहाने सादतखान, कुरूमुद्दिनखान वजीर, खान दुराण, मुहंमदखान बंकश, अबदुल मन्सूरखान, जयसिंग असे अतिरथी, महारथी आग्र्याच्या दिशेने रवाना केले. त्यांच्या दिमतीला पन्नास हजार फौज व भारी तोफखाना, उंट, हत्ती होते. या प्रचंड फौजेपुढे मराठे टिकणार नाहीत, पराभूत होतील, मागे फिरतील असे बादशहाला वाटत होते. दिल्लीच्या लाल किल्ल्यात बादशहा अगदी निर्धास्तपणे वावरत होता. मराठ्यांचं वाढतं सामर्थ्य खच्ची करण्याच्या मनोरथात दंग होता. पण १७३७ च्या रामनवमीच्या आदल्या दिवशी मराठी फौजा दिल्लीच्या परिसरात पोहोचल्याच्या खळबळजनक वार्तेने त्याचे सारे मनोरथ ढासळले. बादशहा गडबडून गेला. दरबार गोंधळून गेला. राजधानीत पळापळ, रडारड सुरू झाली. मराठे दिल्लीपर्यंत चाल करून आले ही वार्ता अगदी अनपेक्षित, आश्चर्यकारक होती. मोंगली सामर्थ्याचा पाडाव करून ही फौज दिल्लीपर्यंत मजल मारील यावर प्रथम कुणाचा विश्वास बसेना. मराठ्यांशी मुकाबला करता करता मोंगल सेना पराभूत झाली की काय या शंकेने राजधानीतलं सारं वातावरण व्याकुळ, गंभीर झालं होतं. जे अशक्य वाटत होतं ते प्रत्यक्षात घडलं होतं. यमुना ओलांडून मराठ्यांचे घोडे लाल किल्ल्यासमोर अकस्मात खडे राहिले. मोंगल बादशहाचा नक्षा उतरविण्यासाठी मराठी फौजा आता उतावीळ झाल्या होत्या. लाल किल्ल्याच्या दिशेने मराठी भाले सरसावले गेले. मराठी तलवारी परजल्या गेल्या. तमाम मराठी फौज बादशाही ऐश्वर्याचं गर्वहरण करण्यास सिद्ध झाली. दिल्लीची 'सुरत' करण्यासाठी मराठ्यांचे पराक्रमी हात शिवशिवू लागले. लुटीसाठी आणि जाळपोळीसाठी मराठे बहाद्दर सेनापतीच्या आज्ञेची वाट पाहत राहिले. रामनवमीच्या मुहूर्तावर दिल्लीदहनासाठी मराठ्यांची वानरसेना पवित्र्यात उभी राहिली. पण दिल्लीचं नशीबच या वेळी बलवत्तर !

आग्रा-मथुरानजीक मोगली फौजेला शिताफीने झुकांडी देऊन ज्याने मराठ्यांचा विजयी झेंडा दिल्लीपर्यंत आणला त्या रणशूर सेनानींने आपल्या फौजेला सबुरीचा सल्ला दिला. दिल्ली लुटणं, जाळणं, बादशहाला कैद्याप्रमाणे धरून आणणं, त्याचं तख्त खणून काढणं या वेळी मराठ्यांच्या हातचा मळ होता. पण सेनापतीला मराठ्यांचा हा अपूर्व विजय मलिन होऊ द्यायचा नव्हता. कारण संग्राम पुरता संपलेला नव्हता आणि राजकारणाची ध्येय-धोरणं सांभाळायची होती. 'राज्य बादशहाचं, सत्ता मराठ्यांची' हे शाहू छत्रपतींचं धोरण होतं. ते लक्षात ठेवून पराक्रम गाजवायचा होता. राज्यविस्तार करायचा होता. चौथाई-सरदेशमुखी वसूल करायची होती. खंडण्या गोळा करायच्या होत्या. करारमदाराने पूर्वी जे ठरले ते पाळूनच पुरुषार्थाची शर्थ करायची होती. दिल्लीला धडक देऊन मराठ्यांनी ही शर्थ केली होती. पराक्रमाची, रणनैपुण्याची मजल गाठली होती. छत्रपतींचं स्वराज्य शाबूत आहे, मराठे जिवंत आहेत, अजिंक्य आहेत हे एकदा मोंगलांना, त्यांच्या अंकितांना व इतर परकी सत्ताधीशांना दाखवून द्यायचं होत. बाजीराव पेशव्याने दिल्लीला धडक देऊन जगाला हे दाखवून दिलं. पराक्रमाने आणि संयमाने दाखवून दिलं.

छत्रपतींचा लढवय्या पेशवा, पंतप्रधान बाजीराव मोंगली फौजेचा अडसर ओलांडून यमुनापार होतो ही घटना अपूर्व होती. दिल्लीची यशस्वी मोहीम म्हणजे बाजीरावाच्या पराक्रमी आयुष्यातील परमोच्च बिंदू होता. त्याचे रणपांडित्य या मोहिमेत कसाला लागले होते. दि. १२ नोव्हेंबर १७३६ रोजी त्याने पुण्याहून कूच केले आणि नर्मदा, यमुना ओलांडून दि. २८ मार्चला तो दिल्लीच्या परिसरात येऊन पोहोचला. चार-साडेचार महिने त्याची अखंड घोडदौड चालू होती. वाटेत ठिकठिकाणी तो राजकारणाचे डावपेच खेळत होता. फौज जमवीत होता.

आडवे येणाऱ्या मोंगली अंमलदारांना सफा करीत होता. माळव्यात उतरून भोपाळला धडक देता देता यार मुहंमदखान प्रतिकाराला उभा राहिला. त्याचा समाचार घेण्याचे मल्हारराव होळकरांवर सोपवून तो पुढे निघाला. वाटेत येणाऱ्या शत्रुसैन्याशी लढण्यात वेळ न गमावता, शक्य तो त्याला झुकांड्या देऊन दिल्ली गाठणं हे त्याचं उद्दिष्ट होतं. राजधानीत मराठे पोहोचले की मोंगल सत्ताधीशांचा धीरच खचेल, त्यांचा आत्मविश्वास नाहीसा होईल आणि मग नाक मुठीत धरून मराठ्यांशी ते तह करतील अशी अटकळ मनाशी बांधून तो युद्धाचं नेतृत्व करीत होता. अर्थात् प्रसंग पडला तर मैदानी युद्धालाही त्याची तयारी होती. पण होता होईतो संघर्षात आपली हानी होऊ न देता शत्रूच्या राजधानीत शिरूनच त्याची घाबरगुंडी उडवण्याकडे त्याचे लक्ष होते. दिल्लीच्या या मोहिमेत त्याची चाल आक्रमकी असली तरी त्या आक्रमणामागे काहीएक धोरण होतं, शिस्त होती. पंतप्रधान आणि सेनापती अशी दुहेरी भूमिका त्याला पार पाडायची होती. युद्धकौशल्याबरोबर मुत्सद्देगिरीही दाखवायची होती. भेलसा घेतल्यावर पूर्वसंकल्पानुसार राणोजी शिंद्यांची फौज त्याला येऊन मिळाली. जयसिंग हा वरकरणी मोंगलांचा पक्षपाती होता. पण आतून तो बाजीरावाच्या हालचालींना साहाय्य करीत होता. जैतपूरला बाजीराव पोहोचतो तो त्याला सादतखानाच्या नेतृत्वाखाली मोंगल सेना प्रतिकाराला आल्याचे कळले. आग्रा प्रांतात लढाईला तोंड पडणार हे स्वच्छ दिसू लागले. मराठ्यांची सारी फौज या लढाईत गुंतवण्यापेक्षा बाजीरावाने वेगळा मार्ग चोखाळला. यमुनेजवळ मोंगली सैन्याला गुंतवून ठेवण्यासाठी होळकराला त्याने आज्ञा दिली व स्वतः मराठी फौजेचा एक मोठा भाग घेऊन तो अन्य मार्गाने दिल्लीकडे निघाला. होळकरांच्या सैन्याला यमुनापार होताना मोंगलांशी अटीतटीने लढावे लागले. हजार बाराशे मराठे धारातीर्थी पडले. शेकडो यमुनेत बुडाले. होळकराला लढाईत जखम

झाली. मथुरेला मोंगली सैन्याने विजयोत्सव साजरा केला. मराठे हटले, मागे फिरले अशा गर्वाने ते फुगून गेले. पण इकडे होळकराला थोपवले तर तिकडे बाजीराव चपळाई करून दिल्लीला पोहोचलासुद्धा. सादतखानावर मराठी फौजेची एक टाप ठेवून दुसरी टाप त्याने बेधडक दिल्लीवर टाकली. दिल्लीला पोहोचताच बादशहाची पाचावर धारण बसली. तहासाठी त्याने मराठ्यांच्या वकिलास बोलावणे केले. पण बाजीरावाने नकार दिला. लुटीसाठी व जाळपोळीसाठी उतावीळ झालेल्या मराठी फौजेला त्याने आवरले. तालकटोऱ्यापर्यंत मागे फिरून त्याने छावणी दिली. बादशहा घाबरला – नमला असला तरी त्याचे सरदार व आग्रा–मथुरेकडची फौज अद्याप नमली नव्हती. मराठ्यांचा निकाल लावण्यासाठी ती फौज एकसारखी भिरभिरत होती.

अमीरखान, आमदखान, मुबारीझखान, मीरहसनखान आदी मातबर मोंगल सरदार मराठ्यांच्या छावण्यांवर हल्ले करू लागले. दिल्ली-तालकटोरा मार्गावर मोंगल-मराठ्यांच्या चकमकी झडू लागल्या. होळकर, शिंदे पवारादी मराठे सरदार मोंगलांशी शर्थीने लढू लागले. रिकवगंजात सटवाजी जाधवाने मोठा पराक्रम केला. राणोजी, मल्हारराव, पवारबंधू, पायगुडे, गोविंद हरी इत्यादींनी मोंगलांना धूळ चारली. सादतखानाची मोठी कुमक येण्यापूर्वीच मराठे दिल्ली गदगदा हालवून दक्षिणेकडे वळले. दिल्लीपासून वीस मैलांवर बाजीराव-मस्तानीचे घोडे भरधाव धावत असताना मोंगलांना दिसले. बाजीराव राजपुतान्यात उतरला. राजपूत राजांशी सख्य करून तो ग्वाल्हेरजवळ आला. सिरोंजजवळ त्याला निजामी फौजेच्या हालचाली दिसल्या. ज्या निजामाला पालखेडच्या लढाईत त्याने धूळ चारली होती तो निजाम मोंगलांशी हातमिळवणी करायला सिरोंजपर्यंत आला होता. पण या वेळी त्याचा समाचार घेण्यास बाजीरावाला सवड नव्हती. शाहू छत्रपतींच्या आज्ञेनुसार तो झपाट्याने

साताऱ्याकडे निघाला. साताऱ्यास येतो तो चिमाजीअप्पाने साष्टी घेतल्याची वार्ता त्याच्या कानी पडली. चिमाजी हा बाजीरावाचा पाठचा भाऊ. भावाप्रमाणेच शूर. लक्ष्मणाप्रमाणे भावाची सतत पाठराखण करणारा. दोघा बंधूंचे राम-लक्ष्मणाप्रमाणे एकमेकांवर प्रेम होते. बाजी-चिमाजीच्या पराक्रमाला, मातृप्रेमाला आणि बंधुप्रेमाला मराठ्यांच्या इतिहासात तरी तोड नाही. वसईला पोर्तुगीजांचा पराभव करून चिमाजीने बाजीरावाच्या शिरावरील एक मोठी जबाबदारी पार पाडली.

बाजीराव दिल्लीची मोहीम आटपून महाराष्ट्रात आला खरा, पण त्याला उसंत कशी ती मिळेना. मराठ्यांनी केलेल्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी बादशहाने निजामाला दिल्लीत पाचारण केले. निजाम हा मराठ्यांच्या सत्तेचा दक्षिणेतला सर्वांत मोठा वैरी होता. तो जितका शूर तितकाच महत्त्वाकांक्षी व गाताळयंत्री होता. छत्रपतींच्या पेशव्याचे वाढते सामर्थ्य त्याच्या डोळ्यांत सतत सलत होते. मागे छत्रपतींच्या राज्यात फूट पाडून त्याने पुण्यापर्यंत मजल मारली होती. गुजराथेत दाभाड्यांना हाताशी धरून त्याने पेशव्यांच्या पौरुषाला आव्हान दिले होते. पण बाजीरावाने पालखेडच्या व डभईच्या लढाईत दोघांना चारीमुंडे चीत केले. गुजरात, माळवा, बुंदेलखंडापर्यंत बाजीरावाने अशी विलक्षण घोडदौड मारली की तो अजिंक्य आहे हे आम हिंदुस्थानला कळले. आरंभी आरंभी बाजीरावाशी मिळतंजुळतं घेणारा निजाम पुढेपुढे मात्र त्याचा मत्सर करू लागला. बाजीरावाला नेस्तनाबूत करण्याची एकही संधी तो सोडीत नसे. पण प्रत्येक ठिकाणी बाजीरावापुढे त्याला हार खावी लागली. मराठ्यांच्या पाडावासाठी आता दिल्लीहून बोलावणं येताच तो मोठ्या उत्साहाने औरंगाबादेहून निघाला.

दिल्लीत निजामाचा मोठा आदरसत्कार झाला. बादशहाशी करार करून तो लगेच बुंदेलखंडात उतरला. बाजीरावाने जिंकलेले प्रदेश नी

वसुलाचे हक्क पायी तुडवणं हे एकच त्याचं ध्येय होतं. बुंदेलखंडात सादतखान त्याला येऊन मिळाला. काही बुंदेले सरदार मोंगलांची साथ करू लागले. पाहता पाहता भोपाळनजीक सत्तर हजार मोंगलसेना जमली. निजाम या सेनेचं नेतृत्व करीत होता. मराठ्यांना नामोहरम करण्यासाठी तो उतावीळ झाला होता. तोफखान्याच्या जोरावर मराठी घोडदळावर मात करू अशी त्याला घमेंड होती. बाजीरावाशी गाठ पडेपर्यंत त्याच्या या गमजा चालू होत्या.

आराम करणे बाजीरावाला तरी कुठे ठाऊक होते? स्वराज्याच्या रास्त हक्कांच्या जपणुकीसाठी तो छत्रपतींचा पेशवा झाला होता. या हक्कांची पुन्हापुन्हा पायमल्ली करणाऱ्या निजामाचा कायमचा सोक्षमोक्ष लावण्यास तोही आता तयार झाला. १७३७ च्या दसऱ्यानंतर बाजीरावाने उत्तरेकडे पुनश्च मोहीम काढली. निजामाला दक्षिणेकडून मदत येऊ नये म्हणून तापीजवळ वरणगावला चिमाजीची त्याने योजना केली. भोसले, गायकवाड, कवडे आदी सरदारांना इतर आघाड्या संभाळण्यास सांगितले. गुप्त हेर व वकील रवाना करून शत्रूचं सामर्थ्य हेरून ठेवलं. खानदेश आणि औरंगाबाद हे खास निजामाचे मुलूख. पण या मुलुखांतून त्याला कसलीही मदत मिळणार नाही याचा बाजीरावाने पक्का बंदोबस्त केला. शत्रूची कोंडी करणं , त्याला वारंवार हुलकावण्या दाखवणं, त्याच्या मुलुखात धुमाकूळ घालणं आणि सरतेशेवटी त्याची हाडं खिळखिळी झाली की मग त्याच्यावर शेवटचा घाव घालणं असं बाजीरावी युद्धतंत्र होतं. निजामाला लोळवण्यात त्याने मुख्यतः हेच तंत्र वापरलं. गनिमी काव्यापेक्षा मैदानी युद्ध तो अधिक पसंत करीत असे. जंजिऱ्याच्या सिद्दीला व पोर्तुगीजांना त्याने इतरांकरवी दमवलं, नमवलं. स्वतः कधी पुढाकार घेतला नाही. सूत्रं आपण हालवायची, पण लढाईची जबाबदारी हाताखालच्या सरदारांवर सोपवायची हे कोकण-किनाऱ्यावरील त्याचं धोरण होतं. पण मैदानी युद्धाचा प्रसंग आला

की तो स्वतःच पुढे व्हायचा व पुढे घुसून किंवा डावपेच लढवून शत्रूला नामोहरम करायचा. निजामावरील या अखेरच्या मोहिमेत बाजीरावा-जवळ ऐंशी हजार सैन्य होते. नर्मदा ओलांडून तो जेव्हा माळव्यात उतरला तेव्हा निजामाने भोपाळचा आश्रय घेतला. भोपाळच्या तटबंदीत स्वतःला सुरक्षित ठेवून तो बाजीरावाशी मुकाबला करणार होता ! बाजीरावाने त्याला बाहेर उघड्या प्रदेशात खेचण्याचा पुष्कळ यत्न केला, पण तो काही केल्या बाहेर येईना. तोफा डागून अधूनमधून मराठ्यांच्या सैन्याची थोडी हानी करण्यापलीकडे त्याला काही करता येईना. मराठ्यांचा गराडा उठविण्यासाठी त्याने दिल्लीला बादशहाकडे निरोपावर निरोप धाडले. पण काही केल्या दिल्लीहून वा दक्षिणेकडून त्याला मदतच येईना. बाजीरावाने त्याच्या नाड्या चारी बाजूंनी आवळून टाकल्या होत्या. सैन्याची मदत तर सोडाच, पण अन्न, दाणावैरण मिळण्याचीसुद्धा निजामाला मारामार पडू लागली. बाजीरावाने केलेली कोंडी, नाकेबंदी दिवसेंदिवस असह्य होऊ लागली. तोफखान्याच्या सरबत्तीत निसटून जाण्याचाही त्याने यत्न करून पाहिला. पण मराठे हल्ला करून त्याची चाल रोखू लागले. बाजीरावाशी समोरासमोर सामनाही देता येईना आणि भोपाळची कोंडीही सुटेना अशा दामटीत निजाम सापडला. रजपूत-बुंदेल्यांचं सैन्य त्याच्या मदतीला म्हणून आलं होतं. पण त्यालाही पश्चात्ताप होऊ लागला. तग धरवेना तेव्हा अखेर जयसिंगाच्या दिवाणामार्फत निजाम तहाला तयार झाला. पन्नास लाख खंडणी देऊन आणि माळव्यावरील मराठ्यांची सत्ता मानून त्याने आपली सुटका करून घेतली. कुराणाची शपथ घेऊन तहाच्या अटी त्याने मान्य केल्या.

भोपाळला निजामावर मिळवलेला विजय हा बाजीरावाच्या आयुष्यातला शेवटचा मोठा विजय. यानंतर निजामपुत्र नासिरजंगाचा त्याने नक्षा उतरवला. चिमाजीच्या पराक्रमामुळे पोर्तुगीजांच्या मगरमिठीतून वसईची


मुक्तता झाली. नादिरशहाची उत्तरेकडची स्वारी परतवून लावण्याचीही बाजीरावाने हिंमत बांधली होती. पण मराठयांच्या दुर्दैवाने त्याला आयुष्यच फार लाभलं नाही. उत्तरेच्या रोखाने चाल करीत असता नर्मदेच्या अलीकडे रावेरखेडी येथे तो आजारी पडला, आणि २८ एप्रिल १७४० रोजी युद्धछावणीत मृत्यू पावला.

मृत्यूसमयी या पहिल्या पराक्रमी बाजीरावाचे वय अवघे चाळीस होते. चाळिशीच्या आत त्याने अतुल पराक्रम केला. शाहूराजांच्या दरबारातील कचखाऊ मुत्सद्यांना त्याने गप्प बसविले. उत्तरेकडे राज्यविस्ताराचे स्वतंत्र धोरण आखले. जंजिरेकर सिद्दीसातांचा बंदोबस्त केला. पोर्तुगीजांना दमवलं. निजामाला नमवलं. गुजराथेत दाभाडयांच्या फितुरीला वेसण घातली. आंग्र्याना शाहूपक्षात आणलं. राजपूत राजांशी संधान बांधलं. बुंदेलखंडात बंगशाने चढाई करताच छत्रसालाची सुटका केली. मराठयांचा राज्यविस्तार पार गुजराथ, माळवा, बुंदेलखंडापर्यंत भिडवला. शिंदे, होळकर, पवार, जाधव, गायकवाड असे रणशूर सरदार–अंमलदार स्वतःच्या तालमीत तयार केले निरनिराळ्या स्वाऱ्या-मोहिमांत बाजीरावाने त्यांच्या कर्तृत्वाला भरपूर वाव दिला.

निजामाला साफ बुडवून टाकण्याची आणि दिल्लीची बादशाही पार उखडून टाकण्याची बाजीरावच्या अंगी धमक होती. तो तरुण, उत्साही, महत्त्वाकांक्षी, धाडसी–साहसी–पराक्रमी होता. स्वतःच्या हिंमतीवर व कर्तृत्वावर त्याचा जबर विश्वास होता. त्याची ध्येयदृष्टी व्यापक, प्रखर होती. दक्षिणेच्या सुरक्षिततेपेक्षा उत्तर काबीज करण्यात त्याला मराठ्यांचं हित दिसत होतं. उत्तरेच्या अफाट व संपन्न प्रदेशात मराठी फौज त्याने मोठ्या डौलाने नाचवली. मोहिमांपायी त्याचा पाय सतत कर्जाच्या कर्दमात अडकलेला असे. पैशापायी लढाया आणि लढायांपायी कर्ज या दुष्ट चक्रातून त्याची कधी सुटका झाली नाही. त्याच्या पराक्रमाला मर्यादा

नव्हती, पण अधिकाराला होती. छत्रपतींनी दिलेल्या मर्यादित अधिकारांत पुरुषार्थाची जेवढी मजल मारता येईल तेवढी त्याने मारली. राज्यविस्ताराच्या व्यापक युद्धकारणात जुने दरबारी मुत्सद्दी साथ देईनासे झाले तेव्हा बाजीरावाने स्वतःचे कर्तृत्व नी पराक्रम पणाला लावला. मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, पिलाजी जाधव, पवार बंधू, चिमाजीअप्पा असे मूळचे सामान्य गडी हाताशी धरून त्यांना नावलौकिकाला चढवले. बाजीरावासारखा पराक्रमी पेशवा न लाभता तर शाहूराजांचे दुबळे स्वराज्य किती वर्षे टिकले असते कुणास ठाऊक! महाराष्ट्राची वीरगाथा गाताना शिवाजीनंतर या बाजीचंच नाव घ्यावं लागतं.

▣ ▣ ▣



६

# जॉर्ज वॉशिंग्टन

अमेरिकेचा स्वातंत्र्यवीर जॉर्ज वॉशिंग्टन याचं घराणं मूळचं इंग्लंड-मधलं. त्याचा पणजा प्रथम अमेरिकेत आला व स्थायिक झाला. शेती-वाडी हा या घराण्याचा व्यवसाय होता. व्हर्जिनिया वसाहतीत या घराण्याने मोठी शेतीवाडी केली. वॉशिंग्टनचा बाप ऑगस्टिन फार उद्योगी व धाडसी मनुष्य होता. आपली वाडवडिलार्जित शेती त्याने खूप वाढविली

व तो चांगला श्रीमंत झाला. पहिली पत्नी वारल्यावर त्याने दुसरं लग्न केलं. या बाईला, म्हणजे मेरी बॉलला सहा मुलं झाली. त्यांतलं थोरलं मूल म्हणजेच जॉर्ज वॉशिंग्टन. २२ फेब्रुवारी १७३२ रोजी त्याचा जन्म झाला.

लहानपणी जॉर्ज फार हूड, चलाख, चौकस मुलगा होता. नदीत पोहणे, घोड्यावर बसणे, दंगामस्ती करणे या गोष्टींची त्याला भारी आवड. नदीतून ये जा करणाऱ्या मालवाहू बोटींकडे तो तासन् तास पाहत बसे. सातव्या वर्षी तो लिहू-वाचू लागला. त्याचं स्पेलिंग कच्चं असे. तथापि अक्षर सुंदर होतं. गणित हा त्याच्या आवडीचा विषय होता. लहानपणापासून वॉशिंग्टनचे दोन मुख्य गुण सर्वांच्या लक्षात आले होते; ते म्हणजे निर्भीडपणा आणि खरे बोलणे. तो बारा वर्षांचा झाला तेव्हा घरात अचानक आणखी दोन मुलं आली. ती त्याच्यापेक्षा वयाने खूप मोठी, म्हणजे चांगली तरुण होती. लॉरेन्स आणि ऑस्टिन अशी त्यांची नावं होती. वॉशिंग्टन त्यांच्याकडे जेव्हा कुतूहलाने पाहू लागला तेव्हा बापाने सांगितले, ' अरे जॉर्ज, हे तुझे थोरले सावत्र भाऊ आहेत. ते इंग्लंडला शिकायला होते. आता इथेच राहतील.'

थोरल्या भावांपैकी लॉरेन्सची नी जॉर्जची गट्टी जमली. लॉरेन्सने स्पेनच्या युद्धात भाग घेतला होता. ॲडमिरल व्हर्नानच्या हाताखाली आपण कसे लढलो त्या साऱ्या गोष्टी तो जॉर्जला सांगे. आई याच वेळी त्याला बायबलमधील गोष्टी सांगत असे. लॉरेन्सच्या संगतीत जॉर्जला वीरश्रीचे धडे मिळत होते, तर आईच्या शिकवणीमुळे तो प्रामाणिक, आज्ञाधारक बनत चालला होता. जॉर्ज अकरा वर्षांचा झाला तेव्हा त्याचा बाप एकाएकी वारला. आता त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी लॉरेन्सवर पडली. त्या कर्त्या कर्तबगार भावाने जॉर्जचा संभाळ बाप करणार नाही इतक्या मायेने केला.

चौदाव्या वर्षी जॉर्ज वॉशिंग्टनच्या जीवनाला एकदम नवं वळण लागलं. लॉरेन्सच्या ओळखीने तो इंग्लंडला जाण्यास निघाला. खलाशी जीवनाचा पेशा त्याला पत्करायचा होता. पण इंग्लंडहून चुलत्याचं निराशाजनक पत्र आलं आणि वॉशिंग्टनचं सागरी जीवनाचं सुखस्वप्न विरघळून गेलं. माउंट व्हर्नोन या आपल्या ऐषारामी घरात तो काही दिवस हताश होऊन बसला. पण त्याचा उद्योगी, धाडसी स्वभाव त्याला स्वस्थ बसू देईना. घरात जमिनीची मोजदाद करणारी हत्यारं पडली होती. जंगलं साफसूफ करून जमीन मिळवणं, तिची मोजदाद करणं, ती लागवडीखाली आणणं आणि तिचं रक्षण करणं हा अमेरिकन वसाहत-वाल्यांचा एक मोठा उद्योग होता. ज्याला या उद्योगात यश मिळे तो श्रीमंत होई. वॉशिंग्टन याच उद्योगाला प्रवृत्त झाला. मोजणीची हत्यारं घेऊन तो आसपासच्या प्रदेशात कामं करू लागला. या कामामुळे त्याला कमाई होऊ लागली. मोजणीच्या निमित्ताने घोड्यावर स्वार होऊन मित्रांबरोबर तो जो बाहेर पडे तो सायंकाळी घरी येई. जंगलं, डोंगर-दऱ्या, नद्या-नाले तुडवण्याची त्याला आता सवय झाली. या काळात त्याला शिकारीची हौसही जडली. घोडा भरधाव फेकणे, कुस्ती मारणे आणि बंदुकीने सावज अचूक टिपणे या क्रीडेत तो वाकबगार झाला. त्याच्या मूळच्या द्रूड प्रवृत्तीला हे साहसी रानोमाळ जीवन चांगलं मानवलं. वॉशिंग्टन रानचा वारा पिऊन पाहता पाहता सोळा वर्षांचा झाला. तो पुरा उंच व दणकट बनला होता. लॉरेन्सप्रमाणे थॉमस फेअरफॅक्स या शिपाईगड्याने वॉशिंग्टनला असेच हरएक बाबतीत उत्तेजन दिले. या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची मोठी जमीन होती. वॉशिंग्टनचा प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा हे गुण त्याने हेरले. आपल्याबरोबर तो वॉशिंग्टनला मोजणीच्या कामाला नेई. दोघे मिळून शिकारी करीत आणि कधीकधी थंडीच्या दिवसांत शेकोट्या पेटवून युद्धाच्या गोष्टी करीत. फेअरफॅक्सने आपल्या

या तरण्याबांड शिष्याला नुसत्या युद्धकथाच ऐकविल्या नाहीत, तर युरोपचा इतिहास शिकविला, शेतीवाडी जोपासण्याचे धडे दिले आणि मुख्य म्हणजे त्याच्या अंगी लष्करी बाणा बिंबवला.

अठराव्या वर्षी व्हर्जिनियाच्या पलटणीत वॉशिंग्टन भरती झाला. साहसी कामाची त्याला मनापासून आवड होती. जे काम हाती घ्यायचं ते प्रामाणिकपणे पार पाडायचं असा त्याचा स्वभाव होता. लष्करी पेशा की आपली शेतीवाडी असा त्याच्यासमोर या वेळी प्रश्न होता. या दोन्हींची त्याला हौस होती; आणि योगायोग असा की, भावी आयुष्यात या दोन्ही गोष्टींत त्याला पुढाकार घ्यावा लागला. पलटणीच्या नोकरीवर रुजू होतो न होतो तो वॉशिंग्टनचा थोरला भाऊ लॉरेन्स आजारी पडून मृत्यू पावला. त्याच्या पश्चात शेतीवाडीची जबाबदारी वॉशिंग्टनवर येऊन पडली. ही शेतीवाडी फार मोठी होती. तिच्याकडे दुर्लक्ष करून भागण्यासारखं नव्हतं. घोड्यावर बसावं आणि मजुरांकडून शेतीची कामं करून विपुल पिकं पिकवावी असं ऐषारामी आयुष्य आता त्याचं सुरू झालं. पण नियतीने त्याला असल्या सरंजामी जीवनासाठी जन्माला घातलं नव्हतं.

काळ झपाट्याने बदलत होता. अमेरिकेतील वसाहतींतून राजकीय स्पर्धा सुरू झाली. फ्रेंच आणि इंग्रज वसाहतवाले यांच्यांत जमिनीच्या प्रश्नावरून भांडणं, कुरबुरी, लहान-मोठ्या चकमकी सुरू झाल्या. अनधिकृतपणे किल्ले बांधून राहिलेल्या फ्रेंचांना ‘ चले जाव ’ चा इशारा देण्यात आला. पण फ्रेंचांनी दाद दिली नाही. उलट, स्थानिक रानटी रहिवाशांच्या मदतीने त्यांनी आपली ठाणी भक्कम केली. त्यांना अखेरची समजावणी देणं भाग होतं, पण ती अवघड कामगिरी करावयाची कुणी हा प्रश्न होता. अखेर वॉशिंग्टनचं नाव सुचविण्यात आलं. त्याने आव्हान-पूर्वक ही कामगिरी पत्करली. वाटाडे व काही शिकारी घेऊन वॉशिंग्टन

जंगलात शिरला. त्याने फ्रेंचांना गाठले. धीटपणे त्यांना समज दिली. पण फ्रेंच ठाणी सोडीनात. वॉशिंग्टन परत फिरला. परतताना त्याचे फार हाल झाले. जिवावर प्राणसंकटं कोसळली. जंगलात तो व त्याचा वाटाड्या वाट चुकले. एक जंगली वाटाड्या त्यांना वाट दाखवू लागला. वाट दाखवता दाखवता त्याने अचानक बंदूक रोखली. पण वॉशिंग्टनने नेम चुकवला व दोघे निसटले. वाटेत नदी होती. तिचं पात्र थंडीने गोठून गेलं होतं. बर्फाळ प्रवाह पार करून जाणं प्राप्त होतं. दोघेजण प्रवाहात उतरले व लाकडाच्या ओंडक्यांना धरून तरू लागले. रात्री तर एका निर्जन बेटावर त्यांना कुडकुडत राहावे लागले. दुसरे दिवशी सकाळी त्यांनी कशीबशी नदी पार केली व ते आपल्या ठाण्यावर आले. त्यांच्या कामगिरीची हकीकत गव्हर्नरला कळली तेव्हा तो खूष झाला. वॉशिंग्टनला फौजेत बढती मिळाली.

शिरजोर फ्रेंचांना हुसकून लावण्यासाठी पुढच्या हिवाळ्यात इंग्लंडने सेनापती ब्रॅडाकला पाठविले.त्याने वॉशिंग्टनला आपला शरीररक्षक नेमला व आपल्या लाल डगलेवाल्या ऐटदार फौजेला घेऊन तो फ्रेंचांच्या समाचाराला निघाला ब्रॅडाकला अमेरिकेतील जंगली मुलुखाची नीट माहिती नव्हती. त्याने ऐटीत चाल केली. पण वाटा चुकून ब्रिटिश फौज शत्रूच्या ताव-डीत सापडली. वॉशिंग्टनला हा जंगली मुलूख माहीत होता. त्याने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने लपूनछपून फ्रेंचांवर गोळीबार करण्यास सुरुवात केली. फ्रेंच सैनिक गोळीला गोळीने उत्तर देऊ लागले. एक गोळी वॉशिंग्टनच्या हॅटमधून पार झाली. दुसरी त्याला चाटून गेली. पण मर्द डरला नाही. धावपळीत घोडा जखमी होऊन पडला तशी चटकन उडी मारून तो दुसऱ्यावर स्वार झाला व शत्रूवर गोळ्या झाडीत निसटून गेला. या लढाईत सेनापती ब्रॅडाक जखमी होऊन मृत्यू पावला. लढाई पुढे चालूच राहिली. इंग्लंडहून जादा कुमक आली. फ्रेंचांचा पराभव

झाला. वॉशिंग्टन व्हर्जिनिया वसाहतीचा सेनापती झाला. कायदेमंडळाचा प्रतिनिधी म्हणूनही त्याची निवड झाली. यापुढची पंधरा वर्षे त्याने सुखाने कालक्रमणा करण्यात घालविली. एका श्रीमंत विधवेशी त्याने लग्न केलं. तिची मुलं त्याने आपली मुलं मानली. या दीर्घ काळात आपली शेती, गुरंढोरं, शिकारी कुत्री, रेसचे घोडे आणि समाजकार्य यांत तो रमून गेला. आपल्याला भावी काळात राजकारणात पडावं लागेल किंवा लष्करी बहादुरी गाजवावी लागेल असं त्याला स्वप्नात देखील वाटलं नाही. पण अखेर तसं झालं खरं.

इंग्लंड आणि त्याच्या अमेरिकेतील वसाहती यांचे संबंध बिघडू लागले. फ्रेंचांबरोबर अमेरिकेत वारंवार जी युद्धे होत त्यामुळे इंग्लंडची तिजोरी रिकामी होऊ लागली. हा वाढता युद्धखर्च भरून काढण्यासाठी इंग्लंडच्या राजाने अमेरिकेतील वसाहतींची आर्थिक पिळवणूक सुरू केली. चहासारख्या व्यापारी मालावर जबर कर बसविले. ' स्टँप ॲक्ट ' सारखा कायदा जारी केला. वसाहतींतील लष्कराचा व गव्हर्नरांचा खर्च वसाहतवाल्यांनीच भागवावा अशी फर्माने निघाली. इंग्लंडच्या या अन्याय्य धोरणामुळे वसाहतींत असंतोष पसरला. हळूहळू हा असंतोष संघटित होऊ लागला. त्याला वाचा फुटू लागली. इंग्रज अधिकारी आणि त्यांची फौज यांची वसाहतवाल्यांकडून थट्टामस्करी होऊ लागली. इंग्लंडहून येणाऱ्या मालावर बहिष्कार घालण्याचे सत्र सुरू झाले. लोक उघड-उघड बंडाची भाषा बोलू लागले. लष्कराच्या जोरावर बंड मोडून काढू अशी इंग्लंडची अपेक्षा होती, पण दिवसेंदिवस ही अपेक्षा फोल होत चालली.

बोस्टन बंदरात एके दिवशी बंडाची म्हणजेच स्वातंत्र्ययुद्धाची ज्वाला भडकली. चहाचे पेटारे भरलेल्या बोटी बंदरात उभ्या होत्या. इंग्लंडचा महागडा माल अमेरिकेत उतरू द्यायचा नाही असं ठरवून दोनशे बंडखोर वन्यजमातींचे पोशाख करून गुपचूपपणे या बोटींवर चढले आणि त्यांनी

भराभरा चहाचे पेटारे समुद्रात फेकून दिले. बोटीला आग लावून नंतर ते पळून गेले. बंडखोरांना अद्दल घडावी म्हणून इंग्लंडने बोस्टन बंदर बंद केले, आणि बंड दडपण्यासाठी जादा लष्कर पाठवले. पण आता बंड पेटले होते. फिलाडेल्फिया येथे बंडखोर वसाहतवाले जमले. त्यांनी आपली काँग्रेस भरविली. जॉन ॲडॅम्स, पॅट्रिक हेन्री, जॉर्ज वॉशिंग्टन इत्यादी नेत्यांनी काँग्रेसला मार्गदर्शन केले व इंग्लंडविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारले.

'बोस्टनच्या रक्षणासाठी मी माझे हजार सैनिक देतो' अशी घोषणा करून वॉशिंग्टन युद्धात उतरला. 'प्रतिनिधित्व नाही तर करही नाहीत' अशा घोषणा स्वातंत्र्य-सैनिक करू लागले. १७७५ च्या एप्रिल महिन्यात बोस्टनजवळ इंग्लंड आणि अमेरिकन स्वातंत्र्य-सैनिक यांची पहिली जोरदार चकमक झडली. कंकार्ड येथे अमेरिकनांनी शस्त्रांचा व दारू-गोळ्याचा गुप्तपणे साठा केला होता. तो ताब्यात घेण्यासाठी जनरल गेजची तुकडी आवेशाने निघाली. पण बंडखोर अमेरिकनांना ही वार्ता समजताच मिळतील ती शस्त्रास्त्रं घेऊन ते प्रतिकाराला निघाले. लेग्झिंग्टन येथे उभयतांची गाठ पडताच गोळीबाराला सुरुवात झाली. गनिमी तंत्राचा अवलंब करून अमेरिकनांनी इंग्रजांची खूप हानी केली. यानंतर फिला-डेल्फिया येथे काँग्रेसचे पुन्हा अधिवेशन भरले. तेरा वसाहतींच्या प्रतिनिधींनी आपण स्वतंत्र व स्वायत्त आहोत अशी घोषणा करून इंग्लंडची सत्ता झुगारून दिली व इंग्लंडविरुद्ध उघडपणे युद्ध पुकारले. तात्पुरत्या सरकारने वॉशिंग्टनला सरसेनापती नेमले. आपल्या पांढऱ्या शुभ्र घोड्यावर वॉशिंग्टन स्वार झाला व लखलखती तलवार उपसून त्याने सैनिकांच्या मेळाव्यात युद्धघोषणा केली.

स्वातंत्र्ययुद्धाचा सेनानी या नात्याने वॉशिंग्टनची जबाबदारी फार अवघड होती. वास्तविक त्याला रणांगणाचा फारसा अनुभव नव्हता.

त्याला पद्धतशीर असे लष्करी शिक्षण मिळालेले नव्हते. उंच, धडधाकट प्रकृती, प्रभावी व्यक्तिमत्त्व, धाडसी पण धीरगंभीर स्वभाव, कष्ट करण्याची सवय आणि विशेष म्हणजे अन्यायाची चीड एवढंच त्याचं भांडवल होतं. मूलतः तो शांततेचा भोक्ता होता. सुखासीन जीवनाची त्याला वंशपरंपरेने सवय जडली होती. पण प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा हे त्याच्या अंगी दोन गुण असे होते की, अन्यायाची जाणीव होताच तो आपल्या सुखविलासातून बाहेर पडला व तडक रणांगणाकडे निघाला. त्याचं स्वाभिमानी मन स्वातंत्र्यलालसेने भारून गेलं. इंग्लंडसारख्या बलाढ्य मायदेशाशी मुकाबला करणं सोपं नव्हतं. वसाहतींतून असंतोष पसरला असला तरी सारी जनता स्वातंत्र्ययुद्धाला अनुकूल नव्हती. फोडा आणि झोडा ही कूटनीती ब्रिटिशांनी इथेही वापरली होती. राजनिष्ठांचा एक श्रीमंत अधिकारीवर्ग स्वातंत्र्ययुद्धाच्या मार्गात विघ्न आणीत होता. बरं, जे युद्धाला प्रवृत्त झाले ते तरी शस्त्रास्त्रांनी सुसज्ज होते का? नाही. सेनापती वॉशिंग्टनच्या शिरावर युद्धाची तयारी करण्यापासून सारी कामं होती. त्याला सैन्यभरती करायची होती, शस्त्रास्त्रं, दारूगोळा, तोफा जमवावयाच्या होत्या, सैन्याला शिस्त व युद्धशिक्षण द्यायचं होतं, फुटीरांचा व फितुरांचा बंदोबस्त करायचा होता आणि परराष्ट्रांची मदत मिळवायची होती. अनेक व्यवधानं, आघाड्या त्याला संभाळून न्यायच्या होत्या. या आणीबाणीच्या प्रसंगी धीरगंभीर व संघटनाकुशल युद्धनेता अमेरिकेला हवा होता. वॉशिंग्टनशिवाय ही पात्रता कोणात नव्हती. राष्ट्राने त्याला युद्धनेतृत्वाची हाक दिली होती. परिस्थिती प्रतिकूल असूनही वॉशिंग्टनने त्या हाकेला ओ दिली.

१७७५ साली सुरू झालेलं अमेरिकेचं स्वातंत्र्ययुद्ध जवळजवळ सहा वर्षं चालू होतं. या सहा वर्षांत वॉशिंग्टनच्या नेतृत्वाची कसोटी लागली. कधी जय तर कधी पराजय, कधी आशा तर कधी निराशा, अशा

चढउताराने या युद्धाचं पारडं फिरत होतं. अमेरिकेच्या सैन्यात बहुसंख्य शेतकरी होते. त्यांना कामचलाऊ शिक्षण देऊन वॉशिंग्टनने तयार केले. सैन्याला पगार, गणवेश आणि शस्त्रास्त्रं देण्यासाठी त्याने हजारो डॉलर्स रक्कम उभारली. इंग्रजांचं सैन्य संख्येने व गुणाने भारी असल्यामुळे त्याला नमविण्यासाठी सरळ सामन्यापेक्षा गनिमी तंत्राचा अवलंब करणे जरूर होते. वॉशिंग्टनच्या युद्धविषयक बहुतेक हालचाली अशा गनिमी पद्धतीनेच सुरू झाल्या. शत्रूवर अचानक हल्ला करायचा, त्याला कोंडीत पकडायचं, आपली कमीत कमी हानी होऊ द्यायची, शत्रूची जास्तीत जास्त करायची, त्याच्या बंदुका, दारू-गोळा, तोफा हस्तगत करायच्या अशा पद्धतीने तो लढू लागला. बोस्टन, टिकान्डेरोगा, क्वेबेक, मॉन्ट्रियल,न्यू यॉर्क या ठिकाणच्या लढायांत त्याच्या सैन्याने चांगली बहादुरी गाजविली. महिनोमहिने गोळागोळी व चकमकी चालू असत. ट्रेंटन व प्रिन्स्टन येथील विजयामुळे वॉशिंग्टनची कीर्ती युरोपात पोहोचली. पण या विजयासाठी त्याच्या सैन्याला केवढी किंमत द्यावी लागली ! किती हाल सोसावे लागले ! कडाक्याच्या थंडीमुळे एके ठिकाणी नदी गोठली होती. पलीकडे इंग्रजांचं मोठं सैन्य तळ देऊन बसलं होतं. रात्र झाली तशी झोंबरा वारा सुटला. वॉशिंग्टनने या रात्रीच शत्रूवर हल्ला करण्याचं ठरवलं. छोट्या छोट्या नावांतून त्याचं सैन्य नदी ओलांडू लागलं. पण बर्फाळ प्रवाहामुळे सैन्याची गती रोखली गेली. चाबूक मारून मारून घोड्यांना पुढे घालावं लागत होतं. अवजड तोफखाना रेटून न्यावा लागत होता. बर्फात अडकलेल्या नावा ढकलाव्या लागत होत्या. आणि या साऱ्या खटाटोपीत सैन्याचे कमालीचे हाल होत होते. कित्येकांचे बूट निसटले, कित्येक थंडीने मरून गेले, तर कित्येकांचे पाय रक्ताने माखून निघाले. तावडीत सापडलेल्या शत्रूचा निःपात करण्याचं प्रखर ध्येयच जणू त्यांना नदी पार करून

नेन होतं. सकाळी जेव्हां हे सैन्य नदीपार झालं तेव्हा वॉशिंग्टनचं अंत:करण भरून आलं. पण आता थांबायला वेळ नव्हता. दारू पिऊन बेहोप अवस्थेत पडलेल्या इंग्रजांच्या सैन्यावर वॉशिंग्टनने इतका अकस्मात जोरदार हल्ला चढवला की, त्या हल्ल्याने इंग्रजांना पळता भुइ थोडी झाली. ते शरण आले.

प्रिन्स्टनला शत्रूवर त्याने असाच विजय मिळवला. यानंतर व्हॅली फोर्जला त्याने आपल्या सैन्याची छावणी दिली. शत्रूच्या डावपेचांची पुरी कल्पना आल्याशिवाय तो आपलं पाऊल सहसा उचलीत नसे. हाताखालच्या अधिकाऱ्यांना तो विश्वासात घेई. त्यांच्या हातून चुका होत. त्यामुळे त्याचा जीव अनेकदा धोक्यात येई. कधीमधी एखादा सैनिक फितुरी करी. अशा फितुरांना दहशत बसविण्यासाठी त्याला कठोर व्हावं लागे. प्रसंगी वधस्तंभावर चढवावं लागे.

पण युद्धात अशा चुका, जयापजय व्हायचेच हे वॉशिंग्टनने गृहीत धरलं होतं विजय मिळेपर्यंत पराभवाचे घाव सोशीत राहायचे हा मात्र त्याचा दृढनिश्चय होता. सैन्यासाठी तो कॉंग्रेसकडे पैसा मागे. त्याला तो वेळेवर मिळत नसे. युद्धसामग्रीच्या अभावी मग चकमकी थांबवून त्याला रानावनाचा आश्रय घ्यावा लागे. व्हॅली फोर्ज येथे छावणी पडली असता त्याच्या सैन्याचे अतोनात हाल झाले. कित्येक सैनिक थंडीच्या कडाक्याने आजारी पडले, कित्येक घरी जाऊ लागले. कधीकधी भुकेने जीव व्याकूळ झाला की सैनिक घोडी मारून त्यांचे मांस खात. वॉशिंग्टनला ही स्थिती बघवत नव्हती. पण त्या स्थितीतही तो सैनिकांना धीर देत होता व त्यांच्यासंगे हालअपेष्टा सोशीत होता. एके दिवशी त्याची पत्नी मार्था फराळाची मोठी करंडी घेऊन युद्धछावणीत आली. मोहाचा हा केवढा क्षण होता ! पण वॉशिंग्टनचं सारं लक्ष आपल्या सैनिकांकडे होतं. नवराबायकोंनी फराळाचे सारे जिन्नस आधी सैनिकांना वाटले व मग चार घास आपण खाल्ले.

वसंतऋतूत युद्धाचं वारं पुन्हा फिरलं. फ्रान्स व स्पेनहून मदत आली. अन्नधान्य व युद्धसामग्रीचा चोरटा ओघ सुरू झाला. परराष्ट्रांची सहानुभूती मिळू लागली. इंग्लंडच्या सैन्याचा कोंडमारा करण्यासाठी फ्रेंच आरमाराने अमेरिकन आरमाराशी हातमिळवणी केली. जमिनीवरून आणि समुद्रावरून युद्ध लढविण्यासाठी वॉशिंग्टनने नवी आघाडी उभारली. उत्तरेप्रमाणे आता दक्षिणेत युद्ध पसरलं. युद्धाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी इंग्लंडने नवा सेनापती कॉर्नवॉलिस रवाना केला. व्हर्जिनियात यॉर्कटाउन येथे त्यांच्याशी घनघोर संग्राम सुरू झाला. जमिनीवरून व समुद्रातून इंग्रजी ठाण्यांवर अविरत हल्ले होऊ लागले. कॉर्नवॉलिस कोंडीत सापडला. शेवटी कंटाळून त्याने तहाचं पांढरं निशाण उभारलं. १९ ऑक्टोबर १७८१ रोजी त्याने शरणागती पत्करली. अमेरिका स्वतंत्र झाली.

वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या खऱ्या, पण त्यांच्यात अद्याप एकजूट नव्हती. एकसूत्री कारभार नव्हता. पक्षोपपक्षांची भांडणं धुमसत होती. स्वातंत्र्याचा रथ अराजकाच्या खड्ड्यात जाऊन पडतो की काय अशी गंभीर अवस्था निर्माण झाली. पण काही सुज्ञ विचारवंतांनी कॉंग्रेसचं अधिवेशन बोलावलं व वसाहतींसाठी राज्यघटना तयार केली. घटनाप्रमुख म्हणून राजाऐवजी अध्यक्ष हे पद निर्माण करण्यात आलं.

जॉर्ज वॉशिंग्टनला स्वतंत्र अमेरिकेचा पहिला अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. न्यू यॉर्कच्या फेडरल हॉलमध्ये शपथविधीसाठी जेव्हा तो निघाला तेव्हा जनतेने त्याचा उत्स्फूर्त जयजयकार केला. तोफांच्या सरबत्तीत सैनिकांनी त्याला मानवंदना दिली. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आनंदाने बेहोष झालेले लोक त्याला खांद्यावर घेऊन नाचले.

शपथविधीनंतर टाळ्यांचा कडकडाट झाला. वॉशिंग्टन गॅलरीत गेला व बाहेर जमलेल्या जनसमूहाला त्याने अभिवादन केलं. या वेळी करड्या रंगाचा कोट त्याने घातला होता. कोटावर गरुडचिन्हांकित गुंड्या चमकत होत्या. कमरेला समशेर होती. दमला भागला सेनानी नव्या उत्साहाने अमेरिकन राष्ट्राची सेवा करू लागला. जनतेने त्याला दुसऱ्या खेपेलाही अध्यक्ष केले. यावरून त्याच्या कर्तृत्वाची व लोकप्रियतेची कल्पना येते. आठ वर्षांची कारकीर्द संपवून घरी परतल्यावर दि. १४ डिसेंबर १७९९ रोजी त्याला शांतपणे मृत्यू आला. 'युद्धपर्वात पहिला, शांतिपर्वात पहिला आणि लोकमानसात पहिला' अशी त्याची योग्यता होती.

▣ ▣ ▣



७

# झाशीची रणरागिणी

झाशीच्या राजवाड्यात दरबार भरला होता. वातावरण गंभीर होतं. इतक्यात ललकाऱ्याने ललकारी दिली, ' हुश्शार, राणीसरकार येत आहेत. ' सारा दरबार उभा राहिला.

हुजऱ्यांनी दाराचा पडदा दूर केला. राणी लक्ष्मीबाई झपाझप पावलं टाकीत दरबारात आली. तिची तेजस्वी पण काहीशी गंभीर मुद्रा पाहताच

मानकऱ्यांनी मुजरे केले. दिवाणाच्या शेजारी लोडाला टेकून राणी आसनस्थ होताच सारेजण खाली बसले. दरबारचं काम सुरू झालं. इंग्रजांकडून आलेला खलिता दिवाण वाचू लागले—

' तुमचे पती गंगाधरराव आजारी होते. त्यांना मूलबाळ नव्हतं. आजारपणात त्यांनी आपल्याच घराण्यातील एका मुलास – आनंदराव ऊर्फ दामोदरास – दत्तक घेतले. दत्तकविधानाचा हा सोहळा त्यांनी घाईघाईने उरकून घेतला. यानंतर ते थोडया दिवसांत मृत्यू पावले. कंपनी-सरकारला या घटनेमुळे फार दुःख होत आहे. पण त्याचबरोबर कंपनी-सरकार लक्ष्मीबाईसाहेबांना हे कळवू इच्छिते की, झालेलं दत्तकविधान आम्हांस साफ नामंजूर आहे. झाशी संस्थान आता खालसा करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. राणीसाहेबांना त्यांच्या दर्जाला शोभेलसं पेन्शन मात्र जरूर दिलं जाईल.'

खलिता ऐकता ऐकता राणीची गौरकाय मुद्रा लाललाल होत होती. कपाळावर आठया चढल्या होत्या. हाताची मूठ कमरेच्या कट्यारीला भिडली होती. सारा दरबार राणीची संतप्त मुद्रा न्याहाळीत होता. खलिता पूर्णपणे वाचून होताच राणी ताडकन उभी राहिली व इंग्रज अधिकाऱ्यां-कडे पाहात कडाडली, ' नहीं, मेरी झांशी नहीं दूँगी, नहीं दूँगी । ' तो अपमानास्पद, राज्यबुडवा खलिता ऐकताच त्या सत्त्वशील पण बाणेदार मराठी स्त्रीचं रक्त एकदम तापलं, सळसळलं. तिच्या धर्मावर, राज्यावर, प्रतिष्ठेवर इंग्रजांनी अकल्पित आघात केला होता. असे आघात, असे अन्याय यापूर्वीही तिच्या वाट्याला आले होते. झाशी संस्थानात गोहत्या होऊ नये म्हणून तिने कंपनी सरकारकडे अर्ज केला होता. पतिनिधना-नंतर काशीला जाऊन केशवपनाची परवानगी तिने मागितली होती. दत्तक मुलाच्या मुंजीसाठी संस्थानच्या मालकीचे लाख रुपये द्या म्हणून तिने प्रार्थना केली होती, पण तिच्या या साऱ्या अर्ज-विनंत्या इंग्रजांनी

धुडकावून लावल्या. हे अन्याय तिला बोचत होते, सलत होते. पण तरीही ती गप्प राहिली. इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे आपला निभाव लागणार नाही हे तिने ओळखलं होतं. ती राणी होती. तरुण होती. विधवा होती. शांत होती. शांती आणि समृद्धी तिला हवी होती. आपली परिस्थिती, अडीअडचणी, सामर्थ्याच्या मर्यादा ती जाणून होती. इंग्रजांशी वैर धरण्यात, त्यांच्या बलदंड सत्तेला आव्हान देण्यात आपली हानी आहे हे ओळखण्याइतकी ती समंजस होती. आणि म्हणूनच आजवरचे त्यांचे अन्याय तिने निमूटपणे सहन केले होते.

पण झाशी संस्थान खालसा करण्याचा अन्याय ती सहन करू शकत नव्हती. सहनशक्तीला सीमा असते. राणीचं संस्थान ज्या प्रदेशात होतं तो बुंदेलखंड – माळव्याचा प्रदेश म्हणजे मराठ्यांच्या पराक्रमाची सत्ता नी मत्ता होती. पेशवाई लयाला गेली तरी इंदोरचे होळकर, देवासचे पवार, ग्वाल्हेरीचे शिंदे आणि झाशीचे नेवाळकर काही अगदी उखडले गेले नव्हते. आपापल्या जागी महाराष्ट्र धर्म आणि मराठी संस्कृती त्यांनी टिकवून धरली होती. इंग्रजी सत्तेचा वरवंटा त्यांच्यावर पुरता फिरला नव्हता. राणी लक्ष्मीबाईवर, तिच्या प्रिय झाशीवर मात्र आता तो प्रसंग ओढवला होता. स्वराज्य आणि स्वधर्म यांवर घाला पडताच झाशीवाली रणरागिणी झाली. इंग्रजी खलिता ऐकताच पुत्राचं बोट धरून ती ताड्दिशी आपल्या महालात उठून गेली. ‘ मेरी झाशी नहीं दूँगी, नहीं दूँगी ’ हे शब्द मात्र दरबारात घुमत राहिले. असे खणखणीत शब्द दरबारने पूर्वी कधी ऐकले नव्हते. शब्द कसले ते ! स्फुलिंग होते. त्या स्फुलिंगांतून आता समरांगण पेटणार होतं. रणरागिणीची ती सावेश वाणी म्हणजे स्वातंत्र्यसमराची नांदी होती. इंग्रजी सत्तेविरुद्ध सर्वत्र असंतोष धुमसत होता. त्या असंतोषाच्या उद्रेकाची एक ज्वाला खुद्द झाशीत पेटली होती.

असंतुष्ट हिंदी सैनिक आणि राजेरजवाडे यांनी हातात हात घालून इंग्रजी राजवटीविरुद्ध युद्ध पुकारलं. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरातली पहिली

गोळी गोऱ्या साहेबावर मंगल पांड्याने उडवली. मीरतच्या पलटणी बंड करून दिल्लीच्या रोखाने निघाल्या. कानपूर–बिठूर म्हणजे तर स्वातंत्र्य-योद्धयांचं केंद्रच ! क्रांतीचा झेंडा घेऊन नानासाहेब पेशव्यांनी शिपायांचं नेतृत्व पत्करलं. हां हां म्हणता त्यांनी गोरी राजवट उलथून पाडली. कानपूरनंतर लखनौ, बरेली, अयोध्या, रोहिलखंड, दिल्ली, जवळजवळ सारा उत्तर भारत गोऱ्या सत्तेविरुद्ध दंड थोपटून उभा राहिला.

स्वराज्य नाही, स्वधर्म नाही धिक या देहाला
चला जाउ स्वातंत्र्यसंगरी रिपूवरी घाला

अशा आवेशाने स्वातंत्र्यसमराचे नेते आणि हजारो सैनिक तळहातावर शिर घेऊन लढू लागले. लक्ष्मीबाईची झाशी देखील या समरसंग्रामात उतरली.

सैन्यातील काळा-गोरा भेदभाव हिंदी सैनिकांना इतका असह्य झाला की, १ जूनला झाशीतील गोऱ्या अधिकाऱ्याच्या बंगल्याला आग लावण्यात आली. सूडाने पेटलेले हिंदी सैनिक जाळपोळ व लुटालूट करीत सुटले. इंग्रजांचा खजिना लुटण्यात आला. शस्त्रागार फोडण्यात आलं. गोरा साहेब दिसला की त्याला गोळ्या घालण्यात येऊ लागल्या. भयभीत झालेल्या इंग्रज स्त्री-पुरुषांनी शेवटी किल्ल्याचा आश्रय घेतला. क्रांतिकारक त्यांचा पाठलाग करीत किल्ल्यावर चालून गेले. किल्ल्याची सर्व बाजूंनी नाकेबंदी करण्यात आली. आतल्या इंग्रज स्त्री-पुरुषांसमोर साक्षात मृत्यू उभा राहिला. त्यांनी राणी लक्ष्मीबाईकडे मदतीची याचना केली, पण राणीला या प्रसंगी त्यांच्यासाठी विशेष असं काहीही करता आलं नाही. ८ जूनला इंग्रज शरण आले. शस्त्रं टाकून त्यांनी किल्ला खाली केला. ते सारे शरणार्थी बाहेर पडतात न पडतात तोच त्यांची सरसहा कत्तल करण्यात आली. या कत्तलीतून बायकामुलं देखील वाचली नाहीत.

झाशीच्या किल्ल्यावर आता क्रांतिकारकांचा झेंडा फडकू लागला. विजयाने बेहोष झालेले हिंदी सैनिक 'खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल राणी लक्ष्मीबाईका' अशा घोषणा करीत, नंग्या तरवारी हवेत उडवीत राणीच्या राजवाड्यासमोर गोळा झाले. राणी बाहेर आली. पुन: जयजयकार झाला. राणीने सर्वांना अभिवादन केलं. क्रांतिकारी सैनिकांना तिने लगेच एक लाख रुपये वाटले. लक्ष्मीबाई आता खरीखुरी झाशीची राणी झाली. स्वतंत्र झाली. मनाप्रमाणे देवधर्म करायला आणि राज्य करायला मोकळी झाली. मोरोपंत तांब्यांची मनू, विठूरची छबेली, झाशीवाल्या नेवाळकरांच्या घरात पडून राजलक्ष्मी झाली होती. तिची राजलक्ष्मी काही काळ तिला सोडून गेली होती. पण आता परक्यांचं रक्त सांडून ती परत राजमंदिरात आली होती.

राणी नेटाने कारभार करू लागली. इंग्रजी पलटणी आज ना उद्या आपल्यावर चालून येतील हे ओळखून ती संरक्षण कार्याला लागली. तिचं मन अस्वस्थ होतं. आजूबाजूच्या बंडाळीच्या, कत्तलींच्या, जयापजयांच्या वार्ता ऐकून तिला आपल्या लाडक्या झाशीची काळजी वाटू लागली. महालक्ष्मीला, श्रीगजाननाला तिचं एकच मागणं होतं, 'देवा, मला धैर्य दे, बळ दे. परचक्र निवारण्याची मी शिकस्त करीन. माझं रक्त सांडीन, मी प्राण देईन, पण मला तुझा आशीर्वाद हवा, पाठिंबा हवा. झाशीच्या रयतेची, झाशीच्या लक्ष्मीची लाज राखणं आता तुझ्याच हाती.'

मार्च महिना उगवला. झाशीवर इंग्रजी आक्रमणाचे ढग जमू लागले शहराचा कडक बंदोबस्त करून, रयतेला धीर देऊन राणीने आपला मुक्काम किल्ल्यावर हालवला. तटांची व दरवाज्यांची डागडुजी करविली. दारूगोळ्याचा कारखाना अहर्निश चालू ठेवला. पाण्याची व्यवस्था केली. अन्नसामग्री भरपूर करून ठेवली. युद्धखर्चाला पैसे कमी पडू नयेत म्हणून सोन्या-चांदीचे जिन्नस विकले. पेशव्यांचे सेनानी तात्या टोपे

यांच्याकडे गुप्त हेर पाठवून मदत मागितली. किल्ल्यावरच्या तटावर उभी राहून राणी रोज आपल्या झाशी राजधानीवर प्रेमळ नजर टाकी. शत्रूच्या विजयाच्या कुवार्ता ऐकून ती मनातल्या मनात इतकी चडफडे, तिला इतका त्वेष चढे, की नकळत तिच्या तोंडून शब्द बाहेर पडत—' नहीं, मेरी झाशी नहीं दूँगी । '

रोजच्या वार्ता-अफवा ऐकून राणीला युद्ध अटळ दिसू लागलं. गोऱ्या पलटणी झाशीच्या दिशेने निघाल्या होत्या. चैत्राचे दिवस. शुक्रवार होता. राणीवर केवढं धर्मसंकट कोसळलं होतं ! पण या काळातही त्या व्रती स्त्रीने आपला स्वधर्म सोडला नाही. शुक्रवार म्हणून शहरातील सर्व जातीजमातींतील स्त्रियांना राणीने किल्ल्यावर बोलावून घेतलं. मन घट्ट करून, चेहऱ्यावर प्रसन्नता आणून तिने गौर सजवली. हळदीकुंकवाचा मोठा समारंभ उडवून दिला. राणीच्या डोळ्यांदेखत झालेला झाशीतला हाच शेवटचा समारंभ. जड अंतःकरणाने राणीने सर्व बायकामुलींना निरोप दिला आणि ती पुन्हा कामाला लागली.

येणार, येणार म्हणून जे संकट येऊ पाहत होतं ते अखेर २० मार्च १८५८ रोजी झाशीच्या आसमंतात येऊन ठेपलं. ताज्या दमाच्या कवायती आणि भारी तोफखाना घेऊन इंग्रज सेनापती ह्यू रोज झाशीलगत दाखल झाला. दि. २३ मार्चला त्याने किल्ल्याला वेढा घातला. तटबंदीवर आणि बुरुजांवर तोफांचा भडिमार सुरू झाला. उंच टेकडीवर असणाऱ्या किल्ल्याच्या दिशेने इंग्रजी पलटणी झेपावू लागल्या. पण किल्यावरून त्यांना प्रखर प्रतिकार होऊ लागला. राणीचे कडवे सैनिक गोळीला गोळीने आणि तोफेला तोफेने उत्तर देत होते. मर्दानी वेषात हाती नंगी तलवार घेऊन राणी आपल्या सैनिकांना उत्तेजन देत होती. शत्रूकडून बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव होत होता तरी ती तटावर चढून युद्धाची धुमश्चक्री पाहत होती. गुलाम गोषखां आणि खुदाबक्ष या

गोलंदाजांनी किल्ल्यावरून असा जबरदस्त भडिमार केला की शत्रूला इंचभरही वर सरकता येईना. दोन्ही पक्ष अटीतटीने लढत होते. शेकडो मृत्युमुखी पडत होते. पण काही झालं तरी इंग्रजांचं सामर्थ्य अफाट होतं. कितीतरी पटींनी वरचढ होतं. त्यांचा हल्ला परतवून लावणं महाकठीण होतं. एकटी राणी या सामर्थ्यापुढे काय करणार ? या प्रसंगी ती बाहेरून मदतीची वाट पाहत होती.

पाच-सहा दिवस झाले तरी युद्धाचा निकाल लागेना. वेढयाच्या सातव्या दिवशी राणी तटावरून दूर बघते तो तिला तात्या टोपेचं सैन्य मदतीला येत असल्याचं दिसलं. या घटनेमुळे तिचा युद्धोत्साह आणखी वाढला. तात्याच्या प्रतिहल्ल्यामुळे इंग्रजांचा वेढा ढिला पडेल व मग आपण खाली उतरून शत्रूला कात्रीत पकडू अशी तिची अपेक्षा होती. युद्धतंत्राच्या दृष्टीने तिची अपेक्षा अगदी बरोबर होती. पण तात्या ससैन्य येऊनही राणीची अपेक्षा फोल ठरली. इंग्रजांच्या मगरमिठीतून राणीला वाचविण्यासाठी तात्यानं मोठं सैन्य आणलं खरं. पण ते पुरेसं शिस्तबद्ध नव्हतं. त्यांना लढण्याची सवय नव्हती. त्यांची शस्त्रास्त्रं जुनीपुराणी होती. इंग्रज सेनापती ह्यू रोज कसलेला, युद्ध खेळलेला होता. तात्याची सेनादळं झाशीत शिरण्यापूर्वी ह्यू रोजच्या दोन पलटणींनी तोफा डागून अशी वेगवान मुसंडी मारली की ते बाजारबुणगं सैन्य बावचळून पळत सुटलं. तात्या त्या सैन्याला आवरू शकला नाही. राणी लक्ष्मी तटावरून हा नामुष्कीचा प्रकार पाहत होती. क्षणभर तिचं धैर्य गळून गेलं, पण तिने आपणाला लगेच सावरून धरलं. कारण इंग्रजांना आता दुप्पट अवसान चढलं होतं. तोफांचा भडिमार चालू ठेवून ते किल्ल्याच्या तटाला शिडया लावून वर चढू लागले. राणीचे सैनिक त्यांच्यावर वरून दगडधोंडे टाकू लागले. एकेक इंग्रज बंदुकीच्या गोळीने अचूक मारला जाऊ लागला. वरून मारणारे मरत होते आणि खालून चढणारेही

मरत होते. मुडद्यांच्या राशी पडत होत्या, आणि तरीही निकराचे युद्ध चालू होतं. राणीला भलताच आवेश चढला होता. यदाकदाचित तटाला खिंडार पडलं किंवा चोरवाटेने शत्रू आत घुसला तर प्रतिकारासाठी ती स्वतः सिद्ध झाली. समशेर उपसून ती आपल्या सैनिकांना उत्साहाचं वारं पाजीत होती.

इंग्रजी पलटणींच्या भडिमारामुळे राणीचे शेकडो सैनिक धारातीर्थी पडले होते. उरलेले चार-पाचशे तळहातावर शिर घेऊन कडवा प्रतिकार करीत होते. युद्धाच्या अकराव्या दिवशी दुलाजी ठाकुराने फितुरी केली. इंग्रजांना चोरवाटा दाखविल्या गेल्या. तेथून इंग्रज आत घुसू लागले. काहींनी गवताचे भारे रचून व शिड्या लावून आत प्रवेश केला. शत्रू आत येताच हातघाईची लढाई सुरू झाली. राणी आता मूर्तिमंत रणचंडिका भासू लागली. निवडक सैनिकांची तुकडी घेऊन ती त्वेषाने शत्रूवर तुटून पडली. एका झपाट्यात तिने पाच-पंचवीस गोऱ्यांना कंठस्नान घातलं. तलवारीचे हात मारीत ती पुढेपुढे झेपावत होती. पण इतक्यात एका वृद्ध सरदाराने तिला थोपवून धरलं. मागे फिरवलं. हा समय मागे फिरण्याचा होता. प्रसंग बाका होता. इंग्रजांची नवी तुकडी बंदुका घेऊन पुढे निघाली होती.

किल्ल्याच्या खालच्या भागात इंग्रजांनी प्रवेश केला होता. रात्र पडल्यामुळे युद्ध थंडावलं होतं. राणीने अंमळ विश्रांती घेतली व रात्री गच्चीवर उभी राहून ती झाशीकडे पाहू लागली. तिला जे दृश्य दिसलं ते भयंकर होतं. सारं शहर इंग्रजांनी पेटवून दिलं होतं. आगीचे आणि धुळीचे लोट गगनाला भिडले होते. लोकांची पळापळ आणि रडारड चालली होती. रयतेची ही हानी पाहून राणीला रडू कोसळलं. वैताग आला. तिला अगदी एकाकी वाटू लागलं. दुःखावेगाच्या भरात ती आत्मघाताला तयार झाली. पण एका वृद्ध सरदाराने तिला या प्रसंगी परावृत्त केलं. त्याचे

धीराचे शब्द ऐकून ती पुन्हा उल्हसित झाली. युद्धाला सज्ज झाली. किल्ल्यात घुसलेला प्रबल इंग्रजांचा लोंढा आवरणं आता तिच्या शक्ती-बाहेरचं होतं. उगाच मरण्यापेक्षा किंवा शत्रूच्या हाती सापडण्यापेक्षा त्याच्या हातावर तुरी देऊन निसटणंच बरं असा पोक्त विचार तिने केला.

मोजके स्वार घेऊन राणी किल्ल्याबाहेर निघाली. तिला समक्ष पाहिलेले गोडसे भटजी लिहितात : ' बाईसाहेब स्वतः पांढरे घोड्यावर स्वार जाहाली. घोडा सुमारे अडीच हजार किंमतीचा खंदा होता. त्याजवर बसून अंगावर पायजमा वगैरे सर्व पुरुष पोषाख होता. टाकीण-बूट घातले होते, व सर्वांगास तारांचे कवच घातले होते. बरोबर अर्थ येक पैसासुद्धा घेतला नव्हता. फक्त रुप्याचा पेला बांधून ठेविला होता. कंबरेस जंव्या वगैरे हत्यारे होती. खाकेत तरवार लाविली होती आणि रेसिमकाठी धोतराने पाठीसी बारा वर्षांचा दत्तक घेतलेला मुलगा बांधून ' जय शंकर ' असा शब्द करून किल्ल्याखाली स्वारी उतरली, आणि सर्वांसह भर शहरातून उत्तर दरवाज्याने बाहेर गेली. इंग्रज सरकारचे लोक लढण्याकरिता हल्ला करीत उठले. पण बाई कडामिनी बंदुकेने बहुत लढत लढत भरधाव घोडे काढून इंग्रजाचे फौजेची फळी फोडून बाहेर निघोन गेली. बरोबरची मंडळी बहुत करून सर्व मरण पावली. बाईने थेट काल्पीचा रस्ता धरला. इंग्रज स्वार पाठीस लागत लागत येक कोशपर्यंत गेले, तो बाईसाहेबांचे घोडे नाहीसे जाहाले. '

समय रात्रीचा असूनही राणीचा घोडा भरधाव धावत होता. पाटलाग करणाऱ्या गोऱ्या स्वारांपैकी चार-पाच जणांना तिने साफ लोळवलं होतं. दामोदराला भूक लागली म्हणून पहाटे तिला थांबावं लागलं. उजाडता ती पुन्हा वायुवेगाने निघाली. मध्यरात्री काल्पीला पोहोचली. तिथे पोचताच घोड्याने धाडकन जमिनीवर अंग टाकलं. नोकरांनी आणि बरोबरीच्या दासीने त्याला थोपटून, पाणी पाजून उभं केलं.

काल्पीला रावसाहेब पेशवे आणि तात्या टोपे होते. क्रान्तियुद्धाच्या भावी उठावणीचं हे रणरणतं केंद्र होतं. रावसाहेबांच्या कानांवर राणीच्या आगमनाची वार्ता जाताच त्यांनी तात्याला सर्व व्यवस्था करण्याची आज्ञा दिली. सूर्योदय झाला. राणी दासीसहवर्तमान रावसाहेब पेशव्यांपुढे येऊन उभी राहिली. तिने आपली तलवार पेशव्यांपुढे काढून ठेविली. श्रीमंत मनातून वरमले. राणीचं मर्म ध्यानी आलं. तलवार पुन्हा राणीच्या हातात दिली गेली. रावसाहेब, राणी आणि तात्या हे त्रिवर्ग युद्धासाठी पुन्हा उभे राहिले. ' बचेंगे तो और भी लढेंगे ' असा त्यांचा बाणा होता.

इंग्रजांची विजयी सेना आता क्रांतिकारकांच्या पाठलागावर निघाली. काल्पी हे तिचं लक्ष्य होतं. ह्यू रोजच्या आगमनाची वार्ता कळताच तात्याने आणि राणी लक्ष्मीबाईने प्रतिकाराची जय्यत सिद्धता केली. इंच-इंच जागा लढविण्याचा निर्धार केला. रोजचं सैन्य काल्पीला येण्यापूर्वीच वाटेत कुंचगावी तात्याच्या घोडदळाने त्याला गाठलं. असं तसं नव्हे तर आक्रमक पवित्रा घेऊन जिवावर उदार होऊन क्रांतिसेना लढू लागली. पण इंग्रजी तोफखान्यापुढे तिचा टिकाव लागेना. आक्रमकी शत्रूवर गोळ्या झाडीत झाडीत क्रांतिसेना मागे हटू लागली. शेकडो सैनिकांना या प्रसंगीच्या मैदानी युद्धात आपले प्राण गमवावे लागले. काल्पीच्या बचावासाठी शेकडोंनी आपल्या देहाची अक्षरशः चाळण केली. इंग्रजी पलटणींना मुडद्यांच्या राशी तुडवीत तुडवीतच काल्पीचा रस्ता सुधारावा लागला. या राशीत रक्ताने न्हालेली एक स्त्री त्यांना आढळली. ही स्त्री दुसरी तिसरी कोणी नसून राणीची एक दासी होती. आपल्या मालकिणी-साठी तिने आपला जीव ओवाळून टाकला होता.

कुंचच्या पराभवामुळे तात्या नी राणी काल्पीच्या बचावाला लागले. काल्पीपासून चार-पाच मैलांवर जंगी धुमश्चक्री जुंपली. इंग्रजी तोफ-खान्यावर स्वतः तात्या भडिमार करू लागला. पठाणी वेषातील राणी

घोड्यावर बसून लढू लागली. सैन्याला चेतावणी देऊ लागली. निकराने लढणाऱ्याला तिने एकेक सोन्याची मोहोर देऊ केली. रणधुमाळीत तिचं अंग धुळीने माखून गेलं होतं. पण तिला कशाचं भान नव्हतं. शत्रूला जेवढं मागे रेटता येईल, त्याची जेवढी हानी करता येईल तेवढी करायची या एकाच जिद्दीने ती लढत होती. काल्पीला दारूगोळ्याचा मोठा कारखाना तात्याने सुरू केला होता. इथला मजबूत किल्ला हातचा गेला की क्रांतिसैन्याला पाय ठेवायला जागा नव्हती. काल्पीसाठी राणीने नी तात्याने खरोखर तुंबळ युद्ध केलं. पण सरशी इंग्रजांची होत होती. माघार घेणाऱ्या, पळणाऱ्या सैनिकांची राणीने एकदा इतकी निर्भत्सना केली की, शेवटी तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. इंग्रजांचं कवायती सैन्य, त्यांचं सुधारलेलं युद्धतंत्र, त्यांची शिस्त आणि विशेष म्हणजे त्यांचा भारी तोफखाना – या सर्वांपुढे क्रांतिकारकांची मात्रा चालेना. तात्याला आणि राणीला प्रखर लढा देऊनही अखेर काल्पी सोडावी लागली. आता यापुढे ते केवळ सत्त्वासाठी, धर्मासाठी, स्वदेशासाठी, भावी पिढ्यांना चेतना देण्यासाठी आमरण झुंजणार होते. उरलंसुरलं सैन्य घेऊन ते गोपाळपूरला आले. रात्री छावणी पडली. भावी चढाईची व बचावाची खलबतं झाली. फौजेसाठी त्यांना माणसं हवी होती, पैसा हवा होता, शस्त्रं हवी होती. त्यासाठी त्यांनी आपला मोर्चा ग्वाल्हेरकडे वळविला. ग्वाल्हेरची फौज तात्याने आधीच फितवून ठेविली होती.

रावसाहेबांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारी सेनेची घोडदौड येताच शिंदे-सरकारची फौज लढण्यास सिद्ध झाली. पण ग्वाल्हेरला लढाई अशी विशेष झालीच नाही. क्रांतिसेना या वेळी भारी होती. राणी लक्ष्मीनं वेगवान चाल करून शिंद्यांचा तोफखाना बंद पाडला. तात्याने मुसंडी मारून इतर फौज पांगवून टाकली. शिंद्यांच्या फौजेपैकी मनापासून प्रतिकार कुणी केलाच नाही. फितुरीने पोखरलेल्या या फौजेला क्रांतिसेनेने

हां हां म्हणता नामोहरम केलं. शिंदे आपल्या दिवाणासह पळून गेला. ग्वाल्हेरचा राजवाडा, खजिना, बळकट किल्ला क्रांतिसेनेच्या हाती पडला.

राणी, रावसाहेब आणि तात्या प्रतिकूल परिस्थितीत युद्धाला उभे राहिले ते केवळ कर्तव्यभावनेने. त्यांना इंग्रजांच्या सामर्थ्याची व स्वकीयांच्या दुर्बळतेची पुरेपूर कल्पना होती. आणि तरीही ते झुंजत राहिले. ग्वाल्हेरीत तेरा-चौदा दिवस त्यांचा अंमल होता. सोळाव्या दिवशी युद्धाचे ढग पुन्हा जमू लागले. काल्पीचा कबजा घेतल्यावर सर ह्यू रोज रजेवर जाणार होता. पण ग्वाल्हेर क्रांतिकारकांनी घेतल्याचं समजताच त्याने रजा रद्द केली व तो त्वरेने तिकडे निघाला. जिद्दी रावसाहेब, झुंजार तात्या आणि रणशूर राणी ही तेजस्वी त्रयी एकत्र असेपर्यंत क्रांतियुद्धाचा वणवा शमणार नाही हे त्याने ओळखलं. वाटेल ती किंमत देऊन ग्वाल्हेर घ्यायचं अशा निर्धाराने त्याने कूच केलं.

तोफांच्या आवाजांनी, बंदुकीच्या फेरींनी आणि घोडदळाच्या टापांनी ग्वाल्हेरची मुरार छावणी दणाणून गेली. अखेरच्या प्रतिकारासाठी राणी लक्ष्मीबाई स्वार झाली. शत्रूची चाल रोखण्यासाठी आपली तुकडी घेऊन ती पुढे सरसावली. फुलबागेत हातघाईचं युद्ध पेटलं. अनेक गोरे राणीने त्वेषाने कापून काढले. अपूर्व चपळाईने ती रणांगणावर लढू लागली. १७ जूनला ब्रिगेडियर स्मिथने तिचा पिच्छा पुरविला. त्याची फळी फोडून ती बाहेर पडली व पाठलाग करणाऱ्या गोऱ्यांशी लढू लागली. विजयाची आशा तिने सोडून दिली होती. पाच-पन्नास हुस्सार स्वार लांडग्यांप्रमाणे तिच्या मागे लागले. त्यांना हुलकावणी देत तिचा घोडा भरधाव धावत होता. इतक्यात मध्येच एक गोळी आली आणि राणीची दासी खाली कोसळली. तिच्यासाठी अश्रू ढाळायलाही राणीला फुरसत नव्हती. बंदुकधारी स्वार तिचा पाठलाग करीत होते. त्यांना फर्लांगभर

मागे टाकल्यावर रामचंद्रावाकडे वळून धापा टाकीत ती म्हणाली, ' सुटले तर नशीब. पण पडले तर माझ्या देहाला फिरंग्यांचा स्पर्श होऊ देऊ नका. '

आणि इतकं निर्वाणीचं, निर्धाराचं राणी सांगते न सांगते तोच घोडा अडखळला. वाटेत एक ओढा आडवा आला. राणीने जोराने टाच मारली तरी घोडा उडी घेईना. अखंड दौडीने तो श्रमला की त्यानेही फितुरी आरंभली कुणास ठाऊक ! पण या आणीबाणीच्या प्रसंगी त्या मूक प्राण्याने राणीचा जीव केवढा धोक्यात आणला ! निमिषार्धात सूं सूं करीत एक गोळी राणीच्या बरगडीत घुसली. पिछाडीचे शत्रुस्वार नजीक पोहोचले. त्यांच्यापैकी एकाने राणीच्या डोक्यावर सपकन् वार केला आणि त्यासरशी—

रणरागिणी राणी धरणीवर कोसळली. मारणारे बेगुमानपणे पुढे निघून गेले. रामचंद्रावाने राणीचा रक्ताळलेला मृत देह फुलासारखा उचलला. जवळच एक पर्णकुटी होती. तिच्या शेजारी गवताची गंजी पेटविण्यात आली. मर्दांनी झाशीवालीचा देह त्या पेटत्या गंजीत पाहता पाहता अदृश्य झाला. सूर्य अस्ताला गेला आणि स्वातंत्र्यदेवता दिसेनाशी झाली.

सिंहाच्या मुसक्या बांधून एल्बाचा चतकोर तुकडा त्याच्या अंगावर फेकण्यात आला होता. आपलं गतायुष्य आठवून आठवून बादशहा अस्वस्थ होई. त्याचा जीव तडफडे, गुदमरे. महत्त्वाकांक्षी, जिद्दी मन उसळ्या मारी. फ्रान्सकडे झेप घेई. बादशहाला नजरेसमोर सारखं पॅरिस दिसे.

वृत्तपत्रांवरून, भेटीला येणाऱ्यांकडून आणि हेरांमार्फत त्याला फ्रान्स-मधल्या बातम्या कळत. त्या ऐकून तो बेचैन होई. पाठीमागे हात बांधून तो भराभरा येरझारा घाली. संतप्त होई. दातओठ खाई. मधूनच तपकिरीची चिमूट नाकाला लावी आणि शिंक आली की टेबलावर मूठ आपटून आपल्याशीच मोठ्याने बोले, ' नाही, नाही. फ्रान्सला माझ्याशिवाय त्राता नाही. फ्रान्सचं रक्षण झालंच पाहिजे. एल्बात मी आता फार दिवस राहू शकणार नाही. आजवर अनेक लढाया मारल्या. अनेकदा विजय मिळविले. अनेक साहसं केली. क्वचित पराभूतही झालो. पण माझं महत्त्वाकांक्षी मन मला स्वस्थ बसू देत नाही. शत्रूची हाडं खिळखिळी करण्याची माझ्या बाहूंत अजून रग आहे. मी पुन्हा फ्रान्सला जाणार. साहसी झेप घेणार. एल्बात शेळपटाप्रमाणे खितपत पडण्यापेक्षा फ्रान्स-मध्ये जाऊन औट घटका वाघासारखं तरी जगेन. माझे सैनिक, माझे अधिकारी माझं खचित स्वागत करतील. '

रशियातील माघारीमुळे आणि दोस्त राष्ट्रांच्या संयुक्त आघाडीमुळे नेपो-लियन बादशहाच्या नशिबी एल्बाचा वनवास आला होता. इथे त्याला स्वातंत्र्य होतं. पण त्याच्या महत्त्वाकांक्षेला आणि पराक्रमाला संधी नव्हती. त्याचं युद्धोत्साही मन पूर्वीइतकंच खंबीर होतं. बिलकूल खचलं नव्हतं. संधी मिळाली तर इंग्लंड, प्रशिया, रशिया आणि ऑस्ट्रिया या चारी शत्रूंशी दोन हात करण्यासाठी त्याचे बाहू फुरफुरत होते. बादशहाला आपला पराभव धुऊन काढायचा होता. आपल्या पश्चात फ्रान्समध्ये पुन्हा

जुनी राजेशाही यावी, त्या राजेशाहीने परक्यांच्या ओंजळीने पाणी पीत राहावं, स्वार्थी मुत्सद्द्यांनी कारभार पोखरून टाकावा, आणि विशेष म्हणजे फ्रेंच सैनिक बेकारीने हैराण व्हावेत – या गोष्टी तो सहन करू शकत नव्हता. आपल्या सैन्यावर आणि अधिकाऱ्यांवर बादशहाचा अद्याप विश्वास होता. फ्रान्सचं वैभव वाढविण्यात, फ्रान्सचा दरारा निर्माण करण्यात, खुद्द बादशहाला बादशाही मिळवून देण्यात फ्रेंच सैनिकांचा फार मोठा वाटा होता. या सैन्यावर त्याचं पुत्रवत प्रेम होतं. बादशहाचा जयजयकार करण्यात आजवर सैनिकांनी धन्यता मानली होती. इटलीतील पहिली मोहीम (इ. स. १७९६) नेपोलियनने जेव्हा हाती घेतली तेव्हा फ्रेंच सैनिकांची अवस्था फार निकृष्ट दर्जाची होती. ना पोटभर अन्न, ना धड वस्त्र की ना धड शस्त्र, अशी ही अवस्था होती. पण नेपोलियनने मोहिमेवर निघण्यापूर्वीच त्यांना आश्वासन दिलं होतं—

'माझ्या शूर सैनिकांनो, तुमची स्थिती मी जाणतो. बिलकुल काळजी करू नका. जगातील एका समृद्ध प्रदेशात मी तुम्हांला नेत आहे. आपण तिथली ऐश्वर्यसंपन्न शहरं जिंकू. सुपीक प्रदेश टापेखाली आणू. जयाबरोबरच आपण तिथे संपत्ती मिळवू.'

हे आश्वासन त्याने पुरं केलं होतं. शत्रूकडून गोळ्यांचा वर्षाव होत असताही नेपोलियनने आपल्या सैन्याला लोदीच्या पुलावरून पार केलं होतं व मग ऑस्ट्रियन सैन्याला नमवून मिलानमध्ये थाटाने प्रवेश केला होता. विजयाची ही मालिका भावी काळात कुठं तुटलीच नाही. नेपोलियन पुढे बादशहा झाला तरी युद्धमोहिमा तोच आखी व युद्धाची सारी सूत्रं स्वतः चालवी. कधी तो सैन्याच्या अग्रभागी राही तर कधी पिछाडीला राही. पण कुठल्याही लढाईत त्याने अंगचुकारपणा केला नाही. महत्त्वाकांक्षा, साहस, चपळाई, निरीक्षण, त्वरित निर्णय घेण्याइतकं बुद्धिचापल्य असे अनेक गुण त्याच्या ठायी होते. या गुणांच्या जोरावर तो अजिंक्य ठरला.



८

# नेपोलियन बोनापार्ट

युरोपभर संचार करणारा गरुड एल्बा बेटात बंदीवान झाला होता. सागरात पोहणारा देवमासा तलावात कोंडण्यात आला होता. आल्प्स-पासून इजिप्तपर्यंत आणि स्पेन-पोर्तुगालपासून मॉस्कोपर्यंत ज्याने नेत्रदीपक घोडदौड मारली, युरोपमधील अनेक सिंहासने ज्याने उलथीपालथी केली त्याच्या नशिबी एल्बाचं टीचभर राज्य आलं होतं. दमल्याभागल्या

त्याने फ्रान्सची प्रतिष्ठा वाढविली आणि फ्रेंच सैन्याचा दर्जा उंचावला. फ्रान्सच्या कल्याणाखातर पॅरिसकडे त्याचं मन झेपावत होतं ते केवळ सैन्यावरील या प्रेमामुळे आणि विश्वासाने. सैनिकांना उत्तेजन देणारा, त्यांना युद्धकलेचं शिक्षण देणारा, त्यांच्या गुणांचं चीज करणारा आणि त्यांच्यावर अपरंपार प्रेम करणारा नेपोलियनसारखा युद्धवीर खरोखर विरळा.

आणि या प्रेमाच्या जोरावरच त्याने अखेरची झेप घेण्याचं ठरविलं. एका सायंकाळी गुप्त प्रयाणाची सिद्धता झाली. लहान-मोठी सात गलबतं बंदरात येऊन ठेपली. तैनातीला असणारे हजार विश्वासू सैनिक बादशहाला जपणार होते. पहाट उगवली. गरुडाचे पंख नवचैतन्याने फडफडले. वृद्ध आईचा आशीर्वाद घेऊन एल्बाच्या गुहेतून सिंह बाहेर पडला. मोठ्या धीमेपणाने, ऐटीत चालत स्वारी एका गलबतावर चढली, लाटा उसळत होत्या. पण त्यांची तमा न बाळगता गलबतं हाकारली गेली. शत्रूच्या टेहेळणी गलबतांना हुलकावणी देत देत नेपोलियन सागर आक्रमू लागला.

१ मार्च (१८१४)ला फ्रान्सच्या कॅनास बंदरात बादशाही गलबतं स्थिरावली. सागरोड्डाण संपलं होतं. आता मोठ्या धीरानं, चातुर्यानं आणि आत्मविश्वासानं पुढचा मार्ग सुधारायचा होता. जनतेची मनं राखून, सैनिकांना गोंजारून फ्रान्सची सत्ता पुनरपि हस्तगत करायची होती. शक्य तितक्या वेगाने पण गुप्तपणे पॅरिस राजधानी गाठायची होती. डोंगरदऱ्या, नद्यानाले, आडमार्ग ओलांडायचे होते. बादशहाच्या योजनेनुसार सैनिक पुढेपुढे चालू लागले. गावागावात त्यांचं स्वागत होऊ लागलं. बादशहाच्या आगमनाच्या वार्तेमुळे शेतकऱ्यांपासून तो सैनिकांपर्यंत सर्वांना आनंद झाला. आनंद न होता धडकी भरली ती फक्त राजाला आणि त्याच्या मिंध्या अधिकाऱ्यांना नी मंत्र्यांना.

बादशहाला रोखण्यासाठी राजाज्ञेने एक सैनिक तुकडी निघाली. ग्रिनोबलजवळ चकमक उडण्याचा प्रसंग आला. शस्त्रं उपसली गेली.

बादशहाचे अनुयायी उतावीळ झाले. पण ही वेळ रक्त सांडण्याची नव्हती. न डगमगता प्रसंग निभावून नेण्याची होती. प्रतिस्पर्ध्याचं बळ ओळखून नेपोलियनने शक्तीपेक्षा युक्ती योजली. शस्त्रं सरसावून पुढे झालेल्या आपल्या सैनिकांना मागे हटवून तो पुढे झाला, घोड्यावरून खाली उतरला व चालून येणाऱ्या सैनिकांना उद्देशून मोठ्याने म्हणाला, 'दोस्तहो, तुमच्यापैकी ज्या कुणाला आपल्या बादशहाला गोळी घालायची असेल त्याने पुढे यावं. हा पाहा, मी बादशहाच तुमच्यापुढे छाती उघडी करून उभा आहे.' बादशहाचे हे धीरोदात्त शब्द ऐकताच सरकारी सैनिक मागे हटले, त्यांची शस्त्रं गळून पडली आणि आनंदाचं भरतं येऊन जयजयकार करीत ते बादशहाच्या पायाला विलगले.

नेपोलियनचं सैन्यबळ वाढत चाललं. पॅरिस आता अवघं शंभर मैलांवर होतं. बुरबॉन राजसत्तेला कंप सुटला. शत्रुराष्ट्रं भयभीत झाली. बादशहाला रोखणं अनावर झालं. मार्शल ने यावर कामगिरी सोपवण्यात आली. ने बादशहाच्याच तालमीत तयार झालेला सेनाधिकारी. पण काळ फिरल्यावर नव्या राजवटीची तो चाकरी करू लागला होता. 'सिंहाला पकडून पिंजऱ्यात घालून आणतो' अशी प्रतिज्ञा उच्चारून तो पॅरिसबाहेर पडला. प्रत्यक्ष प्रसंग उभा ठाकला तेव्हा मात्र हा पोलादी मार्शल गर्भगळित झाला. आपल्या रुबाबदार बादशहाचं उग्रमंगल दर्शन घडताच ने याने तलवार भिरकावून दिली. मस्तक नमवून बादशहाचा मार्ग त्याने मोकळा केला.

रक्ताचा थेंब न सांडता यशस्वी ठरलेली नेपोलियनची ही पहिलीच मोहीम होती. केवळ हिंमतीच्या नी हिकमतीच्या जोरावर त्याने पॅरिस गाठलं. बुरबॉन राजा पळून गेला. राजसत्ता पुन्हा बादशहाच्या हाती आली.

बादशहाने पाहिलं तो कारभाराची घडी विस्कटून गेली होती. सैन्यदळं विखुरली होती. पंगुळली होती. स्वार्थी, कुटिल मुत्सद्दी शत्रुराष्ट्रांशी गुप्तपणे

खलबतं करीत होती. शत्रुराष्ट्रे तर बादशहाचे पंख कायमचे कापण्याच्या उद्योगात होती. युरोपच्या भूमीवर नेपोलियनचं अस्तित्व म्हणजे शांततेला धोका आणि युद्धाला निमंत्रण असा पक्का ग्रह त्यांनी करून घेतला. युद्धोत्साही नेपोलियन स्वस्थपणे फ्रान्सचा कारभार करीत बसेल यावर कुणाचा विश्वास बसेना. अंतर्बाह्य शत्रूंच्या या कोलाहलात बादशहाला तरी स्वस्थता कशी लाभावी ? आपण सत्तारूढ झाल्यामुळे शत्रुराष्ट्र आपल्याविरुद्ध पुन्हा एकजुटीने उभी राहणार याची त्याला कल्पना आली; नव्हे खात्री झाली. अंतर्गत कारभार सुरळीत ठेवणं आणि संभाव्य युद्धाची तयारी करणं अशी दुहेरी अवघड कामगिरी त्याला आता पार पाडायची होती. त्यात भरीला म्हणून प्रापंचिक कटकटी होत्याच. लाडक्या जोसेफाइन राणीच्या मृत्यूमुळे राजवाडा भकास वाटत होता. तरुण राणी लुइसा बेइमानी करून बापाकडे पळून गेली होती. आपण गेली ती गेली आणि संगे मुलालाही तिने बरोबर नेलं. या मुलाचं मुखकमल कुरवाळण्यासाठी तो किती उतावीळ झाला होता ! मुलाचं बारसं त्याने केवढ्या दिमाखानं साजरं केलं होतं ! ' किंग ऑफ रोम ' असा किताब देऊन त्याला आपला वारस नेमलं होतं. पण हा मुलगाही राजवाड्यात नव्हता. त्याचं दर्शन दुर्लभ झालं. एक आई आणि धाकटा भाऊ जेरोम सोडला तर सारे बंधू, बहिणी, सगेसोयरे पडत्या काळात त्याला सोडून गेले होते. सोबतीला होते ते फक्त सैनिक.

व्हिएन्नाला जमलेल्या शत्रुराष्ट्रांनी नेपोलियनविरुद्ध पुन्हा युद्ध पुकारलं. ऑस्ट्रिया-रशिया पूर्वेकडून फ्रान्सवर धाड घालणार होते. प्रशिया-इंग्लंड उत्तरेकडून तुटून पडणार होते. त्यांचं अडीच लाख सैन्य बेल्ज्यममधून पॅरिसकडे धाव घेणार होतं. प्रशियाचा वृद्ध सेनानी मार्शल ब्लुचर आणि इंग्लंडचा ड्यूक ऑफ वेलिंग्टन यांनी नेपोलियनच्या युद्धकौशल्याला आव्हान दिलं. आपापली सेना घेऊन दोघे बेल्ज्यममध्ये उतरले. त्यांची हातमिळवणी काय ती व्हायची होती.

आभाळ चारी बाजूंनी भरून आलं. फ्रेंच जनता अस्वस्थ झाली. तिला युद्धाचा, रक्तपाताचा वीट आला होता. पण बादशहा आता इरेला पडला. शत्रूंना खडे चारण्यासाठी त्याने पुन्हा दंड थोपटले. अल्पावधीत एक लक्ष अठ्ठावीस हजार सैन्य त्याने खडं केलं. शत्रूच्या दुप्पट सैन्याशी मुकाबला करायला हे सैन्य वास्तविक अपुरं होतं. पण बादशहाची भिस्त संख्येपेक्षा वेगवान हालचालींवर, युद्धकौशल्यावर व डावपेचांवर अधिक होती. अधिक सैन्य जमवायला त्याला मुळी उसंतच नव्हती. युद्धप्रसंगी आक्रमक पवित्रा घेण्याची त्याची नेहमीची रीत होती. त्याच रीतीचा त्याने या आणीबाणीच्या प्रसंगी अवलंब केला. पॅरिसमधून आघाडीवर कूच करण्यापूर्वी कार्नोटने सल्ला दिला, ' थोडं थांबा. आणखी सैन्य जमवू.' बादशहाने आत्मविश्वासाने उत्तर दिलं, ' आता थांबणे नाही. मला घाई केली पाहिजे. शत्रूवर सुरुवातीलाच एक विजय मिळवला पाहिजे. युद्ध बेल्ज्यममध्ये घुसून करायचं. आपल्या देशात नाही. वेलिंग्टन-ब्लूचरची सैन्यं एकत्र होण्यापूर्वीच एकेकाला टोला हाणून नेस्तनाबूत करू. आता जिंकू किंवा मरू.'

वॉटर्लूच्या दिशेने नेपोलियन त्वरेने निघाला. आपल्या हालचाली शत्रुपक्षाला कळू न देण्याची त्याने शिकस्त केली. १५ जूनला फ्रेंच सैन्य धडाक्यासरशी बेल्ज्यममध्ये शिरलं. सॅम्ब्री नदी ओलांडून चार्लेरीजवळ छावण्या पडल्या. इथे नेपोलियनने आपल्या सैन्याचे तीन विभाग केले. एक विभाग ब्रुसेल्सच्या दिशेने वेलिंग्टनच्या समाचाराला जाणार होता व दुसरा लिग्नीच्या रोखाने ब्लूचरवर चाल करणार होता, तर तिसरा राखीव विभाग इतर दोन विभागांची पाठराखण करणार होता. नेपोलियनच्या यानंतरच्या हालचाली इतक्या झपाट्याने झाल्या की दोन्ही शत्रुसैन्यं विथरून गेली. ब्लूचरला अनेक ठाणी सोडावी लागली. लिग्नीला पाऊण लाख सेना गोळा करून तो प्रतिकारासाठी उभा राहिला. वेलिंग्टन

हा ब्लूचरपेक्षा अधिक सावध सेनानी होता. नेपोलियनच्या चढाईमुळे आपल्या सैन्यात घबराट होऊ न देण्याची त्याने वेळीच काळजी घेतली. अधिकाऱ्यांना बोलावून पुढचे बेत आखले. रात्री तर तो आघाडी सोडून वेल्ज्यमच्या राणीकडे खान्याला गेला. तिथे टेबलावर रणक्षेत्राचा नकाशा उलगडून ठेवलेला होता. खाना खाता खाता तो एकदम उठला व नकाशावर बोट ठेवून राजाला म्हणाला 'नेपोलियनने आम्हांला चकवलं. आमच्या अपेक्षेपेक्षा चोवीस तास अगोदर तो रणक्षेत्रावर पोचला. काही हरकत नाही. आमचं सैन्य कवाट्रेब्रासला गोळा होत आहे. पण अंतिम युद्ध तिथे नाही होणार. अखेरचा टोला मी या इथे हाणणार.' इथे म्हणून वेलिंग्टनने जी जागा दाखवली ती वॉटर्लूच्या दक्षिणेला एका निरुंद डोंगरपठाराची होती. मौंट सेंट जीन हे त्या जागेचं नाव.

१६ तारखेला सकाळी नेपोलियन घोडयावर स्वार झाला व छावणीबाहेर पडून प्रशियन सैन्याचे मोर्चे निरीक्षिले. दुपार होते न होते तोच पस्तीस हजार सैन्यदळासह त्याने प्रखर हल्ल्यांना आरंभ केला. दुसरीकडे मार्शल ने याला कात्रेब्रासच्या दिशेने चढाई करण्याची त्याने आज्ञा दिली. हल्ले-प्रतिहल्ले यांना जोर चढला. थोडथोडा पाऊस पडत होता तरी उभयतांची सैन्यदळं आवेशाने लढू लागली. लिग्नीला तुंबळ युद्ध माजलं. फ्रेंच सैन्याच्या धगधगत्या आक्रमक चालीने प्रशियन सेना दबू लागली. मागे हटू लागली. रणधुमाळीत मार्शल ब्लूचरच्या घोडयाला गोळी लागली. ब्लूचर जखमी होऊन खाली कोसळला. त्याला पटकन उचलून मागे घेण्यात आलं. सायंकाळपर्यंत प्रशियनांचा प्रतिकार कोलमडला. ग्लेसिनो माघार घेऊन उत्तरेकडे वेव्हरीच्या दिशेने निघाला. नेपोलियनला या दिवशी दणदणीत विजय मिळाला होता. विजयाच्या रात्री रणक्षेत्रावर तो शांतपणे झोपी गेला.

१७ तारखेला सकाळी मार्शल ग्रौचीने प्रशियनांचा पाठलाग करण्याची आज्ञा मागितली. पण नेपोलियन म्हणाला, ' इतक्यात नको. तशी वेळ आली की मी सांगेन. ' सूर्य वर वर येत होता. नेपोलियनच्या आज्ञेनुसार युद्धाला तोंड लागलं. ग्रौची तेहतीस हजार सैन्य घेऊन प्रशियनांच्या लांडगेतोडीस निघाला. पण चुकीच्या दिशेने. त्यामुळे माघार घेणारी प्रशियन सेनादळं वेव्हरीला अपेक्षेपेक्षा लवकर पोहोचली आणि ग्रौची मात्र रणक्षेत्रापासून दूर गेला. पश्चिमेच्या अंगाला मार्शल नेची चाल वेलिंग्टनने रोखून धरली. ने वारंवार कुमक मागत होता. त्याच्या हाताखालचं वीस हजार सैन्य लिग्नीच्या युध्दप्रसंगी गुंतून पडलं होतं. वास्तविक तशी जरूरी नव्हती. पण बादशहाची आज्ञा म्हणून कुणीतरी चुकीचा निरोप पाठविला आणि नेचं सैन्य विभागलं गेलं. वेलिंग्टनच्या सैन्यावरील त्याचे हल्ले त्यामुळे कमजोर होऊ लागले. फ्रेंच सेना संख्येने आधीच कमी होती. त्यातून ऐन युध्दप्रसंगी त्या सैन्याची अशी विभागणी – पांगापांग झाल्यामुळे शत्रुपक्षांनी पुरेपूर फायदा घेतला. कात्रेब्रासला नेला थोपवून वॉटर्लूच्या दक्षिणेला वेलिंग्टनने भक्कम अशी संरक्षक फळी उभारली. ब्लूचरची सेनादळं उत्तरेकडून झपाट्याने त्याच्याशी हातमिळवणी करू लागली.

१८ जूनचा रविवार उजाडला. हवा ढगाळ होती. नेपोलियनचे सैनिक कपडे वाळवीत होते. बंदुका-तोफा कोरड्या करीत होते. निकाली युद्धासाठी घोडदळं फुरफुरत होती. पायदळं उतावीळ झाली होती. तोफा रणरणत होत्या. सारेजण बादशहाच्या आज्ञेची वाट पाहत होते. पण बादशहा या दिवशी नेमका उशिरा उठला. पराभवाची लवलेश भीती त्याच्या चर्येवर नव्हती. विजयासंबंधी उदंड आत्मविश्वास तो बाळगून होता. आता चढाईला खरं म्हणजे विलंब झाला होता. लष्करी गणवेश चढवता चढवता हाताखालच्या अधिकाऱ्याला तो

म्हणाला, ' तुम्ही लोक वेलिंग्टनचा उगाच बाऊ करता. ब्रिटिश सेना मामुली आहे. आजचा मामला मी दोन-तीन तासांत आटपून टाकतो. ' दहाच्या सुमारास घोडयावर स्वार होऊन नेपोलियनने ब्रिटिश सैन्याची टेहेळणी केली. त्यानंतर बाराच्या सुमारास अंतिम युद्धाचं रणशिंग फुंकलं गेलं. हॉगमाँटच्या ठाण्यावर फ्रेंच पायदळाने झंझावाती हल्ला चढविला. दोन्ही बाजूंनी तोफा धडधडू लागल्या. मुडद्यांच्या राशी पडू लागल्या. बादशहाचा धाकटा भाऊ जेरोम आवेशाने लढू लागला.

दुसरीकडे खुद्द नेपोलियन बादशहा वीस हजार सैन्यासह ला हे सेंट ठाण्यावर चाल करून गेला. ब्रिटिशांकडून कडवा प्रतिकार होऊ लागला. पण जबर हानी सोसून नेपोलियनने ते ठाणे मारले. पठारावरून वेलिंग्टनचं सैन्य आग ओकत होतं. नेपोलियनने शेवटी आपला मोर्चा तिकडेच वळवला. पण एवढयात प्रशियन सैन्य त्याच्या पिछाडीवर येऊन ठेपलं. नेपोलियन कात्रीत सापडला. सैन्याची विभागणी करून तो दोन्ही अंगाला अटीतटीने लढू लागला. मार्शल नेच्या घोडदळाने वेलिंग्टनच्या रोखाने अशी वेगवान चाल केली की, वाहवा रे वाहवा ! पण वेलिंग्टन होता उंचावर, सुरक्षित जागी. त्याच्या पायदळाने आणि तोफखान्याने फ्रेंच घोडदळावर भयंकर मारा सुरू केला. नेपोलियन रणक्षेत्रात भक्कम पाय रोवून आपल्या सैन्याला उत्तेजित करीत होता. तीन-चार मैलांच्या रणक्षेत्रात एकच रणधुमाळी माजली. तोफांचा गडगडाट, बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव, तलवारींचा खणखणाट, मुडद्यांच्या राशी, जखमींचं विव्हळणं, रक्ताचे पाट आणि अश्रूंच्या नद्या ! तासातासाला युद्धाचं पारडं फिरत होतं. दुपारनंतर वारा शत्रूला अनुकूल वाहू लागला. फ्रेंच सैन्याची जबर हानी होत होती. मार्शल ग्रौचो निरोप पाठवूनही वेळेवर येऊ शकला नाही. ब्रिटिश-प्रशियन सेनादळाच्या एकत्रित सामर्थ्यापुढे फ्रेंच सैन्य टिकाव धरीना. ते गोंधळू लागले. मागे मागे सरू लागलं सायंकाळी पळापळीला सुरुवात झाली.

सात वाजता शत्रूला अखेरचा तडाखा देण्यासाठी नेपोलियनने निर्वाणीचं अस्त्रं सोडलं. पाच हजार ओल्ड गार्ड्स आपल्या बादशहाच्या आज्ञेसरशी वेलिंग्टनच्या सैन्यावर तुटून पडले. जिवावर उदार होऊन पेटत्या रणयुद्धात त्यांनी झेप घेतली. जिंकणे किंवा मरणे एवढी एकच गोष्ट बादशहाने त्यांना शिकविली होती. पावलापावलागणिक त्यांच्यावर तोफा-बंदुका आग वर्षू लागल्या. दुसऱ्या बाजूने मार्शल नेचं घोडदळही असंच तुटून पडलं. रणधुमाळीत उभयपक्षांचे हजारो सैनिक मृत्युमुखी पडत होते. पण सारेच बेभान होऊन लढत होते. ओल्ड गार्ड्स त्या धुमाळीत पाहता पाहता नाहीसे झाले. रात्र झाली तशी फ्रेंच सैन्याने हात टेकले. उरलेसुरले माघार घेऊन पळू लागले. नेपोलियनला हे दृश्य बघवेना. राखीव अशा खास तुकडीसह तो स्वतःच आता कुर्बानी करायला निघाला. पण इमानदार अनुभवी सैनिकांनी बादशहाला या साहसापासून मागे खेचलं. घोडागाडी टाकून बादशहा शुभ्र घोड्यावर स्वार झाला आणि रणक्षेत्रातून वेगाने बाहेर पडला. माघार घेणाऱ्या फ्रेंच सैन्यावर प्रशियन सैन्य लांडग्यासारखं तुटून पडलं. दैव बलवत्तर म्हणून नेपोलियन निसटला व अखंड दौड करीत दोन दिवसांनी पॅरिसला पोहोचला. वॅाटर्लूची लढाई त्याच्या आयुष्यात अखेरची ठरली. ही लढाई तो हरला होता. असा पराभव त्याने कधी अनुभवला नव्हता.

पण नेपोलियनचा हा पराभवसुध्दा उल्कापाताप्रमाणे नेत्रदीपक म्हणावा लागेल. वॉटर्लूच्या संग्रामात जिंकणाऱ्यांपेक्षा पराभूत झालेलाच इतिहासात अधिक कीर्तिमान झाला. फ्रान्सच्या या पराभूत अजोड सेनानीला आणि प्रिय बादशहाला उर्वरित आयुष्य सेंट हेलिनासारख्या दूरच्या बेटात घालवावं लागलं. पाच-सहा वर्षे तिथे हा गरुड नजरकैदेत होता. पण त्याचं जिद्दी, महत्त्वाकांक्षी, स्वाभिमानी मन कधी मरगळलं नाही. अखेरपर्यंत ते ताठ होतं, झुंजार होतं.

* * *



१

# यशवंतराव होळकर

२५ ऑक्टोबर १८०२. दिवाळीचा सण. नरकचतुर्दशीची सकाळ. पुण्याजवळ हडपसरच्या मैदानात शिंदे-होळकरांच्या फौजा समोरासमोर युद्धासाठी पवित्र्यात उभ्या होत्या. गोलंदाज हुकुमाची वाट पाहत होते. चढाई करण्यासाठी घोडदळ फुरफुरत होती. शिंद्यांच्या फौजेमागे पेशव्यांचा जरीपटका हत्तीवर डुलत होता. युद्धाला तोंड फक्त लागायचं होतं. युध्द

टाळण्याचे सारे यत्न वाया गेले होते. शिंद्यांचा तोफखाना उतावीळपणे रणरणू लागला तशी यशवंतराव होळकराने आपल्या गोलंदाजांना ताकीद दिली, ' आधी तिकडून गोळा सुटू दे. पंचवीस गोळे सुटल्यानंतर आपले गोळे सुटतील. पेशव्यांच्या जरीपटक्याचा मान होळकर किती राखतो हे पेशव्याला समक्ष पाहू द्या. मागे हटा, आपलं घोडदळ मागे घ्या. '

होळकरी स्वार मागे सरले त्याबरोबर शिंद्यांच्या तोफा आग ओकू लागल्या. होळकरांचे पाच-पंचवीस मुडदे पडले. पंचवीस गोळे आल्यावर मात्र यशवंतरावाने तलवार उंचावली व सैन्याला चालून जाण्याचा इशारा दिला. घोडीवर स्वार होऊन तो स्वतः पुढे निघाला. पाटीशी ढाल-भाला, हातात नंगी तळपती तलवार, डोक्याला होळकरशाही पगडी अशा रणवेशात तो रणवेताळ हाणामारी करू लागला. घोडदळाला घोडदळ भिडली. तोफांच्या अविरत सरबत्तीत मुडद्यांच्या राशी पडू लागल्या. युद्धगर्जनांनी आणि किंकाळ्यांनी हडपसर-वानवडीचा आसमंत दुमदुमून गेला. सकाळी नऊपासून युद्धाला जे तोंड लागलं ते दुपार टळेपर्यंत. यशवंतरावाच्या गालावर, खांद्यावर, दंडावर जखमा झाल्या. कपडे रक्ताने न्हाऊन निघाले. पण बहाद्दर शत्रुसैन्यात घुसून आवेशाने लढतच राहिला. शिंद्यांचा सेनापती जिवबादादा बक्षी हातघाईच्या लढाईत कामी येताच त्याचं सैन्य माघार घेऊ लागलं, पळू लागलं. त्या पळणाऱ्या सैन्याची होळकरी सैन्याने दाणादाण उडविली. लढाईची मौज दुरून पाहणारे श्रीमंत बाजीराव आणि त्यांचे साथीदार पर्वतीच्या दिशेने केव्हाच पळून गेले होते. बाजीराव आणि दौलतराव शिंदा यांची अमंगळ युती हडपसरच्या रणमैदानात धुळीला मिळाली. होळकरांचे सोळाशे सैनिक ठार झाले, तर शिंद्यांचे नी विंचूरकरांचे पाच-सहा हजार गतप्राण झाले. सायंकाळी कावळ्यांची, गिधाडांची एकच झुंबड उठली. रणरणत्या त्या युद्धभूमीवर शिंद्यांच्या अनेक तोफा, बंदुकी, भाले, तलवारी, तंबू, दारू-

Library stamp with handwritten numbers (partly illegible)



गोळा होळकरी सैन्याच्या हाती आला. वानवडीला दरबार भरवून यशवंतरावाने आपल्या शूर सहकाऱ्यांचा सन्मान केला. विशेषतः पठाण सरदारांची बहुत वाहवा केली. पुण्यापर्यंतची ही यशस्वी घोडदौड रवंथ करीत करीत रात्री तो शांतपणे झोपी गेला.

जयापजयाच्या झोक्यांनी यशवंतरावाचं सारं आयुष्य, सारं कसलं – उणंपुरं पस्तीस वर्षांचं आयुष्य वादळी बनून गेलं आहे. सामान्य माणूस केवढी असामान्य कामगिरी करू शकतो याचे स्फूर्तिदायक उदाहरण म्हणजे यशवंतराव. बरं, मोठेपणा मिळवून तरी या माणसाच्या वाट्याला सत्कीर्ती आली का ? तर नाहीच. उभ्या हयातीत, नव्हे नव्हे मृत्यूनंतरसुद्धा, जवळजवळ शे-सव्वाशे वर्षं हा माणूस उपेक्षित राहिला. 'जुल्म, जबरदस्ती करणारा एक दंगेखोर, बंडखोर, ' क्रूर सरदार ' अशा कुप्रसिद्धीनं हे तेजस्वी रत्न खितपत पडलं होतं. पण अखेर काळ माणसाची खरी पारख करतो. इतिहासाची नवीनवी साधनं उपलब्ध होताच यशवंतरावासारख्या कित्येक निंदावाचक व्यक्ती आता प्रशंसेच्या प्रकाशात चमकू लागल्या आहेत. पेशवाईअखेरचा मराठी सत्तेचा कोसळता डोलारा सावरून धरणारा एक रणझुंजार सेनानी आणि मुत्सद्दी या नात्याने यशवंतरावाचे पोवाडे गायिले जात आहेत.

होळकरशाहीतील या पस्तीस वर्षांच्या बहाद्दराचं आयुष्य नाना संकटांनी भरलेलं आहे. या आयुष्याचं अलौकिकत्व यात आहे की, कोणत्याही संकटाला हा पठ्ठा डगमगला नाही. उलट संकटं जितकी अधिक, परिस्थिती जितकी प्रतिकूल, तितका याचा उत्साह आणि कार्यशक्ती वाढत गेली. खंत वाटावी, शल्य बोचत राहावं अशा स्थितीत यशवंतरावाचा जन्म झाला. लोकांनी तेजोभंग करावा अशी कर्णासारखी याची जन्मकथा आहे. पण हा दासीपुत्र ( रक्षापुत्रच ) अर्थाचा दास झाला नाही. आपल्या कुलातील औरस संततीशी, होळकरांच्या अस्सल गादीशी हा नरव्याघ्र शेवटपर्यंत इमानदार राहिला.

पुण्यश्लोक अहल्याबाईच्या निधनानंतर तुकोजीराव होळकराकडे माळव्याची सुभेदारी आली. १७९७ साली तुकोजीराव पुण्यात वारले. त्यांना चार पुत्र होते. काशीराव आणि मल्हारराव हे औरसपुत्र आणि विठोजी व यशवंतराव हे दोन दासीपुत्र. तुकोजीच्या इच्छेप्रमाणे त्याच्या पश्चात काशीरावाला सुभेदारीची वस्त्रं मिळाली. पण या घटनेमुळे होळकर-पुत्रात दुफळी माजली. काशीराव एका बाजूला, तर मल्हारराव, विठोजी नि यशवंतराव दुसऱ्या बाजूला असे दोन तट पडले. काशीराव थोरला खरा, पण नेभळा होता. त्याला आपलंसं करून बाजीराव आणि त्याचे दोस्त दौलतराव शिंदे होळकरशाहीच्या नाशाला उद्युक्त झाले. शिंदे-होळकरांमधील जुना वैरभाव काशीरावाच्या अधिकारप्राप्तीनंतर उफाळून वर आला. होळकर डोईजड होणं बाजीरावाला कसे रुचणार? शिंद्यांमार्फत होळकरी सामर्थ्य परस्पर खच्ची झालं तर ते त्याला हवंच होतं.

काशीरावापेक्षा मल्हारराव शूर, बाणेदार होता. बाजीराव-दौलतराव या कारस्थानी दुकलीशी हातमिळवणी करण्याचं त्याने साफ नाकारलं. पुण्यात राहून त्याने आपला नवा गोट स्थापन केला. मल्हारराव आपल्या जाळ्यात येत नाही असं पाहताच दौलतरावाने त्याचा काटा काढण्याचं ठरविलं. एका भल्या पहाटे शिकारीची हूल उठली. मल्हाररावाच्या छावणीवर छुपा छापा पडला. दगाफटक्याची जाणीव होताच तो तत्काळ घोड्यावर बसला व हल्लेखोरांवर तुटून पडला. पण मारेकरी संख्येने भारी होते. त्यांच्या संगिनींचे वार झेलत मल्हारराव खाली कोसळला. त्याची छावणी लुटली गेली. बायको शिंद्यांच्या कैदेत सापडली. काशीराव तर आता त्याच्या पूर्ण आहारी गेला. त्याच्या हातचं बाहुलं बनला.

विठोजी आणि यशवंतराव हे दोघे तरुण रक्ताचे, तापट वृत्तीचे, साहसी, हिकमती होते. होळकरशाहीचा अभिमान त्यांच्या रोमरोमांत भिनलेला

होता. त्यामुळे त्यांचा साहजिकच मल्हाररावाकडे ओढा होता. त्यांच्या दुर्दैवाने मल्हारराव अचानक मारला गेला. तरुण व अननुभवी असल्यामुळे या घटनेमुळे ते दोघे भयभीत झाले व पसार झाले. विठोजी सोलापूर-पंढरपुराकडे गेला, तर यशवंतराव जेजुरीच्या खंडोबाला दंडवत घालून खानदेश-नागपूरकडे वळला. कशासाठी? तर नशीब काढण्यासाठी. आपलं भवितव्य आपणच घडवून आणण्यासाठी. पुण्यातून बाहेर पडतेवेळी तो अगदी एकांडा शिलेदार होता. जवळ माणसं नाहीत, पैसा नाही, अशी त्याची अवस्था होती. पण बेट्याची छाती निधडी होती. हिंमत मोठी होती. अंगात विलक्षण रग होती. मनात आकांक्षाही जबर होती. बुद्धी देखील सामान्य नव्हती. चेहरेपट्टी व वाणी तर अशी मोहक, आर्जवी होती की, सहवासात आलेला माणूस हां हां म्हणता त्याची चाकरी पत्करी. थोरले मल्हारबाबा, अहल्याबाई, तुकोजीराव यांची कीर्ती, त्यांचे पेशव्यांशी असणारे जिव्हाळ्याचे संबंध या गुलामाला चांगले ठाऊक होते. होळकरांची सुभेदारी म्हणजे माळव्यात पसरलेली मराठी सत्तेची एक डवरलेली शाखा आहे हे तो जाणून होता. छत्रपती पेशवे यांच्याविषयी मनात पराकाष्ठेची निष्ठा बाळगूनच तो आपल्या भावी उद्योगाला लागला; आणि हा उद्योग तरी केवढा महान् !

माणसं जोडायची, पैका उभारायचा, फौज गोळा करायची, लढाया करायच्या, शिंद्याला धडा शिकवायचा, होळकरशाही वर्धिष्णू करायची आणि इंग्रजांच्या वाढत्या परचक्रापासून खुद्द पेशवाई देखील वाचवायची. पेशवा नालायक आहे हे माहीत असूनसुद्धा यशवंतराव एकांडेपणाने व जिद्दीने झुंजणार होता. 'याल तर तुमच्यासह, न याल तुमच्याविना, मारिता मारिता घ्यावे राज्य अपुले' असं उग्रमंगल ध्येय बाळगून त्याची घोडदौड सुरू झाली.

यशवंतरावाच्या झुंजार जीवनाचे दोन भाग पडतात. त्याचं रणकारण – राजकारण हा एक भाग आणि त्याचं व्यक्तिगत भावनोत्कट उद्दाम जीवन

हा दुसरा भाग. तसं पाहिलं तर व्यक्तिगत जीवन उपभोगायला त्याला फारशी उसंतच मिळाली नाही. तारुण्याच्या उंबरठ्यावरून त्याने घोड्यावर जी बैठक मारली ती अखेरपर्यंत. 'मी घोडयावर असेपर्यंत होळकरशाहीच नव्हे, तर सारं जग माझं आहे' असा उदंड आत्मविश्वास त्याचे ठायी होता. साहस, पराक्रम, झुंज हाच त्याच्या जीवनाचा स्थायीभाव. विश्रांती, विरंगुळा त्याच्या फारशी गावी नव्हती. याचा अर्थ संसारसुख, नाना विलासभोग त्याला नको होते असं नाही. लढाया मारून आला की, थोरल्या बाजीरावाप्रमाणे किंवा नेपोलियनप्रमाणे यशवंतरावही अंमळ ख्यालीखुशालीत रंगून जाई. मोहवश होई. चढत्या पराक्रमाच्या काळात तुळसा नामक तडफदार स्त्रीशी त्याचं लग्न झालं. पराक्रमाच्या धुंदीत पुढे तो मद्यप्राशन करू लागला. केशरसारखी नाटकशाळा त्याने जवळ बाळगली होती. नाचरंग, तमाशे त्याला वर्ज्य नव्हते. पण हे सारे सुखविलास त्याच्या पराक्रमाच्या आड आले नाहीत. शत्रूची चाहूल लागली, कट-कारस्थानांचा सुगावा लागला की यशवंतराव क्षणात खडबडून उठे व शत्रूच्या अंगावर झेप घेई.

साहस, पराक्रम, जिद्द, मुत्सद्देगिरी आणि दौलतीशी निष्ठा हे यशवंतरावाचे प्रमुख गुण होते, तर राग, द्वेष, उतावीळपणा, क्रौर्य आणि स्वामिनिष्ठेच्या भाबडया कल्पना हे त्याचे दोष होते. त्याचे गुण आणि प्रखर ध्येयवाद पाहून होळकरशाहीतील अनेक सरदार त्याच्याभोवती गोळा झाले. पुण्याहून माळव्यापर्यंत मारलेल्या भरारीत त्याने शेकडो माणसे जोडली. मोठी फौज जमविली. त्याच्या फौजेत पठाण, मुसलमान, इंग्रज, मराठे, पेंढारी असे अनेक जातिधर्मांचे सैनिक होते व त्या सर्वांना त्याने जरबेत ठेवले होते. फौजेवर त्याचे अपत्यवत प्रेम होते. फौजेसाठी त्याला अनेक ठिकाणी लूटमार करावी लागली, शस्त्रं गोळा करावी लागली, पैसा खणून काढावा लागला. शिंद्यांच्या मुलुखात त्याने ज्या अनेक

लढाया मारल्या त्यामुळे उत्तरेकडील राजेरजवाडे यांनी धास्ती घेतली. इंग्रजांनासुद्धा त्याच्या वाढत्या पराक्रमाची भीती वाटू लागली. इंग्रजांशी कधी ना कधी आपणांला सामना द्यावा लागणार हे ओळखून त्याने आपल्या फौजेला कवायती शिक्षण दिलं. इंदोरनजीक भानपुऱ्याला बंदुकीचा नी दारूगोळ्याचा कारखाना त्याने काढला. यशवंतराव कधी गनिमी पद्धतीने लढे तर कधी समोरासमोरही तो युद्धाला उभा राही. हडपसरच्या लढाईतील विजयामुळे पुण्याची सत्ताच त्याच्या हाती आली.

पळपुटा, कारस्थानी बाजीराव महाडमार्गे वसईला इंग्रजांच्या आश्रयाला गेला. तैनाती फौजेचा तह करून इंग्रजांना त्याने घरात घेतले. पुण्याला वाली उरला नाही. यशवंतरावाने बाजीरावाच्या धाकट्या भावाशी म्हणजे अमृतरावाशी सामोपचाराची बोलणी केली. पण अमृतराव आपल्या पायावर उभाच राहीना. मग यशवंतरावाला नाइलाजाने पुण्यावर आपला अंमल बसवावा लागला. हा अंमल अतिशय कडक होता. यशवंतराव आणि त्याचे पठाण अधिकारी कर्दनकाळासारखे पुण्यात वागले. युद्धखर्चाची भरपाई करण्यासाठी होळकरांच्या फौजेने पुण्यात अक्षरशः धुंडाई माजविली. बाजीराव-दौलतराव यांच्या माणसांचा छळ सुरू झाला. विठोजी होळकराचा बाजीरावाने शनिवार-वाड्यापुढे भीषण वध केला होता. त्या वधाचा यशवंतराव एक प्रकारे सूड उगवू लागला. भावाच्या वधानंतर त्याने बाजीरावाला उद्देशून एक पत्र लिहिले. या पत्रातील आशयावरून त्याची उदार बुद्धी व स्वामिनिष्ठा दिसून येते हे खरे. तथापि नाशकात, पुण्यात, माळव्यात, खानदेशात आणि देशावरच्या काही भागांत त्याने जी आडदांड क्रूर अशी लूटमारीची कृत्ये केली व प्रतिष्ठितांची अमानुष छळणूक केली, ती समर्थनीय ठरत नाही. यशवंतरावाने कनवाळूपणा, कृतज्ञता बुद्धी कधी दाखविली नाही असे नाही. हाताखालच्या विश्वासू, शूर लोकांशी

तो फार मोठ्या मनाने वागला आहे. पण एकंदरीने त्याची वृत्ती बेफामच म्हणावी लागेल. तो कडक–भडक स्वभावाचा होता ही गोष्ट त्याने दिलेल्या शिक्षेच्या प्रकारांवरून देखील स्पष्ट होते. पण या गोष्टी तो जाणूनबुजून करीत होता. स्वकीयांबरोबर लढण्यात त्याला सुख नव्हतं. स्वकीयांना शिक्षा ठोठावण्यात तो आनंद मानीत नव्हता. त्याला मुळी आपला राग, वृत्ती काबूतच ठेवता येत नसत. एखाद्यावर फिदा झाला की यशवंतराव त्याला सारं काढून देईल, नी एखाद्यावर फितुरीसाठी म्हणा किंवा अन्य काही चुकीमुळे म्हणा, पण गैरमर्जी झाली की तो त्याला तापल्या तव्यावर उभं करील, त्याचं डोसकं मारील, मुंडकं उडवील किंवा त्याच्या घरादारावरून नांगर फिरवील. सैन्यातील कित्येक फितूर इंग्रजांची व सहकाऱ्यांची त्याने अशा प्रकारे गत लाविली. याउलट त्याच्या सौम्य धोरणाचीही उदाहरणं आहेत. दौलतराव आणि काशीराव यांच्याशी युद्ध मांडलं असून देखील त्याने सलोख्याचे यत्न केले. पण या अभागी नाकर्त्यांना यशवंतरावाच्या व्यापक कार्याचे व पराक्रमाचे नीट आकलनच झालं नाही. इंग्रजांच्या बळाने भयभीत झालेले हे लक्ष्मीधर आपापल्या पगड्या संभाळीत राहिले.

यशवंतरावाने अखेरची झुंज घेतली ती इंग्रजांशी. तीस-चाळीस हजार फौज घेऊन तो गोऱ्यांना झुकांड्या देत होता. कधी गोरे त्याला दडपीत, तर कधी गोऱ्यांना तो वेसण घाली. पुण्याच्या मुक्कामात कर्नल क्लोजचा कावा ओळखून त्याच्या हालचालींना त्याने पायबंद घातला होता इग्रजांना तो आता खराखुरा शत्रू वाटू लागला. 'बंडखोर–दंगेखोर' म्हणून ते त्याची निंदा करीत. त्याच्या चढत्या पराक्रमाला व राजकीय उलाढालींना वेसण घालण्यासाठी इंग्रज जंगजंग पछाडू लागले. घोडदौडीत व लढाईत त्याला पराभूत करणे कठीण आहे असे दिसताच इंग्रजांनी भेदनीतीचं जाळं टाकलं. या जाळ्यात स्वार्थी, ऐषआरामी राजेरजवाडे हळूहळू गवसू लागले.

इंग्रजांचं प्रचंड सामर्थ्य नी स्वकीयांचा असहकार या जोड आपत्तींशी यशवंतरावाला तोंड द्यायचं होतं. प्रायः एकट्याच्या बाहुबलावरच तो आपला मार्ग काढणार होता. राजपूत, जाट, शीख, फार काय अफगाणच्या अमीरापर्यंत त्याने संधान साधण्याचा यत्न केला. पण कोणी त्याला साथ देईना. मुकुंदरा घाटात कर्नल मान्सनला ज्याने पळता भुई थोडी केली त्या यशवंतरावाला स्वकीयांचे जर पाठबळ मिळते तर कुंपणी सरकारवर भारतातून गाशा गुंडाळण्याचा प्रसंग ओढवला असता. पण दुर्दैवाने हे घडायचं नव्हतं. भरतपूरच्या वेढयात जनरल लेकला यशवंतरावाने चार महिने दाद दिली नव्हती. आता पंजाबात रणजितसिंगाने अपेक्षाभंग केल्यामुळे लेकपुढे त्याला स्वतःलाच नमावं लागलं. प्रत्येकजण आपलं कातडं बचावू लागल्यामुळे यशवंतरावाचे हात लुळे पडू लागले. ज्यांच्यावर विसंबून मोठमोठया लढाया मारल्या त्यांच्यापैकी काही सरदार त्याच्याच जिवावर उठू लागले. कट करू लागले. इंग्रजांना फितूर होऊ लागले.

यशवंतराव झुंजार शिपाईगडी खरा, पण अखेर हाडामासाचा माणूस होता. शत्रूचं सामर्थ्य आणि आपल्या मर्यादा ओळखण्याइतकी त्याला अक्कल होती. इंग्रजांविरुद्ध एकजूट उभारून रान उठवण्याचे त्याचे भगीरथ प्रयत्न वाया गेले होते. दैव फिरलं, आकाश फाटलं, पृथ्वी बुडू लागली तिथे तो एकांडा शिलेदार किती तग धरणार ? आपल्या सैन्यावर जिवापाड प्रेम करणारा हा सेनानी आपलं सैन्य अकारण मरू देण्यास आता तयार नव्हता. मानवी यत्नांची शिकस्त संपली होती. यशवंतरावाची फौज घरी परतू लागली. तो स्वतः निराश झाला. अपयशाने नी वैफल्याने त्याच्या मूळच्या उद्दाम वृत्ती उफाळून आल्या. जनरल लेकशी राजघाटला करावा लागलेला तह त्याला अपमानास्पद वाटत होता. तहाचं हे शल्य त्याच्या हृदयात खुपत होतं. थोडीशी फौज आणि

पत्नी या दोघांनीच त्याची शेवटपर्यंत सोबत केली. कठीण समय येताच इतरेजन त्याला सोडून गेले.

यशवंतरावाला ज्वर येऊ लागला. अधूनमधून त्याला वेडाचे झटके येत. दुःख, अपमान, चिंता विसरण्यासाठी हा स्वाभिमानी सेनानी मद्याचे पेले रिते करू लागला. वेडाच्या लहरीत, दारूच्या धुंदीत तो बडबडू लागला. बडबडण्यात, बरळण्यात कधीकधी युद्धाची भाषा बोले. मला घोडयावर बसवा म्हणून सांगे. पेशव्याने आपल्याला सुभेदारीची वस्त्रं द्यावीत यासाठी आयुष्यभर त्याने आटापिटा केला होता. इंग्रजांचा पाडाव करण्यासाठी, भारतातून त्यांना हाकलून लावण्यासाठी तळहातावर शिर घेऊन तो लढला होता. एकटाच लढला होता आणि आता एकटाच स्वर्गाकडे निघाला होता. मल्हाररावाचा एक पुत्र खंडेराव त्याचा लाडका होता. त्याला सुभेदार करण्याचं त्याच्या मनात होतं. पण ते पोर अकाली गेलं. काशीराव तर यापूर्वीच वारला होता. मायापाश उरले होते ते म्हणजे पत्नी, मुलगी भीमा, आणि केशर दासीपासून झालेला मुलगा मल्हारराव. होळकरांच्या गादीचा वारस. पण या साऱ्यांना सोडून, अविश्रांत धडपडीने, दगदगीने, घोडदौडीमुळे थकूनभागून यशवंतराव होळकर २७ ऑक्टोबर १८११ रोजी मृत्यू पावला. तो वाघासारखा जगला आणि विजेसारखा चमकून गेला.

▣ ▣ ▣



१०

# विन्स्टन चर्चिल

इंग्लंडचा कणखर पंतप्रधान आणि युद्धनेता या नात्याने चर्चिलची कामगिरी जगाच्या इतिहासात अजरामर आहे. चर्चिलसारखा अष्टपैलू नेता शतकातून एखादाच निपजतो. चर्चिल हा मूळचा कट्टर साम्राज्यवादी. भारताच्या स्वातंत्र्याला त्याने अनेकदा विरोध केला. पण दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणाची परिस्थिती पालटताच त्याची

साम्राज्यनिष्ठा बोथटली. स्वातंत्र्य आणि लोकशाहीचं नवं वारं सुरू होताच त्याने आपल्या ताठ धोरणाला मुरड घातली. इंग्लंडच्या सत्ताधारी मजूर पक्षाने भारताला स्वातंत्र्य देण्याचं ठरविताच चर्चिलने खेळाडू-पणाने त्या निर्णयापुढे मान तुकविली. पंतप्रधान नेहरू इंग्लंडला गेले असताना चर्चिलने त्यांना खान्यासाठी खास आमंत्रण दिले. मोठ्या माणसाचं मोठेपण अशा छोट्या प्रसंगातूनसुद्धा प्रत्ययाला येतं.

चर्चिल इंग्लंडचा लोहपुरुष होता. त्याच्या प्रदीर्घ जीवनाला उपमा द्यावयाची तर ती एखाद्या प्रचंड पहाडाची, खळखळणाऱ्या ओढ्याची, कोसळणाऱ्या धबधब्याची किंवा सोसाट्याच्या वाऱ्याचीच द्यावी लागेल. वादळी व्यक्तित्वाचा हा इंग्रज माणूस होता. वाणीने, लेखणीने आणि कृतीने या माणसाने जन्मभर लहानमोठी वादळं उठवून दिली व जगाचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतलं. श्री, सरस्वती आणि वीरश्रीची कृपा शतकाशतकातून एखाद्याच व्यक्तीच्या वाट्याला येते. सर विन्स्टन लिओनर्ड स्पेन्सर चर्चिल ही अशी भाग्यवान व्यक्ती होती. लढवय्या सैनिक, राकट राजकारणी, चतुर मुत्सद्दी, झुंजार युद्धनेता, प्रभावी वक्ता आणि समर्थ गद्यलेखक अशा विविध नात्यांनी चर्चिलचं नाव इतिहासात घेतलं जाणार आहे.

चर्चिलचं रक्तच मुळी मर्द माणसाचं आहे. युद्ध आणि राजकारण ही त्याच्या घराण्याची पूर्वापार मिरासदारी आहे. त्याचा दणकट, धिप्पाड, राकट देह आणि उग्रगंभीर मुद्रा पाहिली की हा माणूस आपत्तींशी झुंजण्यासाठी, विजय संपादण्यासाठी आणि मानसन्मान घेण्या-साठीच जन्मला असावा असे वाटते.

चर्चिलचा पूर्वज जॉन चर्चिल हा एक शूर सरदार होता. इंग्लंड–फ्रान्समधील युद्धात जॉनसाहेबाने मोठा पराक्रम गाजविला होता. इंग्लंडच्या राणीकडून त्याला या पराक्रमाबद्दल ' ड्यूक ऑफ मार्लबरो '

हा किताब मिळाला. इतकेच नव्हे तर राणीने त्याला एक भव्य प्रासाद बांधून दिला. चर्चिलचा बाप रँडॉल्फ चर्चिल हीसुध्दा इंग्लंडच्या राजकारणातली एक बडी व्यक्ती होती. पार्लमेंटचा सभासद, हुजूर पक्षाचा नेता आणि एक प्रभावी वक्ता या नात्याने त्याच्या नावाचा मोठा दरारा होता. जेनी नावाच्या एका श्रीमंत अमेरिकन व्यापाऱ्याच्या मुलीशी त्याचे लग्न झाले. ब्लेनहीम प्रासादात हे दांपत्य शाही इतमामाने राहत होते. जेनी सुंदर, आनंदी व कलाप्रेमी स्त्री होती. प्रसूतीचे दिवस जवळ आले असता ती एकदा नृत्याच्या कार्यक्रमाला गेली. पण तिथे तिचे अचानक पोट दुखू लागले. घाईगर्दीने ती जवळच्या एका अडगळीच्या खोलीत शिरली. अकाली प्रसूत झाली. ३० नोव्हेंबर १८७४ रोजी तिने एका गोंडस मुलाला जन्म दिला. कुरळ्या केसांचा, तांबूस रंगाचा, गोल चेहऱ्याचा आणि काहीसा नकट्या नाकाचा तो मुलगा म्हणजेच विन्स्टन चर्चिल.

रँडॉल्फ चर्चिलने आपल्या लाडक्या मुलाच्या लालनपोषणाची व शिक्षणाची उत्तम बडदास्त ठेविली होती. पण हा मुलगा जात्याच मोठा व्रात्य होता. अभ्यासापेक्षा खोडसाळपणात त्याचं मन जास्त रमे. अॅस्कॉटच्या प्राथमिक शाळेत असताना त्याला अनेकदा मार खावा लागला. इंग्रजी भाषा आणि इतिहास हे त्याचे आवडीचे विषय होते. लॅटिन-ग्रीक या विषयांचा त्याला तिटकारा वाटे. मारकुट्या मास्तरांची हॅट रागारागाने लाथाडून तिचे तुकडे करण्यापर्यंत या व्रात्य मुलाची मजल गेली होती. बाराव्या वर्षी चर्चिल हॅरोच्या विद्यालयात शिकू लागला. मुलगा आता चांगला अभ्यास करू लागेल अशी बापाने उमेद बाळगली. पण या बाबतीत त्याला निराश व्हावे लागले. चर्चिल मठ्ठ मुळीच नव्हता. चांगला तरतरीत बुद्धीचा, साहसी व धीट होता. ठराविक चाकोरीतल्या अभ्यासाची मात्र त्याला नावड होती. आपला बहुतेक वेळ

तो खेळात व खोड्या करण्यात घालवी. त्याच्या अभ्यासाच्या खोलीतल्या टेबलावर पुस्तकांऐवजी सैनिकांची चित्र असत. सैनिकांची चित्रं मांडून तो लुटुपुटीच्या लढाईत तासन् तास मग्न होत असे. शाळेत एकदा तलवारबहाद्दराचा खेळ दाखविण्यात आला. मुलाच्या डोक्यावर सफरचंद ठेवायचं आणि डोक्याला जखम न करता तलवारीचा सपकन् हात मारून ते कापून दाखवायचं असा हा खेळ होता. जरा नेम चुकला की डोकंच कापलं जाण्याची भीती होती. तलवारबहाद्दराने आपली करामत दाखविण्यासाठी एकेका मुलाला जवळ बोलावलं. काही धोका नाही म्हणून धीर दिला. पण एकही मुलगा त्या खेळात भाग घेण्यासाठी पुढे येईना. शेवटी पुढे आला तो चर्चिल. बाकावरून उठून तो तडक त्या तलवारबहाद्दराच्या समोर गुडघे टेकून उभा राहिला. 'ठेवा माझ्या डोक्यावर सफरचंद आणि दाखवा तुमची करामत' असं आव्हान त्याने दिलं. त्याची धिटाई पाहून क्रीडाशिक्षकाने तोंडात बोट घातलं. इतर मुलं घाबरून पाहू लागली. पण या प्रसंगी वाईट काही घडलं नाही. चर्चिल न बावचळता, न डगमगता डोळे मिटून उभा राहिला. त्याच्या डोक्यावरचं सफरचंद सपकन् केव्हा काटलं गेलं हे सुध्दा त्याला कळलं नाही. सर्वांनी टाळ्या वाजविल्या तेव्हा कुठे तो उठला व विजयी मुद्रेने उड्या मारीत सवंगड्यांत जाऊन मिसळला. पोराचा हा अवखळ स्वभाव व मर्दानी खेळांची त्याची आवड पाहून बापाने त्याला सैनिकी शिक्षण देण्याचं ठरविलं.

सँढर्स्टच्या लष्करी विद्यालयात शिकू लागल्यापासून चर्चिलचे नैसर्गिक सुप्त गुण विकास पावू लागले. त्याची स्मृती तल्लख होती. हॅरोच्या शाळेत वक्तृत्वाच्या स्पर्धेत त्याने एकदा बक्षीस मिळवलं होतं. रोमच्या इतिहासातील अनेक परिच्छेद तो तोंडपाठ म्हणून दाखवी. शेक्सपियरच्या नाटकातील प्रवेश न चुकता म्हणून दाखविणे त्याच्या हातचा मळ होता.

कित्येकदा तो मास्तरांच्या चुका धिटाईने दाखवीत असे. भावी आयुष्यात नामांकित वक्ता आणि प्रभावी पार्लमेंटेरियन ( खासदार ) म्हणून विख्यात पावलेला चर्चिल शालेय जीवनात तोतरा होता यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. ' एस् ' हे अक्षर त्याला नीट उच्चारता येत नसे. सँढर्स्टच्या प्रवेशपरीक्षेत तो दोनदा नापास झाला. पण पुढे नेटाने अभ्यास करून त्याने चांगला वरचा क्रमांक पटकाविला. लष्करी विद्येत नकाशांचा अभ्यास, रस्ते बांधणे, पूल उडवून देणे, घोड्यावर स्वार होणे या विषयांना महत्त्व असते. चर्चिल या साऱ्या विषयांत पारंगत झाला. घोडा भरधाव फेकण्याच्या पोराच्या हौसेखातर बापाने भारी किंमतीचे काही घोडे मुद्दाम विकत घेतले. सँढर्स्टच्या लष्करी विद्यालयात असताना चर्चिलने एकदा बेगुमानपणे पुलावरून उडी मारली. तीस फुटांवरून मारलेल्या या उडीमुळे त्याला जबरदस्त मार लागला. तीन दिवस तो बेशुद्ध होता.

लष्करी शिक्षण आटोपल्यावर चार्चिल घरी परतला. पण घरचं कोंदट व ऐषआरामी वातावरण त्याच्या प्रकृतीला मानवेना. लष्करात शिरायचं का बापाप्रमाणे पार्लमेंटात प्रवेश करून राजकारण करायचं हे दोन मार्ग त्याच्यापुढे होते. नियतीची अशी इच्छा होती की, त्याने हे दोन्ही मार्ग चोखाळावे. युद्धकारणात आणि राजकारणात वक्तृत्व गाजविण्यासाठीच नियतीनं त्याला जन्माला घातलं होतं. बापाच्या अकल्पित मृत्यूमुळे त्याचा मार्ग खुला झाला. स्वतःच्या इच्छेप्रमाणे तो सैन्यात शिरला. चौथ्या हुसार्स पलटणीत लेफ्टनंट म्हणून त्याची नेमणूक झाली. त्याच्या युयुत्सू व क्रियाशील मनोवृत्तीला मानवेल अशी ही नोकरी होती.

चर्चिलने विसाव्या वर्षी अंगावर जो लष्करी गणवेश चढविला तो सव्वीसाव्या वर्षी उतरवला. सव्वीसाव्या वर्षापासून साठाव्या वर्षापर्यंतची पस्तीस वर्षे त्याने राजकारण केले. निवडणुका लढविल्या. जयापजयाचे

वार हसतखेळत झेलले. मंत्रिमंडळात प्रवेश मिळवून अनेक खात्यांची सूत्रं कणखरपणे संभाळली. विशेषतः आरमार व संरक्षण खाते त्याने मजबूतपणे संभाळले. १९१४ सालच्या पहिल्या महायुद्धात राजकारण सोडून हा मुत्सद्दी वीर काही काळ युरोपच्या रणधुमाळीतही उतरला होता. १९४०–४५ या काळात दुसरे महायुद्ध भडकले. जगभर युद्धाच्या ज्वाळा पेटल्या. मानवजातीवर भयंकर संकट कोसळले. चर्चिल या प्रसंगी साठ वर्षांचा होता. युद्धप्रसंगी इंग्लंडचं नेतृत्व दुबळं ठरलं होतं. हिटलरचा नाझी भस्मासूर इंग्लंडसकट साऱ्या युरोपला गिळंकृत करतो की काय अशी भीषण परिस्थिती उत्पन्न झाली. देशामागून देश हिटलरच्या टाचेखाली चिरडत चालले होते. त्याचे पाशवी आक्रमण कसे रोखले जाणार या चिंतेने इंग्लंडची जनता चिंताग्रस्त झाली. भयभीत झाली. चेंबर्लेनच्या नेतृत्वावरचा विश्वास साफ उडाला होता. इंग्लंडला नवा नेता हवा होता. त्राता हवा होता. रक्षणकर्ता हवा होता. इंग्लंडची ही ऐतिहासिक गरज भागविणारा एकच लायक, कणखर, झुंजार नेता या वेळी होता. चर्चिलकडे झुंजार नेतृत्व आपोआप, अविरोध, एकमताने चालून आलं. लष्करी गणवेष न चढवताही त्याने हिटलरविरोधी युद्धनेतृत्व हाती घेतलं. हिटलरच्या बॉंबहल्ल्यांनी लंडन राजधानी खिळ-खिळी झाली असताही चर्चिलने आपल्या राष्ट्राला धीर दिला.

'आम्ही जमिनीवरून लढू, समुद्रातून लढू, आकाशातून लढू, शेवट-पर्यंत लढू. या आणीबाणीच्या प्रसंगी राष्ट्राला देण्यासाठी माझ्यापाशी फक्त रक्त आहे, घाम आहे, अश्रू आहेत.'

चर्चिलच्या शब्दांचा बंदुकीच्या गोळ्यांप्रमाणे परिणाम होऊ लागला. ते शब्द नव्हते, तर ठिणग्या होत्या. पराभवाने खचलेली मने त्या शब्दां-सरशी ताजीतवानी झाली. चर्चिलने ऐक्याचा, निर्धाराचा व झुंजारपणाने लढण्याचा संदेश दिला. देशाच्या व लोकशाहीच्या रक्षणासाठी तो

अहर्निश खपू लागला. संरक्षण आणि परराष्ट्रनीतीच्या जोडकारभाराची अवघड जबाबदारी त्याने साठीच्या पुढे उचलली. अमेरिका व रशिया यांच्याशी मैत्री संपादून फॅसिस्ट राष्ट्रांविरुद्ध त्याने दोस्तांची फळी उभारली. हिटलरच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल त्याने राष्ट्राला पूर्वी वारंवार इशारे दिले होते. पण त्याकडे कोणी लक्ष दिले नाही. चर्चिलची राजकीय भाकिते शेवटी खरी ठरली. खुद्द इंग्लंडवर जेव्हा आक्रमणाची पाळी आली तेव्हा सर्वांचे डोळे उघडले. चोहोबाजूंनी घर पेटावं तशी इंग्लंडची अवस्था झाली. चर्चिल या समरप्रसंगी उभा ठाकला म्हणून भीषण युद्धाची लाट परतविता आली.

चर्चिलच्या या युद्धनेतृत्वाचा पाया त्याच्या ऐन पंचविशीतील सैनिकी पेशात घातला गेला होता. जवानीतील चर्चिल मोठा धाडसी, अवखळ व महत्त्वाकांक्षी होता. रणांगण म्हणजे त्याला क्रीडांगण वाटे. सैन्यात दाखल झाल्यानंतर त्याला पाच लढायांत लढण्याची संधी मिळाली. लढाऊ सैनिक आणि युद्धवार्ताहर अशा दोन नात्यांनी त्याने या लढायांत असे असामान्य कर्तृत्व गाजविले की त्यामुळे साऱ्या इंग्लंडभर त्याचा बोलबाला झाला. युद्धातील बहाद्दुरीबद्दल त्याला चार पारितोषिकं व नऊ वेळा बहुमान मिळाले. क्यूबा, हिंदुस्थान, सुदान आणि दक्षिण आफ्रिका या चार देशात वेळोवेळी ज्या चकमकी-लढाया झाल्या त्यांत सैनिक आणि युद्धवार्ताहर म्हणून चर्चिलने चमकदार कामगिरी बजाविली. स्वतः लढणे, युद्धाच्या हालचाली जवळून पाहणे आणि त्यांचा अभ्यास करून त्या वृत्तपत्रांतून वाचकांपुढे मांडणे अशी तिहेरी कामगिरी तो करीत असे. क्यूबात स्पॅनिश सरकारविरुद्ध बंडाळी माजली होती. स्पेन सरकारविरुद्ध गनिमी युद्ध सुरू झालं. चर्चिल या युद्धात स्पेनच्या बाजूने सामील झाला. एका झोपडीत आश्रय घेतला असता त्याच्या झोपडीवर शत्रूकडून गोळीबार झाला. पण न डगमगता त्याने आपला बचाव केला. अफगाणिस्तानच्या

बंडाळीत त्याने प्रथमच रिव्हाल्व्हर चालवून काही पठाण गारद केले. ' मारो, चलो आणि ठैरो ' हे तीन हिंदी शब्द हिंदुस्थानात असताना त्याला अवगत झाले होते. बंगलोरला त्याच्या तुकडीचा तळ पडला असता विश्रांतीच्या काळात त्याने अफगाण युद्धाची हकीकत ग्रंथरूपाने लिहून काढली. यानंतर चर्चिलने सुदान व दक्षिण आफ्रिकेतील बोअर युद्धात भाग घेतला. या दोन्ही युद्धांत प्राण संकटात घालून तो लढला. घोड्यावर स्वार होऊन आणि तलवार-पिस्तूल घेऊन चालून येणाऱ्या शत्रूशी मुकाबला करण्याचा त्याच्यावर प्रसंग आला. अनेकांना त्याने ठार मारले. बोअर युद्धात शत्रूच्या हाती सापडून तो कैदी झाला होता. पण तीन आठवड्यांनी त्याने कैदेतून धाडसी पलायन केले. त्याला जिवंत वा मृत अवस्थेत पकडून देण्यासाठी पंचवीस पौंडांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. अर्थात ते कुणाला मिळाले नाही. संडासातून चर्चिलने जी धूम ठोकली ती सरळ पळती आगगाडी गाठली. बाकाखाली लपून बसून त्याचा प्रवास सुरू झाला. पुढच्या स्टेशनावर तो एका मालगाडीत जाऊन लपला. रात्र झाली तेव्हा गाडीतून तो मधेच उतरला. टेकडीवरच्या झाडीत त्याने आश्रय घेतला. दुसऱ्या दिवशी त्याला जवळच एक कोळशाची खाण दिसली. खाणमालकाकडे जाऊन त्याने आश्रय मागितला. मालकाला त्याची दया आली. त्याने चर्चिलला खाणीच्या तळाशी लपवून ठेवले. काही वेळाने दुसरी मालगाडी आली तेव्हा चर्चिल पुन्हा तीत बसला. पोर्तुगीज प्रदेशात गाडी शिरली तेव्हा तो खाली उतरला. आता त्याला शत्रूची भीती नव्हती. डरबानला बोट पकडून तो सुखरूप मायदेशी आला. इंग्लंडच्या लोकांनी त्याचा सत्कार केला. खांद्यावर घेऊन त्याची मिरवणूक काढली. डेली टेलिग्राफ, मॉर्निंग पोस्ट, पायोनिअर या वृत्तपत्रांना चर्चिल युद्धवार्ता पाठवीत असे. त्याची वार्तापत्रे अभ्यासपूर्ण, निर्भीड व चटकदार असत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चुका तो स्पष्टपणे

मांडी. शत्रूची प्रशंसा करण्यासही त्याने मागेपुढे पाहिले नाही. युद्ध-वार्तांतून चर्चिलचे केवळ युद्धविषयक ज्ञानच नव्हे तर त्याचे राजकीय ज्ञानही प्रतीत होत असे. बोअर युद्धानंतर इंग्लंडला परतल्यावर तो पूर्णतया राजकारणात पडला. हुजूर पक्षाचा खंबीर नेता म्हणून पन्नास वर्षे त्याने इंग्लंडच्या राजकारणात नावलौकिक मिळविला.

चर्चिलचे समृद्ध जीवन २४ जानेवारी १९६५ रोजी, वयाच्या नव्वदाव्या वर्षी संपुष्टात आलं. ऐशींच्या वाढदिवसानंतर राजकारणातून तो जवळजवळ निवृत्त झाला. दुसऱ्या महायुद्धातील अपूर्व विजयानंतर त्याच्या पक्षाचा पराभव झाला. ॲटलीच्या नेतृत्वाखाली मजूर मंत्रिमंडळ अधिकारावर आले. या मंत्रिमंडळाच्या उदार धोरणामुळे भारतासारखी राष्ट्रे लवकर स्वतंत्र झाली. चर्चिलने खेळाडूपणाने भारताच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली. आणीबाणीच्या प्रसंगी त्याच्या युद्धनेतृत्वाची कसोटी लागली होती. त्या कसोटीला तो शंभर टक्के उतरला होता. युद्धकाळ संपताच त्याचे अवतारकार्य संपले. शांतता काळात त्याच्या कर्तृत्वाला वाव नव्हता. तथापि वृद्धापकाळातसुद्धा तो एखाद्या चिरतरुणासारखा वागत होता. ॲटली मंत्रिमंडळानंतर तो पुन्हा एकदा पंतप्रधान झाला. ऐशीच्या घरात आला असता जागतिक राजकारणाची सूत्रं तो संभाळीत होता. शांततेसाठी त्याने आपल्यापरी पुष्कळ यत्न केले. पण अखेर वयापुढे, निसर्गापुढे त्याच्यासारख्या लोहपुरुषाला देखील शरण जावं लागलं. ईडनच्या स्वाधीन सत्ता सोपवून चर्चिलने राजकारणसंन्यास घेतला. हात चालेना, बुद्धी काम देईना, तेव्हाच या वीराने विश्रांती घेण्याचं ठरविलं.

लढवय्या सैनिक, चतुर मुत्सद्दी, खंबीर युद्धनेता आणि समर्थ साहित्यिक या नात्याने चर्चिलचं नाव अजरामर आहे.

नोंद दि.

## प्रकाशित

१ असे हे धर्मवीर
प्र. न. जोशी

२ विश्वविख्यात क्रीडारत्ने
अरविंद ताटके

३ झुंजार सेनानी
म. श्री. दीक्षित

४ यंत्रदेवाचे उपासक १
प्र. न. जोशी

५ यंत्रदेवाचे उपासक २
प्र. न. जोशी

## आगामी

६ उद्योगपती

७ कलावंत

८ थोर स्त्रिया

९ समाजसुधारक

१० साहित्यिक

आपल्या अंगीकारिलेल्या ध्येयासाठी अतोनात कष्ट, त्याग, मानापमान सोसून ज्यांनी उच्च आदर्श निर्माण केला व जे प्रगतीचे दीपस्तंभ ठरले अशांची ही चरित्रे '**शंभर मानवश्रेष्ठ**'. प्रत्येक पुस्तकात दहा चरित्र-कथा अशी दहा पुस्तके.

नितीन प्रकाशन, पुणे ४